म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक गंगाधर गोविंद सापकर

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव रुक्मिणीहरण नाटक

संदर्भ नाटक पु. शोध घेणे

म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

सं. क्र. ३८९

श्री.

# रुक्मिणीहरणनाटक.

हा ग्रंथ

गंगाधर गोविंद सापकर आणि बंधु यांनी,
लक्ष्मण गोपाळ दीक्षित सातारकर यांजकडून
तयार करवून,

पुणें

पेठ बुधवार

येथें

आपले छापखान्यांत छा-

पिला.

किंमत दीड रुपया

सन १८६५

---

सन १८४७ च्या २० व्या आक्टा प्रमाणें हरयेक प्रकारची मालकी ग्रंथ तयार करविणारानें आपणाकडे ठेविली आहे.

सं. नं. ७०७

# रुक्मिणीहरणनाटक.

## पूर्वकथाप्रस्ताव.

### पद.

गणपतीप्रतीननतिकरितों ॥ यानतियोगेंविघ्नहरुनियांबहुप्रसाद्क
रिकरितों ॥ ध्रु० ॥ आद्यदेवजोसिंदुरचर्चित ॥ देवासुरमुनिमनुज
३ र्चित ॥ यक्षरक्षगणयांहींतर्पित ॥ मनेंनित्याधरितों ॥ ग० १ ॥
सर्वारंभप्रथमजोनिगाती ॥ कीर्तिज्याचीव्यासअगाती ॥ पामरगा
इनमीहिवकाती ॥ शंकादुरकरितो ॥ ग० २ ॥ पुण्याईपाहुजनाग
वी ॥ ध्यानांसंकटींकदांननागवी ॥ पूजुनिलक्ष्मणदीक्षितथाक
वि ॥ समाजबहुनमितों ॥ गण० ॥ ३ ॥

या प्रमाणें श्री गणपतीचें स्तवन करून, हस्तामध्यें फुलें घेऊन सूत्रधार सर्वांस विनंति करितो.

ऐकता काय महाराज! पंच तत्वें आणि तीन गुण हेंच ज्याचें स्वरूप अशा परमात्म्याच्या थोर स्वेच्छा प्रमाणें अप्रतिहत चालणाऱ्या भवचक्रांत स्वकर्मानुसार विद्या मिळवून व्यास वाल्मिकादि आदिकवींनी कथन केलेल्या पुराणांच्या आश्रयानें आपापल्या कल्पनेचे ग्रंथ करून पुष्कळ कवी तरले. त्या या तारक मार्गांत एका कवीनें श्रीमद्भागवतांतर्गत श्री रुक्मिणी देवीच्या इच्छें करून जगन्नियंत्यानें तिचें हरण करून सर्वइच्छा पूर्ण केल्या. ती कथा या भूतलावर प्रख्यात झालेल्या एकनाथ स्वामीनी रुक्मिणी स्वयंवर म्हणून अष्टादशाध्यायांनीं अतिरमणीय ओंवी छंदानें श्री काशी क्षेत्रीं शके १४९३ चैत्र शुद्ध ९ प्रजापतीनाम संवत्सरे रोजीं संपविला. त्याच्या आश्रयानें सप्तर्षिनगर निवास्याहिताग्नि गणक वदन कमल भानुभूत वंशोत्पन्न श्रीवत्स गोत्रीय चित्तपावन ज्ञात्युद्भवकृ रुक्मिणी हरण नाटकरीत्या कथानकथन केलें आहे त्याचा खेळ आज तुह्मा पुढें करितों, असें बोलून स-

वांवर पुष्पें उडवितो, आणि गाऊं लागतो.

साकी.

गणेशदेवाध्याहीसेवाहेवासऱ्यजनाचा॥नाशु
नियांकविच्यावाक्यानीपुरवाहेतुमनाचा॥ १॥
यारंगींयामलंगींयासंगीतादिकपात्री॥ यश
कीर्तीधास्वभावतुमचाशांतजसातीधात्री॥२

या प्रमाणें स्तवन करितांच चतुर्भुज पीतांबर धारी महा गणपती रंग मंडपीं येऊन नाटका विषयींचीं सर्व विघ्नें दूर करण्यास्तव आशीर्वचन देऊन नाटक पात्रांचें बुध्दिमालिन्य दूर होण्या साठीं श्री वाग्देवतेचें स्तवन करण्यास सूत्रधारास आज्ञा करितात.

नंतर सूत्रधार श्रीवागीश्वरीचें स्तवन करितो.

पद. चाल शारदे.

शारदेकुंदइवरदेशुभ्रह्रतमदेउदेदेमजला,
तारिजशीलुब्धापांगुब्धा॥ह्मणुनिभक्तभज-
निहासजब्धा॥ध्रु०॥ अयिपरे, निखिलसुर
वरे, भक्तसुखकरे, मयुरारूढे, नस्मरती, तीं
कद्यानतरती॥ भूवरतीजोमूढें॥ हेबये, मा
तृकामये, नर्तनालये, धिगधिगोती॥धिगि
धि, धिगधिगी, धाधिगीती, धाधीगीती
धिगीती॥ नर्तसे, तदनुवर्तसे, तर्कसे, तर्कैः
गीयसिगीतैर्मर्त्यैरुत्तवारुण्गौसर्वैरकैः॥शा०
॥१॥ यासमयिं, येउनिअयी, दाविचतुराई॥
श्रीगणपाला, करिहा, करिहा, प्रसादमात्रें
बहुपात्रेंशामिपाला॥ येलरेदूरकुनजरेकृपा

जलसरेवराभय करेशारदेमाते ॥ करिधन्यधन्य
बहुकृपाकरूनियांमानें ॥ नाटकामधिलपात्रकें ॥
नाममात्रकें, परीछन्नकेंत्वन्नामाची ॥ तरिकरिशी
जनमलेंहशायाकक्षमहिरूपेनेंसाची ॥ ४ ॥ २

या प्रमाणें वाग्देवतेचें स्तवन करितांच शारदा देवी मयुरारूढ होत्साती रंगमंडपांत येऊन नाटक पात्रांचें बुद्धिजाड्य दूर होण्या विषयीं आशीर्वचन देऊन जाऊं लागली असतां श्री गजानन पुनः नर्तन करण्यास सांगतात. आणि त्या प्रमाणें शारदा देवी नाचून गेल्यानंतर श्री गजाननानीं आशिर्वाद दिला कीं, "ज्या प्रमाणें आतां मत्स्य वागीश्वरी रंगमंडपांत नर्तन करीत होती तशीच योग्यकालीं तुझ्यामतिमंदही पात्राच्या मुखांत ती वाग्विलास करील, हा माझा पूर्ण आशिर्वाद आहे." असें आशीर्वचन देऊन गणपति गेले. त्यानंतर-

सूत्रधार पुढें होतो आणि श्लोक ह्मणतो.

## श्लोक.

परिक्षिताला शुकबोललेकीं, तरावयाभागवतांतलेखी ॥ हरूनियांरुक्मिणिलाविवाह ॥
करीलसर्वेश्वरतोमहाहं ॥ १ ॥

असा श्लोक ह्मणून पुढें कांहीं गाणार तों इतक्यांत तोंडास चित्रविचित्र रंग लाऊन डोक्यास अनेक जातींच्या वृक्षांचे टाळे बांधून ज्याच्या पोषाखा वरून कोणतीच ज्ञाति समजत नाहीं, असा विदूषक पुढें होतो, आणि डोळे मिटून हात पुढें करून सूत्रधारास ह्मणतो :—

**विदूषक :—** अहो, तुमच्या सर्वेश्वर श्री रुक्मिणी देवीचें हरण करून तिच्याशीं विवाह करील ह्मणून भयानें जसा कोणी एखादा क

मरेवर हात टेकून दीन उभा राहतो त्या प्रमाणें आधींच त्या श्री रुक्मिणी देवीस एकीकडे उभी करून आमचा विठोबा एकीकडेस अगोदर उभा राहिला आहे बरे. त्या रुक्मिणीचें हरण करून तुमच्या सर्वेश्वरास सावकाश लग्न करूं द्या, आह्मी कांहीं काळजी करीत नाहीं. (असें बोलून पुनः उड्या मारूं लागतो.

**सूत्रधार:—** (त्यास धरून) अरे वनचरा, तूं कोण कोठचा? आणि मध्यंतरींच येऊन भलताच प्रश्न करितोस, तर तुलें असें करण्याचें कारण काय तें सांग.

**विदूषक:—** ह्मटलें आतां येथें पूर्वीं हरण होऊन पुढें विवाह होणार तेव्हां उमाजी किंवा पदाजी नाइकाची स्वारी आली वाटते. मग आमचें काय! (मागें पुढें पाहून.) कोणी आले नाहींना! नाहींतर ह्मटलें मसलत ऐकेल. तुमचें देव कांहीं तरी करो. आह्मास असें वाटलें कीं, मौज पहावयास जावें.

**सूत्रधार:—** अरे वेड्या मौज आहे पण तूं या नाटक कृत्यांत आमचा काय उपयोग करशील? कांहीं उपयोग केलास तर तुला ती मौज दाखवूं.

**विदूषक:—** उपयोग! उपयोग होईल तो होवो. पण तुमचे प्राणाच जर त्या हरण प्रसंगीं जाऊं लागला तर तपकीर प्रयोग करण्यासाठीं, मात्र मंडळी आणून ठेविली आहे.

**सूत्रधार:—** (विस्मय करून) काय हा अगदीं वेडा तर नसेल कीं, पहा, जें बोलावें तें आपल्या बडबडी खालीं सर्व व्यर्थ करितो. अरे. कांहीं कां बडबडेना, ऐकूं तर खरें. कायरे तपकीर प्रयोग म्हणजे काय?

**विदूषक:—** डबी हालवून. या पात्रांत एक चूर्ण भरिलें आहे. या-

चें संस्कृत नांव नासाचूर्ण. याचा उपयोग काय म्हणशील तर अशी कोटी योजिली आहे कीं हें नाकांत घातलें म्हणजे त्या नासिकांतून एक काकवी सारखा रस निघतो, त्याचें नाव नासा रस. आतां जसा तु जसारिखा किंवा एखाद्या महा पंडिताच्या सुखरसानें गर्वी जनांस खर्वित करतो. सर्व वेत्ता जड होतो. त्या प्रमाणें युद्धप्रसंगीं शत्रूंनी जर पळ काढिला तर त्याची जाण्याची दिशा हेरून ही तपकीर कंपनी त्या रस्त्यांत अर्गोदर एक प्रहर पर्यंत बसविली असतां तेथें जो नासा रस पडेल त्याजवरून कित्येक घसरून पडतील त्यांचे हात पाय मोडतील आणि कित्येक अशक्त असतील ते चिकटून अडकतील.

**सूत्रधार.—** काय तरी याचा घामर स्वभाव आहे हो!! अरे मूर्खा, असल्या मूर्ख कल्पना कोणी सभेंत बोलतो काय?

**विदूषक.—** तरमग आह्मास लोकांनी कांहींच ह्मणूं नये वाटतें. (असें बोलून एक सभ्या पैकीं गृहस्थ दाखवून श्लोक ह्मणतो.)

### श्लोक.

पाहेतोनयनींजणूंगणपतीदोंदासुळेंवाटतो॥
चिमटीमाजिधरूनितप्रकिरदुज्याहस्तांअसा
थाटतो॥ देतोवाअभयासओढुनिह्मियाचिमटी
सजेंमागशी॥ ऐसाअर्थमलागमेमगमधास्या-
कीर्तिकांमागशी॥ १॥

**सूत्रधार.—** जा मूर्खा. तुला कांहीं समजत नाहीं; तर उगीच उभा राहून मी सांगतों तें ऐक.

**विदूषक.—** कां होइना. सांगा काय सांगता तें, परंतु आह्मी तपकीर प्रयोग स्नानसंध्यादि कर्मांत आहे म्हणून बोललें. राग आणूं नका. असें बोलून हात पांघरून उभा राहतो.

**सूत्रधारः—** ऐक. विदर्भदेशच्या भीमक राजास रुक्मिणी ह्मणून कन्या झाली. ती उपवर झाल्यावर, एके दिवशीं आपल्याबापाजवळ बसली असतां कोणी कीर्ति या नांवाच्या भिक्षुक ब्राह्मणानें श्रीकृष्णाचें वर्णन तेथें केलें तें ऐकतांच रुक्मिणीची इच्छा श्री कृष्णास वरावया विषयीं झाली. ही गोष्ट तिणें आपल्या मातापितरांस कळविली, आणि ती त्यासही मान्य झाली; परंतु रुक्मिया ह्मणून तिचा वडील भाऊ होता त्यास ही गोष्ट वाईट वाटून त्याणें शिशुपाळास रुक्मिणी देण्याचा निश्चय केला. तथापि रुक्मिणीनें सुदेव नामक ब्राह्मणा बराबर एक पत्र लिहून श्रीकृष्णास पाठविलें आणि राक्षस विधीनें विवाह करावा असें त्यांस दर्शविलें. मग श्रीकृष्ण तेथें गेले आणि रुक्मिणीचें हरण केलें. नंतर तेथें जमलेल्या राजाशीं मोठें युद्ध झालें. त्यांत बलराम आणि श्रीकृष्ण यानीं पराक्रमानें त्या सर्वांचा पराजय केला. पुढें भीमकानें शरण जाऊन देवास विनविलें. नंतर मोठ्या समारंभानें विवाह होऊन श्रीकृष्ण रुक्मिणी देवीसहित द्वारकेस गेले. असा ह्या कर्तव्य नाटकाचा पूर्वकथाप्रस्ताव आहे; तर तूं आतां कचेरीची तयारी कर जा.

**विदूषकः—** बरें आहे तर. ( असें बोलून नेपथ्यांत जातो. तों सकल पात्रां सह सूत्रधार आरंभाची आरती ह्मणतो. )

यापमाणें रुक्मिणीहरण नाटकाचा पूर्वकथाप्रस्ताव संपला.

## अंक १.

### स्थळ.

### रंगमंडप.




### श्लोक.

#### शार्दूलविक्रीडितछंद.

सर्वारंभह्मणोनिज्यासह्मणतीशक्तीशिवात्मास्वयें॥
शुंडादंडविराजिआजिनमिळाजोसंकटींदेवये ॥
आमूलाहुनिसर्वविघ्नगणतेनाशीप्रसादाकरी ॥-
भक्तांदेबहुसौख्यनिर्जरपतीपावोसुखींजोकरी॥१॥

### साकी.

नाट्यकरावेंज्यांतभरावे अभिनवनवरस आंगीं॥
ऐशापदवीचेंबहुवदवी शाकपदार्थीवागीं॥ १ ॥
वस्तुगुणालाशक्तिकुणाला नाहींछपविनऐसी ॥
बहुरसमयमीकाव्यकरिनही तृप्तीहोतेकैसी॥२॥
याहेतूचाविचारकरितां गमलीमोठीयुक्ती॥ ठेवूं
एकाजनार्दनाच्या ग्रंथींबहुविधभक्ती॥३॥ ॥
श्रीरुक्मिणिच्याहरणाकेलें देवेंपाहुनिप्रेम॥ गातां
तेंमीदेइलकायन सत्कीर्तीआणिहेम॥४॥ ॥

# अंक १

## प्रवेश १

### स्थळ.

कौंडिण्यपुरांतीलराजमंदिर.




### पात्रें.

सूत्रधार. ---------- ह्मणजे ---------- नाटककर्ता.

विदूषक. ---------- त्याचासोबती.

भीमकी. ---------- रुक्मिणी.

भीमकराजा. ---------- रुक्मिणीचा पिता.

शाद्वमती. ---------- रुक्मिणीची माता.

रुक्मिया. ---------- रुक्मिणीचाज्येष्ठबंधु.

कीर्ति. ---------- नामेंएकब्राह्मण.

कंचुकी. ---------- चोबदार.

पांड्याजी ---------- घड्याळावरीलपा-

(इतरसभासद.) (हारेकरी.

अ.नं.७०७



**विदूषक–** कायहो नाटकाचार्य ? आजच्या खेळा करितां तुह्मी रंगमंडप फारच सुशोभित केला आहे, यावरून वाटतें कीं येथें अद्वितीय चमत्कार होईल. तर अंमळसे पुढें या आणि कंबर सोडा ह्मणजे तुह्मास बोलण्यास नीट पडेल आणि या पुढें काय चमत्कार होणार हें सकलसभासदांस ह मला स्पष्ट सांगा.

**सूत्रधार–** मित्रा ! चांगलें विच्यारिलेंस. लक्ष देऊन ऐक. (असें बोलून गाऊं लागतो.)

## श्लोक
## छंद पृथ्वी.

विदर्भनगरीपतीह्मणतिभीमनामेंजया ॥ अलीउ
दरिंरुक्मिणीह्मणुनिआदिशक्तीतया ॥ करूनिबहु
हर्षतत्तनुभवाविडंबीहरी ॥ हरीहारिलरुक्मिणीअ
शिचमत्कृतीआदरीं ॥ १ ॥

**विदूषक–** (सूत्रधाराचा हात धरून) अहो मागें बघा । मागें बघा ॥ काय थाटानें भीमकराज महाराजांची स्वारी येत आहे. (असें ऐकतांच मागें पाहून किंचित् भ्याल्या सारखें करून पलिकडे सरकतो तों पुढें भालदार आणि मागें कन्या रुक्मिणी असा भीमकराजा सिंहासनावर येऊन बसतो.)

**कंचुकी–** महाराजांचा सर्वत्र जयजय कार असो.

**राजा–** कायरे कंचुके ! आतां किती घटिका दिवस आला आहे ?

**कंचुकी–** जी महाराज । शोध करून विनंती करितों. (असें बोलून जातो आणि पाहाऱ्यावर येऊन आपणाशींच) येथील पाहारेकरी कोठें गेला असावा बरें ! अस्तु, आपणास याचा शोध करावयाचें कारण नाहीं काल ज्ञान झालें पाहिजे. (असें डोळे मिटून बोलतो तों पाहरेजी येतो आणि

त्यास धरून)

पांड्याजी— कां मिर्धेसाहेब! आतां एकाग्रांतःकरणानें आपला विच्यार कोणाशीं चालला होता बरे?

कंचुकी— (डोळे उघडून) हृदयवर्ती तुह्माशीं.

पांड्याजी— हॅं! हॅं! तर मग तो मी तुमच्या पुढें सादर आहें काय आज्ञा?

कंचुकी— आज्ञा इतकीच आहे कीं दिवस किती आला आहे?

पांड्याजी— साहा घटिका भरल्या आतांच सातवी भरेल.

कंचुकी— बरें तर सोड, आतां मला सरकारच्या आज्ञे प्रमाणें हजर झालें पाहिजे.

पांड्याजी— असें असेल तर जावें. (तें एकून अंमळ पुढें जातो तों वाटें त कीर्ति या नावाचा एक ब्राह्मण त्यास थांबवून बोलतो.)

कीर्ति— (कंचुकीस) कारभारी! मी आलों आहें ह्मणून सरकारचे कानांत घालावें.

कंचुकी— होय महाराज, सवड पाहून कळवितों. (असें बोलून आंत येतो.)

आर्या.

उपवर झाली कन्या कवणा धन्यास अर्पिजे आतां॥
ऐसा विच्यार करितां बसला हें पाहे कंचुकी येतां॥१॥

(आंत येऊन स्मरण केल्या सारिखें करून आपणाशींच बोलतो) आतां ह्या संधी कीर्ति बावाचें येणें कळविण्यास योग्य आहे. (असें बोलून पुनः स्मृतीवर येऊन हात जोडून) महाराज! द्वारामध्यें एक कीर्तिनामक भिक्षुक आला आहे. तो ह्मणतो कीं मला महाराजांचें दर्शन घ्यावयाचें आहे.

राजा— फार चांगलें आहे येऊद्या.

कंचुकी— (ऐकून हात जोडून) आज्ञा महाराज (असें बोलून जातो) (इतक्यांत कीर्ति ब्राह्मण येतो त्यास पाहून राजा उठतो आणि योग्यस्थानीं

बसवून बोलतो.)

राजा— विप्रवर्या! आपलें येणे कोठून जाहलें?

कीर्ति— महाराज! मी या भूतलावर संचार करण्या करितां बहुत दिवस इच्छा करित होतों परंतु माझ्या नावा प्रमाणें मला जाण्यास कोणतेंच स्थळ योग्य वाटेना असें असतां आज सहजच अंतःकरणामध्यें आपणाकडे येण्याची इच्छा उत्पन्न जाहली ह्मणून आलों. आपण आपल्या परिवारांसह कुशलरूप आहां नां.

राजा— (त्याचें भाषण ऐकून मनांत) आज माझा पूर्ण भाग्योदय होणार काय! (उघडपणें) होय, येरवीं, मी सिंहासनारूढ झालों नाहीं तोंच प्रातःकाळीं प्रत्यक्ष कीर्तिनामक द्विजरूपी ईश्वर मला भेटला आणि प्रस्तुत मी-ज्या कन्यादानांच्या चिंतेंत होतों ती सर्व विसरून या ब्राह्मणास पाहून माझ्या हृदयास फार आनंद जाहाला आहे. तेव्हां हाच शुभशकुन आहे. तर हेंच खास समजावें कीं माझ्या कन्येचें दान कीर्तिपूर्वक होणार आहे.

कीर्ति— काय? सरकारांची स्वारी कन्येला वरयोजना करण्याचे कामांत येथें विचार करीत बसली आहे?

राजा— (हात जोडून) होय भूदेवा.

कीर्ति— फार उत्तम आहे. ही जी तुमच्या पार्श्वभागास शोभा देणारी आणि प्रत्यक्ष आदिदेवताच काय अशी भासणारी कन्या बसली आहे इजकरितांच जर वरयोजना असेल तर थोडेसें बोलतों ऐकावें.

## ओवी

### एकनाथाची.

अगावसुदेवाचियेतपप्रासी॥श्रीकृष्णादेवकीउदरा
येती॥कृष्णाचीजेकृष्णाशक्ती॥झालीउतरतीभूमं-
डळीं॥१॥

टिचीशक्तिमहा ॥ हरिचें ॥२॥ सहजगर्जतीतोंडरपा
थीं ॥ जन्ममरणदुःखविषयाअनाई ॥ भक्तांलाजेवा
वुनिघाई ॥ प्रियअरियांचतहा ॥ हरिचे ॥ ३ ॥

पद.

चा० भुपाळीची राग भूप.

अतिसुंदरतीतनुता ॥ जैंकटिचीतनुता ॥ ध्रु ॥ पाहु
निमध्या सिंहलाजला ॥ गेलाविपिनींमनीं भाजला ॥
आश्वासनंदेनाभिनाभिला ॥ विधिलादेवनुता ॥ अति
सुं० ॥ १ ॥ प्रणवमातृकासहितघेउनी ॥ कंबुकंठिंज
पुवसलायेउनि ॥ उत्पत्तीवेदाचीजेथुनी ॥ ठायींपंच
भूता ॥ अति० ॥ २ ॥ स्वर्णोनिखाणीउपनिषदांची ॥ अ
र्थकाढिलाकोरुनमहाची ॥ कंठींझळकेशोभात्याची ॥
घ्यावीगोपालसुता ॥ अतिसुं० ॥ ३ ॥

राजा— (ऐकून आनंद पावून) द्विजश्रेष्ठा! आपण जीं दोन रागांत गाणीं गा इलींत त्याहुन प्रस्तुत जी वेळ आहे तिच्या रागाचें गाणें गावें.

कीर्ति— महाराज! मी पूर्वीं या विषयीं शेषाच्या सहस्रमुखांची शक्ती सांगितलीच आहे या वरून सर्व लक्षांत आलेंच असेल.

राजा— विप्रवर्या! होय समजलों. ईश्वराच्या सर्व शक्तीचे गुण वर्णन करण्यास कोणीच समर्थ नाहीं खरें. परंतु तुह्मी विशेषज्ञ आहां ह्मणून तुह्मास विनंती केली आहे.

कीर्ति— राजा! उत्तम आहे. (असें बोलून ह्मणूं लागतो.)

श्लोक

विघ्नद्विजाचीजसिदीर्घशुंडा ॥ शोभतसीभव्यहिचा
रिदंडा ॥ शक्तीजयामाजिअतिप्रचंडा ॥ साधूंसिपा

( इतिमिश्रविष्कंभः )

राजा— ऐकून चकित होतो. आणि गेर राप्ता करून त्या ब्राह्मणाची आदरपूर्वक षोडशोपच्यारें पूजा करून हात जोडून विच्यारितो.

राजा— द्विजवर्या! आतांच जीं आपल्या मुखांतून छंदोमय भाषणें निघालीं तीं सर्व ऐकतांच चित्तास आपलें बोलणें श्रवण करण्याची फार उत्कंठा प्राप्त जाहली आहे यास्तव आपण कृपा करून बोलावें.

कीर्ति— राजा! बोलावयाचें इतकेंच कीं जो निर्गुण, निराकार, निष्कर्म, निरूप तोच लीला विग्रही श्रीकृष्णपरमात्मा द्वारकेमध्यें वसुदेवाचे उदरीं अवतरला आहे.

राजा— असें काय! आपल्या वसुदेवाचें इतकें मोठें भाग्य आहे कीं ज्याच्या उदरीं साक्षात् भगवंतानेच जन्म घेतलें!

कीर्ति— यांत काय संशय. वसुदेव तसाच महा पवित्र आहे, आणि त्याणें पूर्वीं केलेल्या घोर तपश्चर्येचेंच हें फल त्यास प्राप्त झालें आहे. तें लोकोत्तर सुंदर आहे ह्मणून, जरीं शेषास सहस्र मुखें आहेत तरीं त्याचें रमणकत्व वर्णन करण्यास तीं थोडीच परंतु मी जो या नेत्रानीं त्याचा अनुभव घेतला आहे तो थोडासा सांगतों श्रवण कर.

पद.

चाल हरहरशंभोगा, राग मालकंस.

हरिचेंरूपपहा॥ एकवारज्यापाहातांउरतें द्रष्टापा
शिंअहा॥ ध्रु०॥ इंद्रनीळमणिगाळुनिकेली॥ विधि
नेंतनूतीजणूसांवळी॥ भक्तांह्मणतीएथेंराहा॥ हरि
चेंरूप०॥ १॥ पीतांबरमिषकरूनिवीज॥ जडतां
आलेंचोरुणतेज॥ अस्ताजाणेभानूनतीज॥ क

ळुनिरवळांकरितानदंडा॥ १॥

आर्या.

पांचांभूतांपरियल्करांगुळीभिन्नभिन्नएकपरी॥ पुरु
षार्थरूपभुजतेधरितीशस्त्रांसचारतेहितरीं॥१॥
चक्रारिमर्दनालाहंकाराठेंवण्यासलठ्ठगदा॥ वेदा
नुगाद्शंखेंनाल[१]धरीभक्तपूजनार्थसदा॥ २॥

कीर्ति– राजा! त्या देवाधिदेवाचें वर्णन काय सांगावें, पाहा ज्याच्या हस्ता मध्यें सुवर्ण कंकणा प्रमाणें वेद रुळताहेत; पूर्व आणि उत्तर ह्या दोन्ही मीमांसा ज्याचीं कर्णभूषणें होत; आणि मोक्षसुखाच्या गांध्याचेंच ज्याचें मुख कीं ज्या मुखास चंद्राची पूर्णोपमा द्यावी तर तो नील आणि क्षयी आहे ह्मणून बरोबरी पावत नाहीं; ज्याच्या हनवटीस तर उपमाच नाहीं कीं जी त्रैलोक्यांतील सर्व सौंदर्याच्या तात्पर्याचीच केली असावी; आणि जीव, शिव एकच असून चिदानंदानें दोन भासतात त्या प्रमाणें ऊर्ध्वाधरोष्ठ असून दंतानीं फारच शोभतात.

पद.

चाल माझ्याकृष्णा॰रागजोगी

रायाभूषणदेवाचें॥ बोलविसर्वांहेंवाचें॥ध्रु॰॥हृ
दयींभृगुऋषिमारीलात॥ बोलेजोडुनित्यालाहात॥
झालीशांतिचित्यादेमात॥ मिरविजगांतलांछनतें
॥ रायाभूष॰॥१॥ सर्वजगामाधिंसुंदरतें॥ पाठीषा
हीसंदरतें॥ जाणुनिएकचिपंदरतें॥ श्रुतिमंदिरतें
शोभविलें॥ राया॰॥२॥ कृष्णापाहुनिमन्मथसांग॥
अनंगझालाजाळुनिआंग॥ पोटींयेउनिमागतोचांग

१ कमल.

उत्तमअंगपावेसदा ॥३॥

अभंग.

दोन्हचरणी.

बरवेपणानेंमीचफारमोटी ॥ लक्ष्मीच्याहेंपोटींबहु
वसे ॥१॥ मगएकवारकृष्णानाथदृष्टी ॥ पाहतांउफरा
टीझालीऐका ॥२॥ चंचलतीझालीरूपालापाहून ॥
नावडेतेंहूनदेवाजीस ॥३॥ होऊनीयादासीराहेपा-
यांपासीं ॥ ऋषीच्यातोऐसीव्यासवाणी ॥ ४॥

दिंडी.

ऐकरायाश्रीकृष्णादेवतांची ॥ हस्तिनेथेमारुतीग-
तिवसाची ॥ अधिकलागेआवडीलोचनाची ॥ अणि
कत्याहूनसर्वांसिमोचनाची ॥१॥ रूपपहाण्यातेंलो
चनासिजीभा ॥ होतिजेंच्यातेंअशीज्यांतआभा ॥
कानिनासोडीज्याचियामहालोभा ॥ अलेंऐसेंदेव
कीवशकोंभा ॥२॥ गोडलागेनाअमृतजयाऐसें ॥
देवझालेलालचीज्यासकेसे ॥ बरेंकेशीयाकंसव
धीतैसे ॥ राक्षसांतें मा मा जू क क्ष्मणाऐसें ॥३॥

पद.

चाल दयाघना. रागभैरवी.

दांतादातासांगजिभेला ॥ रवातांगारवातोचिरसे
ला ॥ ध्रु० ॥ देवकिदेवकिल्पतांनेदे ॥ पूतनिकेहु
निसमतापेदे ॥ नकांबागविस्वात्मापेदे ॥ ओ
ढलिकाचयोतोभेला ॥ दांता० ॥१॥ मासाकास

---

१ कंस.

वसूकरझाला ॥ उदारसुंदरधीरहियाला ॥ तुळ-
ण्याप्रभूवरितोचितयाला ॥ वाटेकिंबहुदेवसभेला ॥
दांतादाता० ॥ २ ॥ कृष्णाचरणिंचातोआराम ॥ पाहुनि
विसरेसर्वहिकाम ॥ समाधिनामेंअग्रजराम ॥ झा-
लीऐसानिश्चयकेला ॥ दांता० ॥ ३ ॥

ओवी.

एकनाथाची.

कृष्णास्वरूपाचीप्राप्ती ॥ भीमकोसादरश्रवणार्थी ॥
हृदयींआविर्भवलीमूर्ति ॥ बाह्यस्फूर्तीमावळली ॥
१ ॥ आंगझालेंरोमांचित ॥ कंठीबाष्पेंदाटत ॥ शरी
रचळचळांकांपत ॥ पडेमूर्छितधरणीये ॥ २ ॥ एक
ह्मणतीधराधरा ॥ एकपालवेंघालितीवारा ॥ एकह्म
णतीहेसुंदरा ॥ कृष्णकीर्तनेंझडपली ॥ ३ ॥ भक्तीपा
सींभावनाजाये ॥ तैसीधाविन्नलीधायें ॥ ह्मणीदृ
ष्टीलागेलमाये ॥ ह्मणोनिकडियेघेतली ॥ ४ ॥ राया
सिकळलेंहेंचिन्ह ॥ ईसझालेंकृष्णश्रवण ॥ तेथेंवे
धलेंइचेंमन ॥ कृष्णार्पणहेकरावी ॥ ५ ॥

राजा— ( शुद्धमतीस ) प्राणप्रिये ! आतां तुजसमक्षच हें सर्व कृत्य झालेंना ! पाहा ही मुग्धांगना तारुण्योद्रेकानें दुःखित आहे इच्या अंतरात्म्याच्या पूर्ण इच्छेचीं लक्षणें. ( इतकें बोलून रुक्मिणीकडे पाहून श्वास टाकून दुःखानें ) शिव शिव ! ती लज्जेनें आपलें सर्वांग किती झांकते आहे आणि संकुचित करते आहे तथापि झालेल्या व्याधीनें तिचें शरीर कसें एकाएकींच निस्तेज

१ ज्येष्ठबंधु

झालें हरहर!! (असें बोलून चिंताग्रस्त होऊन बसतो.)

शत्रुमती– आतां कसें करावें, प्राणनाथाची स्थिती तर अशी झाली आणि ही कन्या तर देहावर नाहींच जगदीश्वरा! धांव आणि कृपा कर. (असें बोलून तीही चिंताग्रस्त होते.

कीर्ति– (त्रिवर्गांस दुःखित पाहून रुक्मियास बोलतो.) युवराजा! महाराज, तुमची माता आणि भगिनी इत्यादि सर्व दुःखाग्रस्त झाले यास्तव या वेळेस मी आज्ञा मागतों, आणि कालावकाशानें पुनश्च येईन.

रुक्मिया– नकोरे बाबा नको. तूं येऊन नको. एक वेळ आलास तो, माझा बाप, आई आणि बहीण यांस अर्धमेले केलेस आणि आतां काय पुनश्च येऊन ठार मारणार होयरे? कायतरीं भावार्थी; कालावकाशानें पुनश्च येईन ह्मणतो. जा जा. ऊठ येथें बसूंनको. (इतर सभासदांकडे वळून) कायहो मानकरी मंडळी? या भटानें फिरून आपले वाड्यांत यावे?

इतरस०– (भटाचा हात धरून) भटजी महाराज! आतां आपण कृपा करून लवकर एथून जा.

कीर्ति– (भयभीत होऊन) जातों बाबा काय करावयाचें आहे? आंब्याच्या झाडास बिब्बा आला. अस्तु असें आहे तरीं सर्वशक्तिमान् ईश्वर सर्वांचें बरें करो. (असें बोलून जातो.)

(तो गेल्या नंतर पडदा पडतो.)

विदूषक– कायहो नाटकाचार्य! आतां आह्मी यावें ना? आमचें काम झालें?

सूत्रधा०– नाहींरे अंमळ दम धर आणि पुढें काय मजा होते ती पाहा.

विदूष०– (नाक, तोंड दाबून धरून कांहीं वेळ गेल्यानंतर मोठ्यानें श्वास टाकून) ह्मणतो जळ्ळी तुमची मजा तुमचें बोलणें जो ऐकेल त्याणें प्राणासच मुकावें.


सूत्र०– अरे! दम धर ह्मटलें ह्मणजे नाक, तोंड दाबून धरावें, असा या बोलण्याचा अर्थ नव्हे; चल बेट्या. आतां उशीर झाला. (असें बोलून जातात.)

## अंक १

## प्रवेश २.

## स्थळ.

## राजमंदिरांतील दिवाणखाना.




## पात्रें.

रुक्मिया.---------------------------------------------रुक्मिणीचा ज्येष्ठ भ्रा.

रुक्मिणी.---------------------------------------------आदिशक्ती.

जोशीबावा.---------------------------------------------ग्रामजोशी.

रुक्मिया—( दिवाण खान्याचें दार बंद करून एकटाच इकडून तिकडे फिरत आहे आणि आपले मनासींच बोलत आहे.) त्या गोरक्षकाशीं संबंध करणें हें आमच्या कुळास किती अशुद्ध आणि लाजिरवाणें कर्म आहे! काय करावें! आतां ह्मातारपणाच्या आमच्या वडिलांच्या छंदापुढें कांहीं उपाय राहिला नाहीं. अहो जो आपल्या सख्या माम्यास देखील ठार मारावयास चुकला नाहीं तसल्या द्वाड गोरक्षकाशीं शरीर संबंध केल्या पासून आह्मास कांहीं सुखावह होईल काय? नाहीच होणार. पाहा ज्याचे बापाचा तर सुळीच थांग लागत नाहीं कोणी नंदाचा ह्मणतात, कोणी वसुदेवाचा ह्मणतात,

मग त्याची जन्मपत्रिका तरी कोणची असावयाची? तेव्हां अर्थातच कुळगोत्राचा विच्यार करावयास नको, असें असतांही स्वातंत्र्य तरी आहे? नाहीं तर सदांसार्व काल भक्ताधीन जसा चाकर, तसाच परदाराभिगामी, आणि चोर असा आहे, आणि हा तर गोरक्षा करितां देखील गोकुळांत चोऱ्या करून वारंवार गोळ्यांचा मार खात होता, आणि गुरें चारितांना गुरांपाठीं पळतां पळतां तर यास प- ळावयाचा दृढ अभ्यास झाला आहे. तो कांहीं महावीर नव्हे, जर तसा असता तर ती काळयवना पुढें कां पळता? आतां केशिया म्हणून एक तट्टू, वत्सासुर म्हणीत एक वासरूं, बकासुर म्हणोन एक पाखरूं आणि अघासुर म्हणून ए क भिरडूं यांस मारिलें म्हणून यांत काय पराक्रम केला? या वरून यास म हावीर म्हणतां येत नाहीं. आणि याची ज्यडपणें संसारांत वागणूकही नाहीं. हा कधीं वैकुंठींच्या पाहाडावर, कधीं क्षीरसागरांत वटपत्रावर, कधीं शोपेच्या बि छानें शेषाच्या फणेखालीं, कधीं कोठें, कधीं कोठें असा राहातो; या प्रमाणें याचें राहाण्याचें तर कोठें एक ठिकाणच नाहीं; बरें याला रूप तरी एक आहे? कधीं मासा (मत्स्य) कधीं कांसव (कूर्म) कधीं डुकर (वराह) कधीं सिंह (नार सिंह) कधीं भिकारी, कधीं भिक्षुक, कधीं माकडांचा राजा याप्रमाणें अनेक रूपें घेतां घेतां जसा बहुरूपीच बनला आहे. याला मान आणि अपमान तर ठाऊकच नाहीं, पहा त्याणें द्रौपदीजवळ एक भाजीचें पान देखील मा गितलें। आणि धर्मराजाच्या घरीं उष्टीं देखील काढली! अशाशीं शरीर सं बंध! काय आमच्या बाबांस वेड तर लागलें नाहीं ना! वाव्हा बाबा वाव्हा!

(इतकें बोलून एके ठिकाणीं उभा राहून आर्या ह्मणतो.)

### आर्या.

ऐसयाभगिनीदेउनि लाजिरवाणेजगांतहेंजगणें॥
हानीयाहूनदुजी कायअसेतें?धवादुजेंवरणें॥१॥

(आर्येचा स्वर ऐकून मूर्छित पडलेली रुक्मिणी एकाएकीं सावध होऊन रुक्मि

याच्या खोलीकडे जाऊन दार उघडून रुक्मियास रागाऊन ह्मणते.)

**रुक्मिणी**— दादा! तुह्मी आतां जी आर्या ह्मटली आणि तिच्या पूर्वी जे कांहीं शब्द बोललां ते कोणत्या हेतूनें बरें?

**रुक्मिया**— (अंमळसें रागावल्या सारिखें करून) तर काय? तूं आतां तसल्या चोर जारशुकुटमणी गौळ्याची पट्टराणी होणार वाटतें, परंतु आकां साहेब! मी त्यासाठी बुद्धीनाठी या ह्मणी प्रमाणें ह्मातान्याच्या आणि तुझ्या विच्यारानें वागणारा नव्हे. कारण कालगती प्रमाणें आपला बाप लवकरच मेला असतां त्यापुढें संबंधी पणानें तसल्या नष्टाशीं आह्मास वागावें लागणार याकरितां या विवाहाच्या कामीं बाबानीं आमचा विच्यार घेतला पाहिजे.

**रुक्मिणी**— (हसून) दादा! तुह्मी तारुण्याचे धुंदींत मर्यादा सोडून महापवित्र आपल्या तातांस दुरुत्तरें कां बरें बोलतां? सूक्ष्म दृष्टीनें विच्यार करा कीं, तुह्मी या जगांत उत्पन्न होण्यापूर्वीं ते झाले असून त्यांणीं तुह्मास उत्पन्न केलें, तेव्हां तुमच्या उत्पत्ती पासून हाकाळ पर्यंत जें तुमचें ज्ञान वाढलें आहे त्या पेक्षां त्यांचें ज्ञान किती वाढलें असेल बरें? तेव्हां ते जें काम करितील त्याचा पोक्तपणानें विच्यार केल्या वाचून करणार नाहींत. हें एक आणि दुसरें त्या कामांत कांहीं माझेंही मत पूर्ण असलें पाहिजे. (इतकें बोलून क्रोधाविष्ट होऊन आपल्या खोलींत जाते.)

**रुक्मिया**— (ती जातांच दारांत येऊन) कोण आहे रे पाहाऱ्यावर?

**सेवक**— जी सरकार मी सेवक आहें. (असें बोलून हात जोडून पुढें येऊन उभा राहातो.)

**रुक्मिया**— जा आणि जोशी बावास सत्वर बोलावून आण (असें ऐकतांच तो जातो) (तो गेल्या वर आपणाशींच) इची खोडच मोडतों पाहा आतां कशी ती.

**सेवक**— (जोश्यास घेऊन येऊन) सरकार, जोशी बावा द्वारा बाहेर आलेआहेत.

**रुक्मिया**— (सेवकास) बरें आहे आंत येउंदे. (इतक्यांत जोशीबावा आंत येतात. त्यांस पाहून) यावें जोशीबावा मी वंदन करितों.

जोशी०– (ओंजळ पसरून) ऐश्वर्याभिवृद्धिरस्तु. (असें बोलून बसतात आणि प्रश्न करितात. सरकार येण्याविषयीं सरकारानीं दूताबरोबर किमर्थ पाचारण पाठविलें ?

रुक्मिया– पाचारण पाठविण्याचें कारण इतकेंच कीं, प्रस्तुत आमच्या तातानीं रुक्मिणीस वर योजना कृष्णाची केली आहे ही ठिक नसून आह्मी आपल्या मतें चैद्य देशींचा राजा शिशुपाल योजिला आहे ही गोष्ट आपले मतास कशी येते बरें ?

जोशी०– सरकार! अत्युत्तम आहे.

रुक्मिया– बरें तर आपण घटिताचा विच्यार करून लग्नपत्रिका तयार करून आणावी.

जोशी– युवराज! आपले आज्ञे प्रमाणें आणतों. (असें बोलून जातो.)

---

## अंक १
## प्रवेश ३.
## स्थळ.
## राजवाड्यांतील रुक्मिणीचीखोली.




## पात्रें.

| | | | |
|---|---|---|---|
| रुक्मिणी | भीमकराजाचीकन्या. | डाळिंबी | रुक्मिणीची दासी. |
| शुद्धमती | रुक्मिणीचीमाता. | इतरसुवासिनी | ग्रामवासीब्राह्मणस्त्रिया |

**रुक्मिणी**—( एकटीच खोलीचें दार बंद करून दुःखानें माशा सारिखी तळमळत बिछान्यावर लोळत आहे पुनः उठोन खोलीमध्यें इकडे तिकडे फिरत आहे मों मध्येंच बेसावध होऊन भूमीवर पडते. नंतर कांहीं वेळानें सावध होऊन उठून गालावर हात ठेवून बसल्यावर आपणाशीं ) आतां कसें करावें बरें? रुक्मियानें तर मोठेंच विघ्न आणिलें आहे. आणि माझा निश्चय तर श्रीकृष्णावांचून कोणासच माळ घालावयाची नाहीं असा आहे. तर आपला हेतु कोणत्या उपायानें सिद्ध होईल बरें? काय अनुष्ठानें करावींत, किंवा तीर्थाटणें करावींत, अथवा देवतांस नवस करावेत काय करावें तरी काय? ही गोष्ट तर सिद्ध झालीच पाहिजे. पहा जसे ईश्वरप्राप्तीस कामक्रोधादिक आड येतात किंवा विवेक होण्याचे वेळेस गर्व आणि मद उत्पन्न होतात, तसा हा माझा भाऊ मला माझ्या प्रियाच्या संयोगांत आड आला आहे तथापि. ( असें बोलून )

ओवी

एकनाथाची.

जैसाविवेकवैरागी॥सिद्धिजिणोनिलागेआंगीं॥तैं
सामर्थ्यकृष्णालागीं॥करीलआंगींदेखा॥ १ ॥

( ही ओवी म्हटल्या बरोबर तिचें मन पूर्ववत् एकाग्र होऊन विस्मृती पावते; नंतर कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन ) हें वर्तमान मातेस कळविलें तर ती माझे इच्छेप्रमाणें प्रियकराची प्राप्ती होण्याविषयीं मला अनुकूल होईल किंवा दादाचे मतास रुकार देईल यानिषयीं तर संशयच आहे. तेव्हां आपले आपणच धैर्यबलानें आपला हेतु सिद्धीस जाण्या करितां, वायनदानादि हळदि कुंकुमाच्या निमित्तानें ग्रामांतील सर्व सुवासिनीस बोलाऊन युक्तीनें त्यांजकडून कोणा विप्राकरवें हातीं प्राणनाथास आज पत्रिका लिहून पाठवावी हेंच उत्तम आहे. ( असा विचार योजून तरनें लेखनसामग्री घेऊन एकाग्र अंतःकरणानें पत्रिका लिहूं लागते. )

## श्लोक.

श्रुत्वागुणान्भुवनसुंदरशृण्वतांतेनिर्विश्यकर्णविव
रैर्हरतोऽगतापं॥ रूपंदृशांदृशिमतामखिलार्थलाभंत
य्यच्युताविशतिचित्तमपत्रपंमे॥१॥ कात्वामुकुंदमह
तीकुलशीलरूपविद्यावयोद्रविणधामभिरात्मतुल्यं
॥ धीरावतीकुलवतीनवृणीतकन्याकालेनृसिंहनरलो
कमनोभिरामं॥२॥ तन्मेभवान्खलुवृतःपतिरंगजा
यामात्मार्पितश्चभवतोऽत्रविभोविधेहि॥ मावीरभा
गमभिमर्शतुचैद्यआराद्गोमायुवन्मृगपतेर्बलिमंबु-
जाक्ष॥३॥ पूर्तेष्टदत्तनियमव्रतदेवविप्रगुर्वर्चनादि-
भिरलंभगवान्परेशः॥ आराधितोयदिगदाग्रजएत्य
पाणिंगृह्णातुमेनदमघोषसुतादयोऽन्ये॥४॥ श्वोभा
विनित्वमजितोद्वहनेविदर्भान्गुप्तःसमेत्यपृतनापति
भिःसमेतः॥ निर्मथ्यचैद्यमगधेशबलंप्रसह्यमांराक्षसे
नविधिनोद्वहवीर्यशुल्कां॥५॥ अंतःपुरांतरचरीमनि
हत्यबंधूंस्त्वामुद्वहेकथमितिप्रवदाम्युपायं॥ पूर्वेद्युर
स्तिमहतीकुलदेवियात्रायस्यांबहिर्नववधूर्गिरिजामु
पेयात्॥६॥ यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनंमहांतोवांछं-
त्युमापतिरिवात्मतमोपहत्यै॥ यर्ह्यंबुजाक्षनलभेय
भवत्प्रसादंजह्यामसून्व्रतकृशान्शतजन्मभिःस्यां
॥७॥

(या प्रमाणें सप्तश्लोकी पत्र लिहून पुनः अक्षरशः विचार पूर्वक वाचून पाहून आपणाशीं) यांत अशुद्ध तर दिसत नाहीं (असें बोलून पत्राचा लखोटा करून त्याजवर शिक्क्याचें [illegible]) पत्रिकेची तयारी तर यथास्थित

ऊन कळीव.

डाकिं०–(हात जोडून) आज्ञा बाईसाहेब. (असें बोलून जातें.)

रुक्मि०–(ती गेल्यावर पत्राचा लखोटा पुनः हातीं घेऊन) आतां हें पत्र फार लवकर प्राणनाथाकडे गेलें पाहिजे. (इतक्यांत डाकिंबी येते.)

डाकिं०–(जवळ येऊन) आईसाहेबांची स्वारी यावेळेस महाराजांपाशीं कांहीं गोष्टी बोलत बसली आहे.

रुक्मि०–चांगली संधी आहे तर तूं ब्राह्मण सुवासिनी लवकर घेऊन ये जा कशी.

डाकिं०–आज्ञा सरकार. (असें बोलून जाऊं लागते आणि पुनः थांबून) पण त्या आल्यावर त्यांचा बसण्याचा वगैरे बेत कोठें करावयाचा ?

रुक्मि०–कायगे। हें देखील तुला कसें कळत नाहीं ? काय आपल्या वाड्यांत जागा कमी आहे ?

डाकिं०–तसें नव्हे. महाराज! आपलें निमंत्रण सुध्धा संकेताचें आहे तेव्हां त्यांत कांहीं थोडेंसें जरीं चुकलें तरीं तें आपणास फारच दुःख देणारें होईल, म्हणून भयास्तव प्रश्न केला.

रुक्मि०–समजलें, देवघरा समोरचे सात खणींत बैठक घाल, आणि अबदार खान्यांत विडे बांधण्याची ताकीत कर; आणि महालाकडील दिवाणजीस एथवर मजकडे पाठवून दे; जा लवकर आतां उशीर लाऊंनको. (ती जाते इतक्यांत शुद्धमती रुक्मिणीच्या खोलींत येऊन पाहाते तों.)

## साकी.

वामकरावरिगाल्हुठेवुनीबसलीमननकरीत ॥ झाला
जरिंतरिंम्लानमुखेंदुबहुचिन्तासहरीत ॥ १ ॥

शुद्ध०–(जवळ येऊन तिचा हात धरून) अगेजिवलगे रुक्मिणी। आतां तुझी प्रकृति कशी आहे ?

झाली, परंतु ही पत्रिका आतां तेथपर्यंत लवकर जाते कशी? (ह्या विचारांत आ हे इतक्यांत कोणी दाराजवळ येऊन दार वाजवूं लागते, तें ऐकून लवकर एकी कडे ठेवून) कोण आहे गे दाराजवळ?

डाळिंबी- जी सरकार मी आपली दासी डाळिंबी आहें.

रुक्मिणी- (तिजला दार उघडते, आणि ती आंत आल्यावर आनंद पावून ला डानें तिजसीं) गडे डाळिंबे ह्यावेळेस तूं मजकडे आलीस हें फारच चांगलें झा लें. तूं तर मोठी दैववान् आहेस. कारण आज तूं मजकडे अत्यत्तम वेळेस आ ली आहेस. (तिची पाठ थोपटून) शाबास.

डाळिंबी- (हात जोडून) बाईसाहेब! यांत माझें नशीब तें काय आपण व र्णिलें? सरकारच्या पायांपाशीं हजर राहावें हा आह्मासेवकांचा धर्मच आहे.

रुक्मिणी- अगे, होय. ह्मणूनच तुझें भाग्य मोठें कीं, ह्या सर्वांपेक्षां तूंच या वेळेस माझे दृष्टीस पडलीस.

डाळिंबी- बरें आहे बाईसाहेब! आपले बोलण्या प्रमाणेंच कां होइना प रंतु सरकारची आज्ञा काय आहे?

रुक्मिणी- आज्ञा इतकीच कीं, आज ह्या ग्रामातील ब्राह्मण सुवासिनीस बोलावू न आण ह्मणजे मागें आपल्या कुलदेवतेस आपण नवस केल्या प्रमाणें सौभा- ग्यप्रद अशीं मंगलवायनें वाटूं.

डाळिं०- सरकार! आज्ञा तर उत्तम झाली. परंतु आतांच हें कार्य करण्या करि तां जरूरीचें कारण काय? अज कांहीं महापर्वणी असावी असें वाटतें.

रुक्मि०- होय महा पर्वणीच आहे परंतु तिचा पर्वकाळ लागण्यास कांहीं अव काश आहे; परंतु सुवासिनी जमतील ह्याच त्याचा आरंभ आहे.

डाळिं०- फार चांगलें आहे, आज्ञे प्रमाणें तयारी करून सरकारच्या कानावर घालण्यास सत्वर हाजर होतें.

रुक्मि०- बरें आहे, परंतु आईसाहेब काय करिताहेत हें तूं मला अगोदर ये-

# अंक १

## प्रवेश ४.

### स्थळ.

राजमंदिरांतील देवघरासमोरची सा
तरवणी.



## पात्रें.

रुक्मिणी ---------------------------------------- राजकुमारी.
दिवाणजी ---------------------------------------- राजाचा कारभारी.
आविंबी ---------------------------------------- रुक्मिणीची दासी.
लवंगी ---------------------------------------- रुक्मिणीची दुसरी दासी.
सुबुद्धि ---------------------------------------- उपाध्यायपत्नी.
लक्ष्मीबाई ---------------------------------------- गांवाची ब्राह्मणस्त्री.
सुदेव ---------------------------------------- गांवाचा एक तरुण ब्राह्मण.
इतर सुवासिनी ---------------------------------------- गांवांतील ब्राह्मणस्त्रिया.

रुक्मि०–(हळुच) आई साहेब! आतां बरी आहे. आणि मधांशीं जो अनर्थ झाला होता त्या करितां आपल्या डाळिंबीनें कुलदेवतेस नवस केला होता तो पूर्ण करण्या करितां ती मला येथें बसवून गेली आहे.

शुद्धू०–असो तें सर्व मग होईल, परंतु सध्या तुझ्या उपहाराची वेळ झाली यास्तव अगोदर जाऊन स्नानादिनित्यकृत्य संपीव.

रुक्मि०–होय आई! ही पाहा स्नानास निघालें (असें बोलून मंद मंदगतीनें जाऊं लागते तों डाळिंबी येते.)

डाळिं०–सरकार! सवासिनी द्वारापाशीं आल्या आहेत.

रुक्मि०–बरें तर त्यांस निर्दिष्टस्थळीं नेऊन बशीव.

डाळिं०–उत्तम आहे. (असें बोलून जाते.) (इतक्यांत सवासिनी येऊं लागतात त्यांस पाहून.)

रुक्मि०– बायानो! तुह्मी सर्वजणी कृपा करून देवघरा जवळचे सातरवणींत बैठक घातली आहे तेथें बसा. तंव मी स्नान करून येत्यें. (असें बोलून स्नानास जाते.)

विदूषक–(पडद्याबाहेर कंबरेवर हात ठेवून मोठ्यानें) अहोनाटकाचार्य अहोनाटकाचार्य!

सूत्रधा०– कायरे वेड्या! आतां समय कोण गर्दीचा आला आहे आणि तूं उगाच रिकाम्या हाकांमागें हाका कशा करितो आहेस? आपलें काम कर.

विदूष०–(समाजाकडे वळून) पहा ह्या नाटकास नाटनापोर, तेवढें आपलें दुंगण झांकलें ह्मणजे झालें; पण माझ्या मागें सखी, ठकी, उमी, रंगी अशा सत्तावीस तर उनाड्या बायका आहेत, व त्यांच्या तीनशें अंगावर अरुण शिवाय आंगवस्त्रें आहेत, तर ह्या समयास त्यांतून कित्येक ह्या सवासिनीमध्यें आणून सोडल्या तर कित्येकांस खाऊ मिळतील, कित्येकांस पैठण्या मिळतील, कित्येकांस लुगडीं नाहीं पैसा एक एक चांदीचा रुपया व एकेक मोहोर दक्षणात न कोठें गेली नाहीं? (असें बोलून जातो.)

रुक्मि०–(आपलें नित्यकृत्य संपवून देवघराचे दारांत येऊन) कायगे डाळिंबे! सर्व सुवासिनी आल्या आहेत ना?

डाळिं०–(हात जोडून) जी सरकार त्या तर केव्हांच्या येऊन बसल्या आहेत.

रुक्मि०–(डाळिंबीस) दिवाणजी व जामदार या दोघांस लवकर घेऊन ये.

डाळिं०–(हात जोडून) आज्ञा सरकार (असें बोलून जाते.)

रुक्मि०–लवंगे! पळत जाऊन ती डाळिंबी येत आहे किंवा तेथेंच बसली तें पहा. (इतक्यांत डाळिंबी येते.)

डाळिं०–(हातजोडून) सरकार! त्याणीं हे आह्मी आलोंच असें सांगितलें.

रुक्मि०–बरें तर अबदार खान्यांतून विडे आणीव जा. (ती जातांच सुबुद्धिना मक उपाध्याय पत्नीस) सुबुद्धिके! तुह्माकडील हळदी कुंकुमा सुद्धा पूजासाहित्याची तयारी सर्व यथास्थित आहेना?

सुबु०–राजकन्ये! होय. (इतक्यांत दिवाण व जामदार असे दोघेही येतात.)

दिवाण०–(हात जोडून) काय आज्ञा आहे? मी सरकारच्या प्रकृती विषयीं चिंताक्रांत होऊन बसलों होतों इतक्यांत आपणा कडून जरूरीचें बोलावणें आलें ह्मणून आलों.

रुक्मि० बरें केलेंत. या वेळेस माझ्या तातांची प्रकृती बरी आहे, ह्मणूनच मी आज हा समारंभ केला आहे. तर ह्या सर्व बायांस पुरेसीं लुगडीं आणि चोळ्यांचे खण असें सामान कापडाचे जामदार खान्यांतून आणवा. (असें बोलून जाम दारा कडे वळून) ऐकिलेंत काय जामदार सदहू प्रमाणें सर्व सुवासिनीस दक्षणे करितां मोहोरा आणवा. (इतक्यांत सर्व कारखानदार आपआपल्या सामानाची तयारी करून दिवाणजीस सुचवितात.)

दिवाण०–बाईसाहेब! सर्व तयारी आहे. आतां पूजनास आरंभ करावा.

रुक्मि०–(सुबुद्धीकडेपाहून तीस) या तुह्मी पुढें व्हा आणि पूजासाहित्य आणा. (लवंगीस) अगे अपकरा (झारी) तस्त आणि उष्णोदक आणावयास सांग,

आणि मध्यें एक रत्नखचित चौरंग मांड.

**लवंगी**– सरकार ! आपले आज्ञे प्रमाणें सर्व तयारी झाली आहे.

**रुक्मि०**–(पुढें होऊन सुवासिनीस) या पातिव्रत्य धर्मनिष्ठ महापवित्रशील दर्शन मंगलदायि सुवासिनी समाजास माझे सहस्रशः प्रणिपात असोत.

**सर्वसुवासि०**– राजकन्ये ! तुझे सर्व मनोरथ पार्वत्यादि महादेवतांच्या कृपेनें परिपूर्ण होवोत.

**सुबुद्धि**– रुक्मिणी बाई आतां यांचें पादप्रक्षालन करण्यास आरंभ करावा.

**रुक्मि०**–(चौरंगा जवळ जाऊन दासीस) लवंगे ! तें तस्त पुढें सार, डाळिंबे! ती उष्णोदकाची झारी घे. (सुवासिनीस आदरानें) याहो कृष्णाबाई चौरंगावर बसा. (ती येऊन लुगडें सांवरून चौरंगावर बसते.) (तिचा पाय हातीं घेऊन डाळिंबीस) जपुन पाणी घाल नाहीं तर यांच्या आंगावर शिंतोडे उडतील हो. (पाय धुवून आपले पदरानें चांगले पुसून उपाध्यायपत्नीस) सुबुद्धिके यांस हरिद्रा कुंकुम दे, केशर कस्तूरीची उटी लाव. त्यांतून (ह्मणजे तेथेंच जवळ सुवासिनींस देण्या करितां जें वस्त्रांचें दिंड सोडून ठेविलें होतें तिकडे बोट दाखवून) पिवळी पैठणी उकलून हातीं दे. (पैठणी नेसल्या नंतर) चोळी आंगांत घालावयास दे. (दासीस) लवंगे ! तें मोहारांचें तांट इकडे आण. (सुवासिनीस) ओटी पुढें करा. (असें ह्मणून दोहीं हस्तानीं पांच ओंजळी मोहोरा तिच्या ओटींत घालून विडा देऊन मार्गस्थ केल्यावर) (लक्ष्मीबाईस) याबाई. (ती येते आणि तिचे पाय धुवून) तुमच्या शारदाबाई खुशाल आहेतना?

**लक्ष्मी०**– होय. ती आली आहे ही.

**रुक्मि०**– बरें तर त्यांचे चिरंजीव ते सुदेवभटजी एथें आले आहेत काय?

**लक्ष्मी०**– नाहीं त्याला आज बरोबर आणण्याचें कारण नव्हतें ह्मणून आणला नाहीं.

रुक्मिणी—(हळुच) ठिकच आहे. परंतु त्यास एथवर आणलें पाहिजे.

लक्ष्मी—उत्तम आहे मी त्यास घेऊन येतें. (असें बोलून जात्ये.)

रुक्मि०—(सर्व सवासिनींस) बायानो! तुमचीं सर्वांचीं नावें मला माहित नाहींत याकरितां हाक मारण्याचा अनुक्रम श्रमावह होणार नाहीं यास्तव तुह्मीच कृपा करून एकीमागें एक अशा क्रमानें उठा ह्मणजे हें कर्म थोडक्या वेळांत सांग होईल.

सर्वसुवा०—फार चांगलें आहे. ही तजवीज आमची आह्मी ठेवतों. (सर्वांची पादप्रक्षालनादि फलप्रदानांत सांग पूजा करून रवानगी करते आहे तों पुढें सुदेव आणि मागें लक्ष्मीबाई अशीं दोघें येतात.)

लक्ष्मी—बाईसाहेब! हा सुदेव आज्ञे प्रमाणें आणिला आहे.

विदूष०—(सूत्रधारास) अहो! ही बाई ह्मणते कीं, हा सुदेव आणिला आहे. तर आतां यास लुगडें नेसवून हळद कुंकू देणार काय?

सूत्रधार—छेः वेड्या. पुरुषांस कोठें लुगडें नेसवून हळद कुंकू देतात काय?

सर्वसुवा०—हा कोणी नदात्या आहे वाटतें

रुक्मिणी—(हंसून) असोंद्या बायानो. हीं आमच्या ताताचीं राजचिन्हें आहेत. (असें बोलून,सवासिनी जातांच सुदेव आणि लक्ष्मीबाई यांस घेऊन आपल्या खोलीत जाते.) सुदेवा! तूं माझ्या बांधवांपैकींच आहेस असें समजून तुला कांहीं शुभ कार्य सांगावयाचें आहे; तर तें कोणास न कळवितां तूं करशील?

सुदेव—होय बाईसाहेब! मी जर असें सरकारचें कार्य न करावें तर माझ्या जन्माचें सार्थक करणारें दुसरें कामतरीं कोणतें आहे?

रुक्मिणी—(लक्ष्मी बाईस) कसें लक्ष्मीबाई! यांस सागूं?

लक्ष्मी—होय सांगावें. हा सरकारचे विश्वासास पात्र आहे.

रुक्मिo—बरें तर ऐका. (असें बोलून रुक्मिणी शिरसावंदन करून आणाशीं)

## आर्या

### एकनाथाची.

ओंनमोजीयदुवीरा॥तूंचिनिर्विकारिनोवरा॥मजन्या
वेंजीनिजमंदिरा॥हीपत्रिकादेखूनियां॥१॥ ॥

(तो लखोटा सुदेवाचे हातीं देऊन) ही पत्रिका द्वारकावासी श्रीकृष्णनाथाचे हस्तग-
त सत्वर झाली पाहिजे, आणि परमेश्वरास माझी सविनय विनंती कळवा कीं, आपल्या
च उक्तीची लज्जा आपण धरून दासीचा मनोरथ परिपूर्ण केला पाहिजे.

**सुदेव.**— सरकारच्या आज्ञे प्रमाणें हें कार्य मला कर्तव्य असून यांत माझी पुरु
षार्थसिद्धीही आहे, तरीं आपण कांहीं काळजी करूंनये, लेखनानुकूल श्रीकृष्ण-
आहेत असें समजून स्वस्थ असावें आणि आतां लवकर आह्मास निरोप द्यावा.

**रुक्मिणी.**— फार उत्तम आहे. ह्या तुह्मास मार्गसामग्री करितां मोहोरा घ्या.
(असें बोलून ओंजळ भरून मोहोरा देते.) आतां ह्या देवाचें नांव आणि कार्य क
रून सत्वर या.

## ओव्या.

### एकनाथाच्या.

मनोवेगाचापैंवारू॥त्यावरीबैसविलाद्विजवरू॥ कृ
ष्णापाशींसत्वरू॥समूळमूळपाठविला॥२॥ माझे
पूर्वपुण्यें तूं द्विजवरू॥ कृष्णप्राप्तीसीमजतूंगुरू॥
ह्मणूनिकेलानमस्कारू॥ वेगींयदुवीरूआणावया॥
३॥स्वामिचरणींठेविलामाथा॥ द्वारकेसिजावेंजीत
त्वता॥प्राणवांचवीहोआतां॥ वेगींकृष्णनाथाआणावें
॥४॥

**लक्ष्मीबा.**— येतों तर आतां आह्मी (असें बोलून जाऊं लागतात तों)

**रुक्मि.**— (लक्ष्मी बाईचे उपकार स्मरून) लक्ष्मीबाई। हें माझें स्मरणार्थ तुल

झाले आहेत, बागामध्यें गुलाब, मोतिया, शेवती, चमेली, मोगरा, जाई, जुई वगैरे फुलझाडांस भर आल्यामुळें व ठिकठिकाणीं दवणा, पाच, मरवा यांचे तुकडे-गर्द लागून गेल्यामुळें रस्त्यांतून चहूंकडे मधुर सुगंध, मंद आणि शीतल अशा वायूच्या लहरी मधून वाहात आहे; कोकिळा, मयूर, कीर इत्यादि पक्ष्यांचे मंजुळ स्वरानीं आकाश भरून गेलें आहे, सभोवती निरनिराळ्या धान्यांचीं शेतें कांहीं फुललेलीं व कांहीं पिकास आलेलीं दिसताहेत; डोंगराचे कडे कोठकोठें तुटलेले व कोठकोठें मेघमंडळा पर्यंत उंच गलेलीं शिखरें दिसताहेत, कित्येक ठिकाणीं डोंगरा वरून पाणी पडून त्याच्या मोठमोठ्या नद्या होऊन दोहींथडयानीं भरून त्यांचे नागमोडी पटे तर फारच रमणीय वाहातांना दिसताहेत; कित्येक ठिकाणी तलाव भरलेले असून त्यांतून अनेक प्रकारच्या रंगाचीं कमलें-उमललेलीं असल्यामुळें ते दुसऱ्या सुशोभित पदार्थांपेक्षां पांथस्थाचे चित्तास तर फारच आनंद देताहेत; रानामध्यें हरणाचे कळप धावताहेत, गुरें चरताहेत, पांथस्थ लोक कित्येक पायीं, कित्येक घोड्यावरून, कित्येक गाड्यांतून असे निर्निराळ्या मार्गानें जाताहेत, कित्येक उष्णाते मुळें त्रास पावून वृक्षांचे शीतल छायेस बसून वस्त्रानें वारा घेताहेत, मार्गावरील कित्येक शहरें व खेडीं यातील मनुष्यांचा व डोंगर, रानें, नद्या, बाग बगिचे पशु पक्षी इत्यादिकांचा चमत्कार पहून जगन्नियंत्या सर्वशक्तिमान ईश्वराचे गुणानुवाद गात गात सुदेव कौंडिण्यपुराहून निघून द्वारकेचा मार्ग क्रमण करीत आहे तों.

### ओवी

### एकनाथाची.

द्विजपावला द्वारका॥ वैकुंठकैलासाहूनि अधिका॥ जेथें निवास जगन्नायका॥ विश्वव्यापका श्रीकृष्णा॥१॥

सीपत्र ग्रहण करावें. (असे बोलून आपले गळ्यांतील रत्नखचित हार काढून तिच्या गळ्यांत घालून साष्टांग प्रणिपात करून ) यावें आतां परंतु तुर्त हें वर्तमान बाहेर नकळे असी पक्की तजवीज ठेवावी.

लक्ष्मी-(आनंद पावून) हेराजकन्ये! तुझे संपूर्ण मनोरथ परिपूर्ण होवोत.

(असें बोलून दोघेंही लगबगीनें निघूनजातात.)

---

## अंक १

## प्रवेश ५.

### स्थळ.

### द्वारकेंतीलकृष्णमंदिर.




### पात्रें.

श्रीकृष्ण ---------------------------------------- यादवेंद्र.

सुदेव ---------------------------- रुक्मिणीकडूनपत्रिकाघेऊनआलेलाब्राह्मण.

नुकताच चैत्रमास संपून वैशाख मासास आरंभ झाला आहे तों वसंत ऋतु ऐन भरास आल्यामुळें बागा, रानें, डोंगर ह्यांतील वृक्षांस नवीन पालवी फुटली आहे, आंबे, पणस, अंजीर, द्राक्ष इत्यादिवृक्ष चहूंकडे पक्क फळांनीं नम्र-

सुदेव.- (आनंद पावून) अहाहा!! काय तरी हें शहर रमणीय आहे हो। या नगरीच्या आसमंताद्भागचे बाग पाहून जिवास आराम होतो तेव्हां अर्थात् शिवाश होईलच यांत काय संशय? येथें वसंत तर पुष्पामध्यें फुलूनच राहिला आहे; तसेच कमलांवर भ्रमर गुंजारव करिताहेत कीं ज्यास ऐकून गंधर्वही लाजतान आणि सामवेद ही स्तब्ध होतात; येथें पारव्याच्या रवा प्रमाणें प्रबोध धुमधुमल्या सुळें वागीश्वरी चकित झाली आहे; आणि या द्वारकेचें सौंदर्य वर्णन करण्यास बृहस्पतीही विस्मय पावतो, मग इतर देवादिकांची तर कथा काय? पाहा हे द्राक्षांचे घोंस जसे मोत्या प्रमाणें डोलताहेत ज्यांत अत्यंत मधुररस आहे. कोकिलादि पक्षी सुस्वर शब्द करिताहेत तेणें करून सनकसनंदनादिकांची वृत्ती आनंदमय होत आहे; मयूर नृत्य करिताहेत हें पाहून तर अप्सरा लाजतात. तर विशेष काय शंकरही तांडव विसरतात; कारण येथें साक्षात् परमेश्वर नादत आहे; या द्वारकेंतील रावे, पिंगळे यांच्या भाषणानीं वेदांतही दचकेल असें भासतें; या नगरींतील मार्गावरचे सडे पाहून असें वाटतें कीं, चीझ पिकून त्या पाण्यानें तर हे घातले नसतील? जिकडे तिकडे मंदिरांवर पताकांची गर्दी जाहाली आहे; मनोऱ्यावर सुवर्णाचे कळस विद्युल्लते प्रमाणें चमकत आहेत; रस्त्यांतून कारंजे उडताहेत; लोक जिकडे तिकडे आनंदानें ईश्वराचे गुणानुवाद गाताहेत. (या प्रमाणें ती द्वारकेची रचना पाहून चकित होत्साता)

पद.

चाल आणाधरो.

द्वारावतीप्रति द्विजवरयेता॥ तेथील झाला स्थितितें मेता॥ ध्रु०॥ जींतील रचनेंच्या अभिनवपरी॥ चिंतामणिच्याचिंताहरी॥ कल्पतरूचीवासनावरी॥ कल्पनाकारआणित्यापरिवेता॥ द्वारावती०॥१॥ वैकुंठकायकींअन्य असेहे॥ भासतसेंमज्ञिभ्रांतसेहें॥ पा

येनकैसेतेंयामीदेहें ॥ सफलभजरींहोईईश्वरदेता॥
द्वारा०॥२॥ कार्यगतीनेंशीघ्रनिघाला ॥ राजगृहा-
च्यासन्निधआला॥ पाहूनआसनस्थितविभुत्या
ला॥ टाकीउडीधरिकरिस्यायेतां ॥ द्वारा० ॥ ३॥

श्रीकृष्ण– ( द्विजवरास पाहून ) भूदेवा ! या, सिंहासनावर बसा.

सुदेव.– होय यादवेश्वरा ! (असें बोलून सिंहासनावर बसतो; ) (नंतर श्रीकृष्ण - त्याची षोडशोपचार पूजा करून त्यास भोजन घालून एकांतीं स्वस्थ शय्येवर निजवून आपण त्याचें पाद संवाहन करितात, तेव्हां ब्राह्मण बोलतो. ) देवाधिदेवा ! तुझी पूजा आह्मी करावी तें एकीकडे राहून, तूंच आमची सेवा करितोस हें आहे तरी काय ?

श्रीकृष्ण– विप्रवर्या ! तुह्मी ब्राह्मण माझे देव आहां मी तुमच्या पूजनानेंच या योग्यतेस आलों.

सुदेव.– हे यज्ञपुरुषा नारायणा ! आपण सांगितलेंत कीं, ब्राह्मण माझे देव आहेत तर आपण जे ब्राह्मण आपले देव योजितां त्या योग्यतेचा मी नव्हे हें आपण जाणतच असाल.

श्रीकृष्ण– तें असो पण तुह्मी सर्व्या आहां कीं, कां कीं, ज्यास चिंतेनें गांठिलें त्याचें मन सर्वकाळ दुःखांतच असतें. आणि जो स्वतः निष्कांचन असल्यामुळें तिळमात्रही चिंता करीत नाहीं तो मला जिंकितो आणि मी त्याचा बंदिजन होय; तर जे निरपेक्ष, सर्वभूतांशीं सद्भाव ठेवणारे ते मला सर्वकाळ पूज्य आहेत. (असें बोलल्यावर आपणाशीं, माझें वैभवादिक पाहून ब्राह्मण अत्या नंदित होऊन आपलें कर्तव्य कार्य विसरला असें जाणून पुनः देव त्यास विचारितात.) ब्राह्मण श्रेष्ठा ! आपण कोठून आलां ? आपल्या गांवाचें नांव काय ? आपल्या देशाचा राजा स्वधर्मा प्रमाणें प्रजा पालन करीत आहे कीं ? आपण मोठ्या संकटाचा मार्ग क्रमून मद्देशानें येथें आलां तर आपल्या मनांतील

हेतु असेल तो मला सांगा. कारण आह्मी ब्राह्मण भक्त आहों तेव्हां तुमचें इच्छित पूर्ण केलें पाहिजे तर जी तुमची इच्छा असेल ती पूर्ण करीन अशा प्रकारें तुह्मास हें त्रिवार वचन देतों तर ती मला कळवा.

सुदेव.– (आपणासीं श्रीकृष्ण मी कांहीं नसांगतां अगोदर वचन देताल हा एक मोठा शुभ शकुन आहे तस्मात सर्व वृत्त यांस निवेदन करावें.) देवा ऐकावें; विदर्भ देशाचा राजा भीमक त्याची कन्या रुक्मिणी जी उदार, सुंदर, गुणगंभीर, ज्ञानी, चतुर अशी, ती तुझ्यापायीं फार तत्पर झाली आहे आणि ती तुला वरणार आहे.

श्रीकृष्ण– (स्वचित्तांतली गोष्ट ऐकतांच ब्राह्मणाची पाठ थोपटून) शाबास सुदेवा शाबास !!

सुदेव.– परंतु श्रीकृष्णा! तिचा एक वडील भाऊ रुक्मिया याचावाचा आहे त्याणें रुक्मिणी चैद्येश्वर शिशुपालास द्यावयाचा निश्चय करून परवाच्या दिवसीं विवाहाचा निश्चय केला यास्तव रुक्मिणीनें आपणास एक पत्रिका दिली आहे.

श्रीकृष्ण– काय तिणें पत्रिका दिली आहे? तर कोठें आहे ती पाहूं.

सुदेव.– ही घ्या. (असें बोलून कुंकुमानें शोभणारा तो पत्रिकेचा लखोटा देवास देतो.)

श्रीकृष्ण.–(तो घेऊन त्याचें फार प्रीतीनें चुंबन करून वाचतो आणि) आहाहा! काय तरी इच्या लेखनाचें हें चातुर्य हो! पाहा हें पत्र मी वाचतांच ती केवळ मजपुढें उभीच आहे काय असें मला भासलें वाह्वा! कायही मजा.

सुदेव.– हे मुरमर्दना! पत्र आपण वाचलेंत आणि तिचें चातुर्य वर्णिलेंत परंतु तें आह्मास कसें समजावें?

श्रीकृष्ण– ऐका तर आतां (असें बोलून पत्रांतील श्लोकांची समश्लोकी ह्मणूं लागतो.)

श्लोक.

श्रोत्यांनियाश्रवणरंध्रिंरियोनिचित्तीं॥तूझेगुणत्रिविधतापहरीहरीतीं
एकोनियांभुवनसुंदरयागुणातें॥निर्लज्जचित्तहरिहेंतुजलावरीतें॥१॥
जेसर्वलक्षणविचक्षणआणिधीरा॥तेहीतुझेगुणअसोजगदेकवीरा॥
ऐकोनकोणनवरीनवरीललूतें॥निर्लज्जयास्तवझणीह्मणसोलमातें २
ह्यातूजनिश्चितमनेंवरिलेंअनंता॥येउनियांकरिंधरूनिकरीस्वकांता॥
सिंहांगनेसिमगजंबुकअंबुजाक्षा॥नेईलचैद्यजरितूंकरिसीउपेक्षा॥३॥
सर्वेश्वरार्पणविधींकरुनीअगण्यें॥केलींजरीअसतिलेंबहुजन्मपुण्यें॥
येउनियांकरिंधरोमजचक्रपाणी॥हेनातळोनदमघोषसुतादिकोणी॥४॥
लग्नाचियापहिलियादिवसांतयावें॥संगेंसमस्तबळआदवसैन्यघ्यावें॥
याचैद्यमागधबळांक्षुधितेंमथावें॥मातेंनिशाचरविधींकरुनीवरावें॥५॥
अंतःपुरांतुनितुझेनवधूनबंधू॥नेउकसेंह्मणसितूंजरिसौख्यसिंधू॥
याचेकुळींहरिअसेकुळदेवियात्रा॥तेथेंहरूनिमजनेशतपत्रनेत्रा॥६॥
शर्वादिसर्वतुझिइच्छितिपायधूळी॥तूझाप्रसादनव्हतांमजयेस्वकाळीं
जन्मांशतांलभ्मणेस्मरणेंमुकुंदा॥अंतींतुझ्याचिवरणेचरणारविंदा॥७

सुदेव.— हे देवाधिदेवा! या प्रमाणें आपला गुह्यनिदेश मी आणला आहे तर याचा विच्यार करून कायतें करावें.

श्रीकृ०— द्विजवरा! ही लावण्य सरिता महा चतुर आहे. इचा हा कुंकुममंडित लेख वाचावयास प्रारंभ करण्या बरोबर मला असा भास झाला कीं, ती सुंदरी प्रत्यक्ष मजपुढेंच येऊन उभीराहिली आहे काय? वाव्हा! कायहें लेखनचातुर्य! (असें बोलून डोळे मिटून मान हालवून खालीं बसतात.)

सुदेव.— हे कंसविध्वंसा! आतां रात्र फार झाली याकरितां आपण शयन करावें.

श्रीकृष्ण.— फार उत्तम आहे आपणांही या शय्येवर निद्रा करावी (असें ह्मणू

णास सांगून, आपण पलंगावर निजतात आणि त्यास झोंप लागले इतक्यांत झोंपेंतच बोलतात.) हे भीमकी! तूं धैर्य सोडूंनको. हा पाहा मी तुला वरावयास निघालोंच.

सुदेव.— (तें ऐकून भ्यालेंसें करून) काय हें! श्रीकृष्णपरमात्मा झोंपेंत बरळूं लागले काय? तर यांस जागें करावें (असें बोलून त्यांस जागें करून) अहो श्रीकृष्णा! आपण आतां काय बोललां बरें?

श्रीकृष्ण.— काय ह्मणजे प्रश्नाचें उत्तर दिलें.

सुदेव.— अस्तु यांच्या जें मनांत होतें तेंच बोलले.

श्रीकृ०— द्विजश्रेष्ठा! आतां आमची तयारी होईपर्यंत अंमळसी स्वस्थपणें निद्रा करावी.

सुदेव.— होय महाराज (असें बोलून निजतो.)

श्रीकृष्ण.— (आपणाशीं) आतां लवकरच तयारी करून निघण्याची त्वरा केली पाहिजे. परंतु प्रस्तुत रात्र किती झाली असावी बरें? (असें बोलून दिवाणखान्या वरील गच्चीवर जातात आणि आकाशांत नक्षत्रांकडे पाहून) आहा हें विशाखा नक्षत्र मध्यावर येण्यास अद्यापि बराच अवकाश आहे, यावरून अद्यापि पुर्ती दोन प्रहर देखील रात्र झाली नाहीं तर अंमळ वामकुक्षी करावी हें बरें (असा विच्यार करून पुनः गच्ची वरून दिवाणखान्यात येऊन पलंगावर बसल्या नंतर) अरे या पलंगावर वामकुक्षी करण्याची इच्छा मानसाचे ठायीं उत्पन्न झाली आहे तर खरी परंतु जर कदाचित् गाढ निद्रा लागली तर त्यामुळें उशीर तर होणार नाहीं ना? बरें असो काय चिंता आहे आपलें सर्व सैन्य छप्पन्न कोट यादवां सहवर्तमान दळभार सिद्ध करून मोठे थाटानें कौंडिण्यपुरास जाऊन चैद्यदेशचे राजे शिशुपाळ, वक्रदंतादि तेथें जमलेल्या वीरांचा पराभव करून वधू हस्तगत करून घेतली ह्मणजे झालें यांत कांहीं मोठीसी अडचण आहे असें काहीं दिसत नाहीं. (इतक्यांत अंमळ स्वस्थ होऊन शय्येवर आंग टाकतांच निद्रा लागते.)

# अंक १

## प्रवेश ६.

### स्थळ.

### द्वारकेंतीलकृष्णामंदिर.

### पात्रें.

श्रीकृष्ण ---------- द्वारकाधीश.
दारुक ---------- त्याचासारथी.
सुदेव ---------- रुक्मिणीकडूनपत्रघेऊनयेणाराब्राह्मण.
द्वारपाळ ---------- पाहारेकरी.

दिवाणखान्यास पांढरे शुभ्र मलमली कापडाचीं छतें दिलेलीं असोन सभोंवती मोत्यांची झालरी लागलेली आहे; मह्हेरापींतून भरगची किनखापाचे पडदे अर्ध सुटलेले लोंबताहेत; तावदानी खिडक्यांतून वाळ्यांचे पडदे पडलेले आहेत; हिरे, पाच, माणिक, मोत्यें इत्यादिकांच्या झुंबरांतून मेणबत्त्या लागून गेल्यामुळें चहूंकडे लखलखाट झाला आहे; रत्नखचित समयांतून अत्तराचे दिवे जळताहेत; अगरबत्त्या पेटल्या आहेत; पिंजऱ्यांतून रांवे, कीर, चंडोल, कोकिळ इत्यादि पक्षी प्रातःकाळ झाल्यामुळें किजबिजूं लागलेआहेत सतों.

**श्रीकृष्ण**—(एकाएकीं जागृत होऊन) हँः! माझा डोळा लागला होता काय? हे प्रिये रुक्मिणी; भिऊनको भिऊनको, हा पहा मी तुझें पाणिग्रहण करण्या करितां, सैन्य सिद्ध करून येण्यास विलंब लगेल ह्मणोन एकटाच निघालों पहा. अगे रुक्मिणी, इतक्यांत अधीर होऊन देहत्याग करूंनको. (असें बोलून गाऊं लागतात.) :—

### लावणी.

चाल कायमीवाणु॰ राग केदारनाट.

वरिनतुलामीधरुनकोपर्वा कायतोरुक्मियामारु-
निसर्वा ॥ ध्रु॰ ॥ शिशुपाळयाचेहरुनियांगर्वा पाव

सिमत्प्राभिचियापर्वा ॥

(आनंदानें सुस्वर रागास आरंभ केला आहे तों.) :—

**सुदेव.**— (एकाएकीं उगेन) देवाधिदेवा, या वेळेस आपलेंच गायन चाललें आहेअ सें वाटतें.

**श्रीकृष्ण.**— खरेंच, परंतु द्विजश्रेष्ठा, हा रुक्मिणीचा लग्नसमारंभ कोणत्या देशा मध्यें कोणत्या महिन्यांत कोणते दिवसीं कोणाबरोबर होणार बरें ?

**सुदेव.**— (मोठ्यानें हंसोन) हे भक्तपालका, मला भासतें कीं, आपली संपूर्ण वि त्तवृत्ति रुक्मिणीनें भक्तिरूप मोहपाशद्वारें हरण केली असावी.

**श्रीकृष्ण.**— यांत काय संशय ? अहो, ज्या कुमारिकेचें मी अद्यापि मुखावलोक न सुद्धां केलें नसोन जीनें फक्त लेखनद्वारेंच माझे पंचप्राण आकर्षण करून म ला आपले प्राप्ती विषयींची चंद्री लाविली आहे, व माझेही मनांत तिच्या पाणि ग्रहणा खेरीज दुसरा विच्यारच येत नाहीं क्षणोक्षणीं तीच ललना येऊन प्रत्य- क्ष माझे समोर उभी राहून निघण्या विषयींची त्वरा करीत आहे काय? असा भा स होतो. अहाः! काय हा भावार्थ! (द्वारपालास) अरे देवडीवर कोण आहे? तो इकडे ये.

**द्वारपाळ.**— जी महाराज, मी आपल्या चरणाचा दास भैरवाक्ष आहें. (असें बोलून समोर येऊन हात जोडून) काय आज्ञा ?

**श्रीकृष्ण.**— तूं त्वरा जाऊन, दारुकास रथ सिद्ध करावयाचा आहे असें सां गून मजकडे घेऊनये.

**द्वारपाळ.**— आज्ञा महाराज. (असें बोलून रथशाळेंत जाऊन कृष्णाचा यथो क्त मजकूर दारुकास सांगून त्यास बरोबर घेऊन येऊन हात जोडून) सर कार, दारुक आले आहेत.

**श्रीकृ.**— (दारुकास पाहून) या दारुक, तुह्मापासीं थोडेसें नाजुक काम आहे.

**दारुक.**— (हात जोडून नम्रतेनें) देवश्रेष्ठा, कायती आज्ञा करावी. आह्मा

एकनिष्ठ दासांस तादृश शब्दाचा अंतर्वर्ति अर्थ समजत नाहीं.

**श्रीकृष्ण.**– तुम्ही ज्ञानी व चतुर असतां समजून उमजून नाहीं ह्मणतां हें आश्चर्य आहे. अस्तु. आह्मास आतां गुप्तपणें कौंडिण्य पुरास जाणें जरूर आहे या स्तव अश्वशाळेंतील आपले उत्तम अश्वांपैकीं शैव्य,सुग्रीव,बलाहक,हे तीन – आणि चौथा मेघपुष्पअसे च्यार,च्यारी पुरुषार्थां सारिखे वारू जुंपून सत्वर रथ सिद्ध करून येऊन या.

**दारुक.**– आपले आज्ञे प्रमाणें एका क्षणार्धांत तयारी करून विनंति करितों. (असें बोलून जातो.)

**सुदेव.**– यादवेंद्रा, आपलें मानस एकटेंच निघण्याचें दिसतें हें काय?

**श्रीकृष्ण.**– द्विजश्रेष्ठा, ऐक जे आपल्या कार्यार्थ दुसऱ्याची मार्ग प्रतीक्षा करितात त्यांचें प्रायः कार्य होत नाहीं; मग त्यांला यश व कीर्ति कोठून मिळणार आहे?

**दारुक.**– (आज्ञे प्रमाणें रथ सिद्ध करीत आहे तो.)

## ओंव्या
## एकनाथाच्या.

अनर्घ्यरत्नींरत्नखचित॥ गरुडध्वजींलखलखित॥
लोलपताकाडोलत॥ रथशोभतअतिशोभा॥ १॥
शस्त्रास्त्रांचेसंभार॥ रथींघालूनअपार॥ दारुकेंके
लानमस्कार॥ जोडूनिकरउभाराहिला॥२॥

**श्रीकृष्ण.**-(सुदेवाकडे पाहून) भूदेवा, चला आतां आमचे रथांत बसा, नाहीं तर तुह्मास दुवार श्रम होतील, इतकेंच नाहीं, तर मला रुक्मिणीही रागें भरेल.

**सुदेव.**– (कांहींसें संकोचित झाल्या सारिखें करून) बरें आहे तर. (असें बोलून रथास वंदन करून मोठ्या हर्षानें रथांत बसतो.)

**श्रीकृष्ण.**– (रथांत बसून) दारुका, आतां पहातोस काय, पवन वेगें करून कौंडिण्य पुरांतील अंबिकेचे देवालया जवळ सत्वर रथ नेला पाहिजे.

जिकडे तिकडे डेरे राहुट्यांची तर गर्दी होऊन गेली आहे; मला वाटतें हीं आमचे प्रतिस्पर्ध्यांचीं लष्करें असावीं.

**सुदेव.**— देवश्रेष्ठा, मी ह्याच कारणास्तव दळभार समागमें घेण्या विषयीं आपणास विनंति केली होती.

**श्रीकृष्ण.**— सुदेवा, ह्या बापड्या गरिबाची काय बिशाद आहे? पहा उदयीक निमिषार्धांत वधू हिरोन घेऊन मी यांची कशी दाणादाण करून खोडच जिरवून टाकतों ती.

**दारुक.**—(हें भाषण ऐकून सद्गदित होऊन आनंदानें साकी ह्मणतो.)

## साकी.

रुक्मिणिहरणाआलीकरुणा॥ वरुणालयकुतदे
वा॥ कायवऱ्हाडीआलेबिऱ्हाडीं॥ शमनालयिंच
सुदेवा॥१॥


**श्रीकृष्ण.**—(दारुकाकडे पाहून) दारुका, तूं फार चांगले रागांत गाइलेंस, बरें आतां हा रथ येथेंच असूंदे. (सुदेवाकडे पाहून) हे विप्रश्रेष्ठा, आतां आपण आपले यजमानिणीकडे जाऊन तिला कळवा कीं, तुझ्या संकेता प्रमाणें श्री कृष्ण अंबालयीं आले आहेत त्याणीं तुला सांगितलें आहे कीं, मी उदयीक तुझें पाणिग्रहण निःसंशय करणार आहें तरी तूं कांहीं काळजी करूं नको.

**सुदेव.**— देवा, माझा हेतूही असाच होता आणि आतां तर काय आपली आज्ञाच जाहली. हा पहा निघालों (असें बोलून मोठ्या हर्षानें रथांतून उडी टाकून चालता होतो.

---

इतक्यांत पडदा पडतो.

( इतक्यांत रथ भरधांव नियतो. )




**दारुक.**— ( रथावर बसून च्यारी घोडे पवनवेगा प्रमाणें भरधांव चालविले आहेत, इतक्यांत समोर एक सुशोभित नगर पाहून ) हे परमात्मन्, हें समोर जें शृंगारिलेलें नगर फार रमणीय दिसत आहे तें कोणतें असावें बरें ?

**श्रीकृ.**— बापा दारुका, खरेंच, हें शहर फार मनोहर दिसतें त्यापेक्षां ही कौंडिण्यपुरी भीमकराजाची राजधानी तर नव्हे ?

**सुदेव.**— ( त्यांचें बोलणें ऐकून ) होय, हीच कौंडिण्यपुरी. तें पाहा समोर जगदंबेचें देवालय दिसत आहे.

**श्रीकृष्ण.**— हैं ! दारुका, तर आतां वारूला अंमळ स्थिर चालूंद्या. पाहिलें त काय ? हे समोर झाडांमधून मंदिरांवर सुवर्णाचे कळस चमकत आहेत जसे काय ते आपणासच बोलविताहेत, तीं पाहा सूर्याचीं किरणें पताकांच्या गर्दीमुळें लोपत चाललीं आहेत, हे पाहा नगराचे आसमंतात

# अंक १.

## प्रवेश ७.

### स्थळ.

### कौंडिण्यपुरांतीलराजमंदिर.

### पात्रें.

सूत्रधार ........ नाटककर्ता.
विदुषक ........ त्याचासोबती.
डाळिंबी व लवंगी ........ रु० च्या दासी.
रुक्मिणी ........ आदिशक्ति

**सूत्रधार.**— अरे विदुषका, पहा हें नगर कसें शृंगारिलें आहे, जिकडे तिकडे कुंकुमाचे सडे घातले आहेत, घरोघर पताका व तोरणें लागलीं आहेत, नगरवासी लोकांनीं उंची पोशाक करून गंधाक्षत व गळ्यामध्यें कुसमांच्या माळा व नाना प्रकारचे सुवर्णाचे अलंकार धारण केले आहेत. अरे ज्यांचीं अलंकार भूषणें पाहून डोळे दिपताहेत.

**विदुषक.**— (डोळे मिटून) बरें मग काय ह्मणतोस काय?

**सूत्रधार.**— अरे ऐक. हा कसा मंगळवाद्यांचा गजर चालला आहे, नौबती झडताहेत, ताशे, मर्फे वाजताहेत, तोफांचे बार होताहेत, आणि तूं आतांच असा सुस्तावलास काय, डोळे उघड.

**विदुष.**— (डोळे उघडून) मग चल तर हे लोक जिकडे चालले आहेत तिकडे आपण जाऊं (असें बोलून दोघेही राजवाड्यांत जातात.) अहो नाटकाचार्य, येथें विस्तीर्ण आणि सुशोभित असा मंडप तर फारच सुंदर घातला आहे, वाद्यें वाजताहेत, ब्राह्मण वेदपठण करिताहेत, यज्ञयागादिक कर्मे चाललीं आहेत, सोनें, रुपें, नाना प्रकारचीं वस्त्रें, रत्नपूरित पात्रें, तिलपात्रें इत्यादि दानें करिताहेत, ह्या स्त्रिया रुक्मिणीला हळद लावून मंगलस्नान घालून पीतांबर

नेसविताहेत, कित्येक स्त्रिया तिच्या अंगावर अलंकार भूषणें घालीत आहेत इ-त्यादि सर्व हर्षोत्पादक चिन्हें जरी होत आहेत तरी ह्या रुक्मिणीदेवीचा मुखचंद्र असा निस्तेज कांबरें दिसतो ?

**सूत्रधारः-** सांगतों ऐक.

## ओंव्या
### एकनाथाच्या.

वऱ्हाडनिघालेंबाहेरी ॥ मदगजपरिवारिलेभारी ॥ सु
वर्णरथांचियाहारी ॥ वीरअश्वावरीआरूढले ॥ १ ॥
चालतीपायाचेमोगर ॥ पातलेकौंडिण्यपुरनगर ॥
आणीकवऱ्हाडीमहावीर ॥ चैद्यभारतेहीआले ॥ २ ॥
रुक्मिणीकृष्णासहोतीदीधली ॥ तेशिशुपाळादेऊं
केली ॥ तेसंधीपाहिजेसाधिली ॥ ह्मणोनिआलेपक्षपा
ती ॥ ३ ॥ शाल्वजरासंधासहित ॥ वक्रदंतविदुरथ ॥ पौं
ड्रिकवीरअद्भुत ॥ सैन्यभारेंशीतेपातले ॥ ४ ॥

**विदुषकः-** असें काय! त्या ह्मातान्यानें पुत्राचे नादीं लागून बराच फैलाव केला आहे, पुढें सांग.

**सूत्रधारः-** सांगतों ऐक.

## ओंव्या
### एकनाथा.

जैसेगंधर्वनगरींचेहुडे ॥ तैसेशिशुपाळाचेवीरगाडे ॥
वऱ्हाडआलेंवाडेंकोडें ॥ भीमकापुढेंसांगीतलें ॥ १ ॥
रावसामोरागेलात्यासी ॥ केलेंसीमंतपूजनासी ॥ स
न्मानूनिसमस्तांसी ॥ जानवसासीआणिलें ॥ २ ॥

**विदुषकः-** तरच त्या माउलीचा मुखचंद्र अगदीं निस्तेज होऊन गेला आहे,

हर हर! पाहा ती किती शोकग्रस्त झाली आहे!

**रुक्मि०**—(एकटीच आपणासीं) ब्राह्मण अद्यापि कांबरें येत नाहीं त्याला कां हीं संकट आलें असेल असें ह्मणावें तर नसेही कांहीं दुःशकुन होत नाहींत तेव्हां हें काय असावें बरें? अथवा मी जी पत्रिका लिहिली आहे त्यांत तर कांहीं माझें मौरर्ख्य परमेश्वराच्या दिसण्यांत येऊन ते क्रोधवश होऊन स्वस्थ बसले नसतील कशावरून. किंवा मीच फुटक्या दैवांची ह्मणोन पत्रांत लिहिलें कीं, तुह्मास शंभर जन्मानी पावेन. तेव्हां तें पाहून तर जगदीश्वरानें अवकाश केला नसेल. (असें बोलून मूर्छित होते इतक्यांत डाळिंबी तिला धरून)

**डाळिं०**— महाराज आपण असे वारंवार व्यग्र कांबरें होता? आपण त्या दीनदयालावर पूर्णपणें विश्वास ठेविला आहे तर त्याची लज्जा त्यास आहेच. आपण व्यर्थ शोक करून कांहीं उपयोग होणार नाहीं यास्तव आनंदानें त्याचेंच ध्यान करा. (इतक्यांत मोठ्या आनंदानें लवंगी येते आणि घाबरेपणीं बोलते.)

**लवंगी**— बयासाहेब, सुदेव नामें एक ब्राह्मण द्वारापासीं आला आहे, तो ह्मणतो कीं, माझी आणि रुक्मिणी बाईची गांठ पडली पाहिजे तर तीस आपला सुदेव आला आहे असें जाऊन सांगावें.

**रुक्मिणी**— (उठून बसते आणि आनंदानें) अगे, त्यास अगोदर इकडे घेऊन येजा. तो माझ्या प्राणाच्या जीवनोपायाची ओषधी घेऊन आला असेल. जा लवकर धांव. (असें ऐकून डाळिंबी बोलते):—

**डाळिंबी**— महाराज, मी समजलें, मी त्यास घेऊन येतें. (असें बोलून तीही पळत जाते आणि त्याचा हात धरून त्यास घेऊन येते.

## आर्या.

यन्मुखपाहुनिनिवली हृत्तीचिंताग्नितापतापानें॥ मृत्युग्रस्तामृतवा शीतें प्रीताजसें ग्नितापानें॥ १॥ सुखहोतेंहृतमणिलाबाळालादीपदर्शनेंसुतमीं॥ त्या

परिझालेंसजलाह्योतेंकीनातरींयमानुतमी ॥ २ ॥

रुक्मिणीः– विप्रवार्या, तुमच्याकडे माझे नेत्र फारच लागले होते, परंतु त्यांचें सार्थक झालें, तुह्मी दृष्टीस पडलां आणि तुमच्या मुखचर्येवरून कृतकृत्यता दिसते तर काय करून आलां तें सांगा बरें?

सुदेवः– (हात जोडून) बाईसाहेब, भगवान् आपलें पत्र पाहून, बहुत प्रेमपुरःसर त्याचा स्वीकार करून, मला बरोबर घेऊन येथें येऊन पोंचले आहेत; आणि तुमचें दुःख दूर व्हावें एतदर्थ मला तुह्माकडे पाठविलें आहे.

रुक्मिणीः– (अशी गोष्ट ऐकतांच आनंदमय आणि लज्जावश होऊन) काय सुदेवा, प्राणनाथ संकेतानुकूल होत्साते येथें दाखल झाले. तर आतां या चतुर्दश भुवनांत मजएवढी भाग्यवान् कोणीच नाहीं. शाबास शाबास !! द्विजवर्या, तुह्मी आपल्या भाषणा प्रमाणें सर्व सिद्ध केलंत आणि मला महा दुःखाब्धींतून काढिलेंत. असो. अगोदर इकडेया बसा.

सुदेवः– पुढील कार्यकर्तव्यतेला अवकाश थोडा राहिल्यामुळें बसावयास भगवंताची आज्ञा नाहीं; तर आतां तुह्मी कोणतीच काळजी करूंनका. विवाह होण्यापूर्वी कुलाचारा प्रमाणें ग्रामदेवतेच्या दर्शनास अंबेच्या देवालयीं याल तेव्हां तुमचें पाणिग्रहण असुरविधीनें तुमच्या कुलदेवते समक्ष श्रीकृष्ण करतील, तर आतां त्यांचे चरणीं लक्ष ठेवून स्वस्थ असा.

रुक्मिणीः– विप्रवर्या, तुमच्या उपकारां पासून मी उतराई कोणत्याही उपायानें होणार नाहीं तर आतां सांगतें ऐका. :—

दिंडी.

ऐकुनीयांमम प्राणनाथआले ॥ कंचुकीचेअतिन्ह
स्वभागझाले ॥ चित्तपूर्णत्वामृतामनप्याले ॥ ज-
न्मजन्मीचेंसुकृतफळाआलें ॥ १ ॥ लोहपिष्टाचें
अशानवानिराशी ॥ करूनिराहूनीयायतांमुखीज्या

सी ॥ एकदिवसांतत्विआधिलेंतयासी ॥ होऊंउत
राईऐशियात्विकेसी ॥ २ ॥ कायद्यावेंयात्वियाउपका
रा ॥ कायमोलाचेंयाचिउपकारा ॥ म्हणुनिजोडुनियां
करानमस्कारा ॥ करीविप्राळह्मणेसखातारा ॥ ३ ॥

सुदेवः– फार उत्तम आहे. (असें बोलून जातो.)

इतिश्रीरुक्मिणीहरणनाटकेअध्यक्रदर्शनोनामप्रथमोंकः संपूर्णः

# अंक २

## प्रवेश १.

### स्थळ.

### द्वारकानगरींतील राज-मंदिर.




## पात्रें.

बलभद्र ---------- श्रीकृष्णाचाज्येष्ठबंधु.

उद्धव ---------- त्याचासेवक.

अक्रूर ---------- दुसरासेवक.

दिवाणजी ---------- त्यांचाकारभारी.

इतरयादववीर ---------- सैनिकलोक.

**बलराम**:- उद्धवा, काल पासून श्रीकृष्ण दृष्टीस पडले नाहींत तेव्हां ते येथेंच असून शारीरक हर्कतीनें किंवा महालांतच विलासांत गुंतल्यामुळें अथवा कोठें भक्तकाजास्तव गांवास गेल्यामुळें हें कांहींच समजत नाहीं तर तूं जाऊन त्यांचा सूक्ष्मरातीनें शोध घेऊन येवरं.

ण आह्मी ऐकतों कीं, तेथें चैद्येश्वर शिशुपाल वक्रदंतादि मोठमोठे वीर जमले आहेत.

**बळराम:**—(नेत्र फिरवून) काय मोठमोठे वीर जमले आहेत ? बरें तर माझा रथ सत्वर आणवा, आणि तुह्मीही सर्व निघण्याची तयारी करा.

**सर्वयादव:**—(ऐकतांच आपापलीं यानें आणण्यास जातात. इतक्यांत यादवांच्या सर्व सैन्याच्या तयारीचीं चिन्हें होतात वाद्यें वाजतात तों, बळरामाचा रथ तयार होऊन येतो.)

## पद.

तालझंपा राग कामबोध, चा० आतां राम०

सर्ववीरांस वेंरेवतीरमण तो ॥ भाविक्रोधाग्निला करितसे धमन तो ॥ ध्रु० ॥ कुंडिनाख्यापुरी भीमकाची तरी ॥ एकझाले बहू रावराजे जरी ॥ शोभमा नामना बहु धनाती तरी ॥ धन्य धन्या करी निज गुणें श्रीहरी ॥ सर्ववीरांस वें० ॥ १ ॥ ग्रामिं आला करीं धरुनि नांगर हला ॥ फारप्यारी जगीं एक जाला हला ॥ ऐकुनी चित्र वादित्र कोलाहला ॥ अंबिकालयिं अला शूर गाढा भला ॥ सर्ववीरांस वें० ॥ २ ॥ भीमशयें हरी रामतें पूजिले ॥ तेंचि आलय तया राहण्या योजिलें ॥ आलिया रुक्मिणीदर्शना श्रीहरी ॥ त्याच समयीं निच्या प्रीतिनें तो हरी ॥ सर्ववीरांस वेंरेवती० ॥ ३ ॥

प्रवेश पहिला

समाप्त.

उद्धवः— (हात जोडून) त्यांस कांहीं गुह्य निदेश घेऊन कालचे दिवशीं तिसऱ्या प्रहरीं एक ब्राह्मण आला होता त्याला घेऊन ते गेले होते. पुढें काय जाहलें तें पूर्णपणें समजत नाहीं; आणि आज दारुक रथशाळेंत नाहीं व रथही नाहीं ते ऱ्हां वाटतें कीं, तो ब्राह्मण त्यांस कोठेंतरीं भक्तसंरक्षण कार्यार्थ घेऊन गेला असेल, (असें बोलून अक्रूराकडे वळून) काय हो त्यावेळेस तुह्मी गोपालकृष्णा जवळ होतां नाहीं बरें?

अक्रूरः— होय होतों. तो मजकूर साद्यंत भला माहीत आहे; परंतु विच्यारि-ल्यास विनंति करीन.

बळरामः— तर काय प्रत्येकास विच्यारिलें पाहिजे? अरे आह्मी शोध करूं लागलों यावरून तुला कळवावयाचें देखील समजत नाहीं?

अक्रूरः— क्षमा असावी, सांगतों ऐकावें महाराज. (असें बोलून आर्या ह्मणतो)

## आर्या.

भीमकराजसुतेनें लिहिलें कीं लिखित देवरायास॥
येतील आड जे त्यां अवरुनि मज तूं चि येवरायास॥१॥

उद्धवः— (ऐकून) येथें काय? आदींच उल्हास आणि त्यांत फाल्गुनमास. महा-स्त्रैणास स्त्रीप्रेरित पत्रिकागमनानंतर ते राहतील काय?

बळरा०— (उद्धवावर रागाऊन) कायरे, आतां काय बोललास? विवाहार्थ जो गेला त्यास फाल्गुनाचा शकून?

उद्धवः— (भ्यालेसें करून हात जोडून) महाराज फाल्गुनशब्द विजयवाची आहे ह्मणून बोललों.

बळरामः— समजलों या वेळेस तर गोपाळकृष्ण खचित संकटांत असतील, त स्मात् आपण अवश्य सर्व सैन्याची सत्वर तयारी करून त्यांचे साह्यास तेथें गलें पाहिजे. कसें हो यादववीर?

सर्वयादवः— आपले भाषणा प्रमाणें तजवीज व्हावी हेंच योग्य आहे. कार

अंक २.

प्रवेश १ ला.

स्थळ.

कौंडिण्यपुर.

पात्रें.

भीमकराजा ---------- रुक्मिणीचा पिता.
रुक्मिया ---------- रुक्मिणीचा भाऊ.
बुद्धिविशारद ---------- भीमकाचा उपाध्याय.
शशुमती ---------- रुक्मिणीची माता.
रुक्मिणी ---------- भीमकराजाची कन्या.
कंचुकी ---------- चोपदार.

**भीमकराजा.**—( विच्यार पूर्वक ) हे कुळगुरो, माझ्या जन्माचें सार्थक करण्यास ही आदिशक्ति रुक्मिणी मदुदरीं आली आहे; आणि त्याचा पडताळा पाहाण्यास मूर्तिमंत ज्याला अधर्म ह्मणतात तोच हा रुक्मिया, माझ्या उदरीं पुत्ररूपानें वैर साधण्या करितां जन्मला आहे तेणें करून मला असें झालें आहे कीं, हें लग्न नव्हे विघ्नच आहे, तर अशा प्रसंगीं फार सावधपणानें वागणूक करून भगवान् सर्वेश्वरास खुषकेलें पाहिजे तर खरें परंतु मोठ्या हुशारीनें बरें.

**बुद्धिवि॰**—होय सरकार आपले आज्ञे प्रमाणें मजकडून होईल तितकी तजवीज ठेवितों.

**भीमक.**— कंचुके, जावें रुक्मिणीचें नित्यकृत्य आटपलें किंवा नाहीं तें पाहून ये.

**कंचुकी.**—( हात जोडून ) आज्ञा सरकार. ( असें बोलून जातो. )

श्लोक.

चाल गोपिगीत.

नित्यकृत्यतें सर्व सारुनी ॥ चिंतना अजी दूर सारुनी ॥
विश्वपालका पावण्यास ती ॥ अंबिकालया चालली स
ती ॥ १ ॥

(तो पूर्वोक्त कंचुकी रुक्मिणी जवळ येऊन हें सर्वकृत्य पाहून तेथून परत येऊन राजास कथन करितो.) सरकार, त्यांचें सर्व नित्यकृत्य आटपून त्या पोषाक करून बसल्या आहेत.

**भीमक:—** उत्तम आहे. आतां नुकतेच पूजा घेऊन श्रीकृष्ण आणि बळराम अंबिकेच्या देवालयांत गेले आहेत, तर ते तेथें पोंचले किंवा नाहीं तें जलद पाहून येजा.

**कंचुकी:—** होयजी महाराज. (असें बोलून जातो आणि वाटेंतून श्रीकृष्ण रामास पहाण्या करितां जमलेले लोकांचे थवे पाहून आपणाशीं बोलतो):—

पद.

चाल गजल धन्यजाको भाग रागदेस.

कायनागरिकलोक ॥ पूर्णदिसे ज्यांत षोक ॥ ध्रु० ॥ अ
ट्टालिकेवरि किती ॥ बसुनी या मजा पाहती ॥ १ ॥ कृष्ण
सुखकमलास ॥ लुब्धले हे सविलास ॥ २ ॥ या परिची
चमत्कृती ॥ पाहि करो थेटगति ॥ ३ ॥

(अंबिकालयीं जाऊन पहातो तों.)

ओंवी.

एकनाथाची.

ऐसा देखोनि श्रीपती ॥ कृष्णमय जाहली चित्तवृत्ति ॥
लवों विसरलीं नेत्रपातीं ॥ कृष्णमूर्तीसी पाहतां ॥ १ ॥

ओंवी नवीन.

पाहूनियां निर्मळाशीघ्रगति ॥ ज्याचा आनंद न माये-

जगती ॥ तोकंचुकीभीमकरायाप्रती ॥ हृद्यार्थासीकथ
नकरी ॥१॥

भीमक:— (त्याची मुखचर्या पाहून) हा इतका मुदित कांबरे दिस-
तो. (कंचुकीस) कायरे, सांगितल्या कामाचें काय केलेंस ?

कंचुकी:— महाराज, ते अंबिकेच्या देवालयांत पोंचले आहेत. कायतरि त्यांचें सौं
दर्य वर्णावें! पहा, त्यानां पाहाण्यासाठींच लक्षावधि लोकांचे समाज रस्त्यांतून
जमले आहेत. मी तर तो थाट पाहूनच भुललों आणि मला तर श्रीकृष्णाच्या
मुखकमला वांचून दुसरें कांहींच पाहूं नये असें वाटलें.

भीमकराः— बरें आहे. (असें बोलून मोठ्यानें श्वास टाकून) परंतु अगोदर
रुक्मिया काय करीत बसला आहे हें पाहून ये. (तें ऐकून कंचुकी, रुक्मिया
कडेयेऊन पहातो तों) :—

रुक्मिया:— (आपणाशीं) आमच्या भोळ्या ह्मातान्यास पूर्ण वेड लागलें आ
हे, तें कांहीं केल्यानें निघत नाहीं, तर आतां काय करावें.

कंचुकी:— (पाहून भीमकराजा जवळ येऊन) महाराज, युवराज नाहीं-तीच ब
डबड करीत बसले आहेत.

भीमक:— बसूंदे पर्ता. आतां तूं रुक्मिणीस जाऊन सांग कीं, आपला सर्व प
रिवार घेऊन जगदंबेच्या दर्शनास चलावें. आणि राणी साहेबांसही असेंच कळीव.

कंचुकी:— आज्ञा सरकार. (असें बोलून जातो आणि रुक्मिणी व शत्रुमती
जेथें बसल्या होत्या तेथें येऊन त्यांस निरोप सांगतो.) :—

शत्रुमती:— आमची तर तयारी केव्हांची झालीआहे, यानें तयार होऊन आलीं
ह्मणजे निघतो.

कंचुकी:— ठीक आहे, या प्रमाणें सरकारांस कळवूं ?

रुक्मिणी:— अरे, पुनः विच्यारतोस काय, लवकर कळीव जा. (ऐकून तोजा
तो.)

कंचुकी:— ( राजा जवळ येऊन ) सरकार, त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, धानें आ लीं ह्मणजे आह्मी नियतों, आह्मा कडून कांहीं खोळंबा नाहीं.

भीमक:— बरें आहे तर सैन्याधिपति यांस तयारीची वर्दी कळीव, आणि तो रु क्मिया कोठें आहे तो मला दाखीव.

कंचुकी:— ( हात जोडून ) चलावें सरकार, ते आपल्या दिवाणखान्यांत आतांच जाऊन बसले आहेत. ( असें ऐकतांच उठोन त्याच्या समागमें रुक्मियाच्या दिवा णखान्यांत जाऊन ) ...

भीमक:— कायरे पुत्रा, तूं तर मला मोठी लाजच आणिलीस तर तुझे मनांत आहे तरी काय तें एकदां कळूं दे.

रुक्मिया:— माझे मनांत इतकेंच आहे कीं, त्या गोळ्याच्या पोरास आपली रुक्मि णी देऊं नये.

भीमक:— बरें पण अगोदर, आपल्या कुळाचारा प्रमाणें जगदंबेच्या दर्शनास जाऊन तर ये, मग तो विचार.

रुक्मिया:— हे तात, आपण ह्मणता कीं, हा विचार मग करावा, आणि पूर्वी ज गदंबेच्या दर्शनास जाऊन यावें, परंतु तेथें ते सर्व यादव जमले आहेत त्यांणीं ज र आयतीच वधू हिरावून घेतली तर मग मागून आपण विचार काय करणार?

भीमक:— अरे मूर्खा नपुंसका, ज्या वेळीं ते वधूस हिरावून नेतील त्यावेळीं तुझे सर्व सैनिक आणि विवाहोत्सवास जमलेले सर्व राजे काय उगीच बसतील?

रुक्मिया:— ( थोडासा रागाऊन ) ताता, हातचें सोडून पळत्याचे पाठीमागें लागावें, या ह्मणी प्रमाणें करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, तर पूर्वी विवाहोत्सव आटपून घेऊन, मग जगदंबेच्या दर्शनास जाणें वगैरे सर्व कुलाचारा प्रमा णें जें कर्तव्य असेल तें करावें.

भीमक:— अँः मूर्खा, अरे, तूं माझ्या उदरीं कशास आलास असल्या षंढ पुत्रा पेक्षां गर्भपात झाला असता तरी बरें होतें. पहा ह्या क्षत्रियानें काय

करावें, हा माझा पुत्र असून थंडाची गोष्ट सांगतो.

रुक्मिया.– (डोळे फिरवून श्वास टाकून) ऐकतां काय बाबा, तर आतां - रुक्मिणीस अंबिकेच्या दर्शनास न्यावयाची, आणि त्याणीं गडबड केल्यास त्यांची खोड मोडून नंतर विवाह करावयाचा. (असें बोलून हें वर्तमान गुप्तपणें - चैद्य देशच्या राजास कळवितो.):—

## ओंवी.

### एकनाथाची.

एकाआमुच्याकुळधर्मासी ॥ नोवरी न्यावीअंबिकेसी ॥ सकळसैन्यसंभारेंसी ॥ आलेंतुह्मासीपाहिजे ॥ १ ॥

भीमक.– कसें काय रुक्मिया, तूं रुक्मिणी बरोबर अंबिकाळयीं जातोसना?

रुक्मिया.– होय जातों तर, मला बंदोबस्त ठेवण्या करितां गेलेंच पाहिजे. (असें बोलून फार बंदोबस्तानें तयारी करून सर्वा बरोबर निघतो.)

## कटाव.

हेनूनेंरुक्मिणिबाई ॥ अंबाळयिंपायींजाई ॥ ध्रु० चारअर्थसेचोयेभाऊ अंतिमआहेरुक्मबाहू ज्यांत षिराजेभीमकराऊ ह्मणतीअंबाभणतिसजाऊ उघडीसेनाशस्त्रेंबाऊ दाविनिभाऊ कितितोगाऊ धनुर्धराचीआणिकमाऊ सादिजनाचेसैंधवचाऊ धांवतिआऊ करितीकरिच्याकांठिकिणिकिणी मधुरमधुरसेरवघंटामणि मध्यपीठगनज्यांनरुक्मिणी आदिशक्तिजणुनवआवरणी पूजास्थानींध्यायीकोणी अथवाजेसेंतिचेंचियंत्र त्यापरिभासेसेनासूत्र ज्यायंत्रालाकृष्णक्षेत्रपरमपवित्र तीमलोक

हें ज्या चें तंत्र गाती बहु आवाई ॥ हे तूनें० ॥ १ ॥ वाद्यें बहुविध ज्यांत वाजती घंटाकिंकिणि शंख गाजती वीणा वेणू मोह पाजती तासे ढोल कर वेंमाजती शिंगें कर्णे काल्लु नगारे मृदंग भेरी ऐकुनि सारे डंके वाजति अश्वाधारें ऐकुनि बोलति बहु नवारे त्यांत स्त्रिया रे देशीबारे रुक्मिणि भावें जाणुनि संकेता धिणठाके श्रीशाल्म शुनती निजनिष्टेंके चरणीं चमके ईश्वर पायीं चित्त सोंपलें ह्मणुनि घेतलें मौन आपुलें संधानाहि मगरवूं पलागलें या परि श्रीमकि साहित चालले गर्जुनि आम्नायानि तोलले पुराण इतिहासांत मोलले अंबालयिं ते पाहुं बोलले परीक्षिता प्रति शक्र थोरले शक्तीचीच चतुराई ॥ हे तु मेरु० ॥ अबाल० ॥ २ ॥

( देवालया जवळ सर्व जालांच रुक्मिणीनें हात पाय धुवून सबुद्धि व श्रद्धा यां सहवर्तमान पूजा सामग्री घेऊन श्री जगदंबेचे देवालयांत प्रवेश करतांच रुक्मियानें बाहेरील सभामंडपांत सर्व शत्रुमती वगैरे स्त्रियासमाजास बसवून आपण - मोठमोठे वीर योद्धे यांसहवर्तमान शस्त्रें उघडीं करून देवालया सभोंवती मोठें बंदोबस्तानें संरक्षण करीत आहे, व सर्व सैन्याचा सभोंवती गराडा घातला आहे, पुढें पायदळ तरवारी नागव्या करून वारंवार चमकवीत आहेत, मागें घोडेस्वार आपआपले बंदुकींतून गोळीबार भरून तोंडे पेटवून उभे राहिले आहेत, त्यां मागें रथी महारथी धाणीं आपआपल्या भात्यांतून शर काढून धनुष्यास लावून प्रत्यंचेस ( धनुष्याचे दोरीस ) आकर्ण पर्यंत ओढ देऊन बसले आहेत, त्यां मागें हत्तीवर अंबाऱ्यांतून शिशुपाल वक्रदंतादि विवाहोत्सवास आलेले राजेलोक तयारीनें उभे आहेत असा कडाकोटीचा बंदोबस्त करून संरक्षण करिताहेत. )

प्रवेश दुसरा समाप्त.

# रुक्मिणीहरणनाटक.

## अंक २.

## प्रवेश ३.

### स्थळ.

### कौंडिण्यपुरांतील जगदंबेचें देऊळ.




### पात्रें.

रुक्मिणी ---------- भीमकराजाची कन्या.
सुबुद्धि ---------- उपाध्यायपत्नी.
श्रद्धा ---------- तिची सोबतीण.
सूत्रधार ---------- नाटककर्ता.
विदूषक ---------- त्याचा सोबती.

रुक्मिणीः— ( अंबिकेस नमस्कार करून ) हें काय। येथें तर जिकडे तिकडे मा झे प्राणनाथच दृष्टीस पडतात. ( पुनः डोळे मिटून मनन केलेसें करून ) अहो हीनर जगन्माता आमची कुलस्वामिनी आहे. ( हात जोडून ) हे महामाये जग

देवे, तूं मला प्रथम जें रूप दाखविलेंस तेंच यांदेहानें आणि प्राणानें संदर्शी-माळक होईल असें कर. (असें बोलून ध्यानयोगांत निमग्न होते.)

**सद्बुद्धि:—** (तिला स्पर्श करून) बाईसाहेब, ही वेळ इतके ध्यानयोगांत निमग्न होण्याची नव्हे. तर प्रस्तुत करिष्यमाण महामंगलकृत्यांत निर्विघ्नपणें इच्छा परिपूर्ण होण्यासाठी विधियुक्त प्रकारें श्रीत्रिपुरसुंदरीची पूजा करा.

**श्रद्धा:—** (पंचपात्रींत पाणी घालून रुक्मिणीपुढें ठेवून) बाईसाहेब, आचमन करावें.

**रुक्मिणी:—** (ध्यानयोगाचें विसर्जन करून आचमन करून सद्बुद्धिकडे) हे पुरोहितदारिके, आरंभ करावा.

**सद्बुद्धि:—** श्रीमन्महागणाधिपतयेनमोनमः निर्विघ्नमस्तु. (डोळ्यांस पाणी लावावें असें बोलून तांदुळांच्या राशीवर सुपारी ठेवून श्रद्धेकडे पाहून) हें चालू द्या.

**श्रद्धा:—** (श्रीगजाननाचे स्तुतिपर श्लोक ह्मणून सर्व संकल्प करून रुक्मिणीस) बाईसाहेब, ह्मणा. मया इच्छितस्य श्रीगोपालकृष्णास्य वरत्वेन प्राप्तिपूर्वक सकलमनोरथसिद्ध्यर्थं श्रीकुलदेवीपूजनंकरिष्ये, आदौनिर्विघ्नतासिद्ध्यर्थंश्रीमहागणपतिपूजनंचकरिष्ये.

**सद्बुद्धि:—** बाईसाहेब, इकडे पहा, ह्या सुपारीवर अक्षता टाका. महागणपतयेनमः ध्यायामि महा॰ आवाहयामि, आसनंसमर्पयामि. फुलानें पाणी उडवा, पाद्यंसमर्पयामि अर्घ्यंस॰ आचमनंस॰ स्नानंस॰

**श्रद्धा:—** बाईसाहेब, वस्त्रें समर्पण करा. वस्त्रंस॰ उपवस्त्रंस॰ यज्ञोपवीतंस॰ गंधंसम॰ अक्षतान्स॰ पुष्पाणिस॰ धूपं॰ दीपं॰ नैवेद्यं॰ फलं॰ तांबूलं॰ दक्षिणां॰ मंगलार्तिक्यं॰ मंत्रपुष्पं॰ प्रदक्षिणा॰ नमस्कारान्॰ वक्रतुंडेतिप्रार्थनां॰

**सद्बुद्धि:—** हें इकडे पहा, प्रधानदेवतेची पूजा चालूं द्या. श्रीकुलदेव्यैनमः ध्यायामि, (इतक्यांत भीष्मकराजा आंत येतो, त्यास पाहून सर्व लाजतात आणि -

हळू उच्चार करून श्रीजगदंबेची यथोक्तविधानें षोडशोपच्चारपूजा संपवून तो येणें ह्मणूंलागतात तों.)

अप्सु:- बाईसाहेब, आपण मोठ्या ज्ञानी आहां तर या वेळेस अंबिकाप्रीत्यर्थ एक गाणें ह्मणा.

सद्बुद्धि:- अगे, प्रथमोदर आपण ह्मणूं लागावें ह्मणजे त्या आपोआप ह्मणतील.

अप्सु:- तर आपणच आरंभ करावा.

सद्बुद्धि:- हेंगे काय तूं मजवरच टेंकलीस.

रुक्मिणी:- ऐका गे, मीच ह्मणतें. (असें बोलून गाणें गाऊं लागतें.):—

### पद.

चाल भजभजगोपालं०

जयजयजगदंबे ॥ भक्तालंबे ॥ पालितविश्वकदंबे
ध्रु० ॥ मूर्तिअमूर्तविश्वस्फूर्ती ॥ चिच्छक्तिमदंबे ॥
जय० ॥ १ ॥ उघडूं निलोच्चनखचसिवयेज्या ॥ गा
तीजगींनृकदंबे ॥ २ ॥

(या प्रमाणें स्तवन करून नमस्कार करित्ये तों देवीच्या गळ्यांतील हार रुक्मिणीच्या हातांत येतो.):—

### श्लोक.

छंद अनुष्टुप्.

मालिकातीकरींयेतां ॥ बालिकाहर्षलीमनीं ॥ ह्म
णेइणेचविश्वेशा ॥ करीनअपुलाधनी ॥ १ ॥

अप्सु:- बाईसाहेब, आपणास फार उत्कृष्ट आपल्या कुलदेवीचा प्रसाद झाला आहे तर आतां याच मालिकेनें अभीष्ट वरास वरावें.

रुक्मिणी:- खरेंच, आज अंबिकेचा तर कृपाकटाक्ष तसाच इष्टोत्पत्तीस ये

न आहे.

सुबुद्धि:— जगदंबेनें आपणास इच्छित वरदानरूप प्रसाद दिल्हा आहे तर-आतां अभीष्ट साधनास अवकाश कां करितां ?

रुक्मिणी:— (ऐकतांच उठोन सर्व बायांस) चला तर आपण देवीस प्रदक्षणा घालूं. (असें बोलून प्रदक्षणा घालूं लागते.)

ओंवी.

एकनाथाची.

सकलसौंदर्याचीखाणी॥ बरवेपणाजिजपासुनी॥
स्वरूपरूपाचीजननी॥ वरीरुक्मिणीदोधली॥ १॥

अभंग.

सौंदर्यहिंडतांदेवनरनागीं॥ विश्रांतीचाआंगींलेशनसे॥ १॥ पहावयासुखकायतेंभीमकी॥ जाहलेंभीमकीनासधारी॥ २॥ रुक्मिणीकृष्णाशींघडेआलिंगन॥ तेणेंसमाधानघडेत्यास॥ ३॥ प्रामीसाठीज्याच्यावेधश्रीकृष्णासी॥ गालेंहोतोऐशीरसंद्रती॥ ४॥

श्लोक.

रचीलहोत्याविधिनेंनकेली॥ अशीप्रगेंत्याविधिनेंचकेली॥ कृष्णासभेटूंनसकायआलें॥ धर्मेअसेंस्याकुरव्यासबालें॥ १॥

पद.

चाल संदराझाले.

पाहूंमुखकमळाला॥ बहु॥ पाहातांज्यालाकळपिनघडे॥ सकळदुःखमनाला॥ ध्रु०॥ कायचंद्रमा

भाऊ म्हणोनि ॥ रुक्मिणिचें सुख झालां ॥ बहु० ॥
॥१॥ म्हणोगाचें दुःख टाकिलें ॥ अगदीं हर्षित झा-
ला ॥ बहु० ॥२॥ नक्षत्राची शोभा आणिली ॥ तान
वडानों झाला ॥ बहु० ॥३॥

आर्या.

अतिरक्तभालभागीं शोभे तो कुंकुमांक भीमकिच्या ॥
रक्तकरीभक्तजना तारी वारी समस्त भीमनिंद्या ॥१॥
धनुषाकृतिच्या भ्रुवया जणु गुलबाया ससंगरेल्या अ
सतो ॥ भ्रूह्रस्या सह्मणोनिच केलीमदनें जयांतती
वसती ॥२॥

श्लोक हरिणी.

अधरगमतीरंगें बिंबीफलापरितेतसें ॥ रदनवद
नीं अंकारांतर्गतांअतिवाजसे ॥ हनुवरि दिसे का
ळे भारी मनोहर गोंदणें ॥ अजब कुलजीं जन्मा आ
लें स्वयंभुच गोंदणें ॥१॥

विदूषक:– वेषयाचार्या, त्वां जें वर्णन केलेस तें, समोर ह्या दोघी बायांबरोबर प्रदक्षिणा करणाऱ्या रुक्मिणीदेवीचेंच ना?

सूत्रधार:– अरे होय, हा देखील तुला संशयच ना? वाह्यारे शाहाण्या, (अ सें बोलून श्लोक ह्मणतो.):–

श्लोक

वर्णीलि ज्यांत बुधका यन सेच कांहीं ग्रीवों सदंकुरक

---

१ काजळासह
२ तोंडली
३ दगडाकर

रीचिनसेचकाहीं ॥ तैसेंतुलाकितिहिसांगुनकांहिंना-
हीं ॥ कैसेंतुलानसमजेअगदींचकांहीं ॥ १॥

**विदूषक**.— हंहं समजलों. तुमच्या मतें मी इतका का शाहाणा नसेन, बरें- असो, परंतु तुह्मी आपलेंच सर्व गाणें गाणार किंवा त्यांत माझेंही थोडेंसें ऐकणार ?

**सूत्रधार**.— हें काय विचारितोस मित्रा ?

**विदूषक**.— (थट्टेनें) तुझेदारीं बांधिलाकुत्रा (असें बोलून त्याचे हात धरून) अगोदर हें सांगा कीं, कथाभाग कोठपर्यंत आला आणि पुढें काय व्हावयाचें, कारण आपण मध्यंतरींच रुक्मिणीचें सौंदर्य वर्णिलेंत तेव्हां मला संशय वा टला ह्मणून विचारितों.

**सूत्रधार**.— पूर्वकथा इतकी झाली कीं, पूर्वसंकेता प्रमाणें रुक्मिणी अंबिके च्या दर्शनास आली आहे, आतां तिचें वर्णन कां केलें असें ह्मणशील तर या भूतलांत रुक्मिणी प्रमाणें रूपवती स्त्री कोणीच जन्मास आली नाहीं हें पुढें होणाऱ्या कथेवरून तुझ्या ध्यानांत येईल; तें कसें ह्मणसील तर तिचें सौंदर्य पाहून चैद्य मगधेश्वरादि महावीर मोहित होतील आणि ती आदिशक्ति परमेश्वरास माळ घालील.

**प्रवेश ३रा समाप्त.**


अंक ३.

प्रवेश ४.

स्थळ

कौंडिण्यपुरांतीलअंबिकेचें

देवालय.



पात्रें.

रुक्मिणी ---------- भीमकराजाचीकन्या.

रुक्मिया ---------- तिचाभाऊ.

रतिपति ---------- मदन.

श्रीकृष्ण ---------- परमेश्वर.

रुक्मिया:- (रुक्मिणीस) अग आका, तुझ्या प्रदक्षिणा अद्यापि संपल्या किं-वा नाहीं ?

रुक्मिणी:- (हळुच) दादा, झाल्या. कांबरें ?

रुक्मिया:- अगे, तर लौकर परत गेलें पाहिजे उशीर होतो ह्मणून विचारिलें.

रुक्मिणी:— होईना कां, (असें बोलून सद्गदितांतःकरणानें श्रीपरमेश्वराचें ध्यान करिते आणि माला हस्तांत आहेच इतक्यांत ईश्वरी इच्छेनें एक अद्भुत चमत्कार झाला तो:—

ओंव्या

एकनाथाच्या.

कृष्णाधरूनियांचित्तीं ॥ चालतसेहंसगती ॥ चैद्य
मागधपाहती ॥ मदनेंख्यातायारकेला ॥ १ ॥ मा
झीअभिलाषितोजननी ॥ ह्मणोनिविंधिलेंकाम
बाणीं ॥ वीरपडलेधरणीं ॥ मदनबाणीमूर्छित ॥
२ ॥ कामेंहरितल्याहरी ॥ धनुष्यगळालीसरी ॥
भीमकीरावाळीगोरटी ॥ हेहीपोळीविसरले ॥ ३ ॥
रथीचेउलथलेथोरथोर ॥ अश्वाहूनीपडलेवीर
॥ गजींचेकलथलेमहाशूर ॥ रितेकुंजरगळदंडी
॥ ४ ॥ भीमकीपाहेसमोंवतें ॥ वीरभांदिलेमन्मथें ॥
[illegible]तीनाहींतेथें ॥ तेणेंकामातेंजिंकिलें
॥ ५ ॥

श्लोक.

[illegible]

श्यामवर्णजोसुंदराकृती ॥ जाहलाअसेरुक्मि
णीपती ॥ जवळिदेखुनीलाजलीकशी ॥ पदर
सांवरीजाहलीखुशी ॥ १ ॥ कंबुच्यापरीकंठत्या
वरी ॥ तोचमालिकाघातलीकरी ॥ माळयेउनीउ
चलुनीतिला ॥ सर्वपाहतांदेवचालला ॥ २ ॥

रुक्मिणी:— (लाजून हलकेच) प्राणनाथा, माझें आजचें कृत्य यावेळेस

जसें सर्व समक्ष आपण सफल केलेंत तसें मजला येथून घेऊन जाईपर्यंत कोणाचाही कांहींच इलाज न चाले असें करावें.

**श्रीकृष्ण:**— प्रिये, भिऊंनको! कांहीं कोणाचाही इलाज चालणार नाहीं. तूं स्वस्थ ऐस; तो मागें पहा—(असें बोलून मान वळवून) कायरे अनंगा, या सर्व मनुष्यांस तूं मोहपाश चांगला घातला आहेसना?

**मदन:**— (हात जोडून) महाराज, आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त तेजोरूप दाखवूनच केला आहे. (इतक्यांत श्रीकृष्ण रुक्मिणीस रथांत घेऊन यादव सैन्यांत जातात.)

**रुक्मिया:**— (इकडे तिकडे पाहून) रुक्मिणी पुढें गेली काय? (असें बोलून थोडासा पुढें जाऊन चहूंकडे पाहून) काय त्या गारोड्यानें एथून नाहींशी केली वाटतें, बरें काय चिंता आहे, तुजकडून पायां पडवून मी आपली भगिनी अणवीन. (असें बोलून आपल्या सैन्यांत येतो.)

## प्रवेश ४ था समाप्त.

# अंक २.

## प्रवेश ५.

### स्थळ.

### कौंडिण्यपुरांतील अंबिकालय.

### पात्रें.

| | |
|---|---|
| सर्वाशी | एक राक्षसी. |
| महादंष्ट्र | तिचा मुलगा. |
| वज्रदंष्ट्र | मुलाचा सोबती. |
| रुक्मिया | भीमकीचा भाऊ. |
| बलराम | श्रीकृष्णाचा ज्येष्ठबंधु. |
| अक्रूर | यादवांकडील महारथी. |
| कृतवर्मा | यादववीर |
| गद | यादववीर |
| सारण | यादववीर |
| सात्विक | यादववीर |
| चक्रदेव | यादववीर |
| सात्यकी | यादवीमहावीर |
| महाबाहु | यादववीर |
| कंक | यादववीर |

(यादवांचे दहा महारथी आणि याशिवाय अंमलदार १०० आणियाशिवाय सैनिक.)

**सर्वाशी**:—(इतक्यांत वधूपक्षाकडील सर्वलोकांचे समाजांत एक राक्षसी येऊन मोठ्यानें ओरडून दात खाऊन पाय आपटून बोलत आहे.) अरे महादंष्ट्रा, तुझा जन्म झाल्यापासून तुला खाण्यापिण्यास मिळत होतें परंतु आलीकडे उपोषणें पडूं लागलीं, आणि माझें तर (अरे जळालें जळालें भाजलें भाजलें)

हीं पहा माझे पोटांतील सर्व आंतडीं जठराग्नीनें जळताहेत आतांकाय-करावें यावेळीं मला जर लहानसा मांसाचा तुकडा आणि कुडचाभर शोणित मिळतें तरीमी आपला जीव वांचवीन, पण आतां कसें करावें? अरे, तुझा धाकटा भाऊ कोठें आहे?

महादंष्ट्र:— बघा, तो काहीं भक्ष्य पहात असेल. पण तूं काल ह्मणाली होतीस कीं, उद्यां तुला यथेष्ट अश्वोष्ट्र गज मनुष्यांचें ताजें रक्त आणि मांस देईन, तें कोठें आहे? एथें तर एक हाडूक देखील दिसत नाहीं (इतक्यांत त्याचा धाकटा भाऊ वज्रदंष्ट्र हातांत मोठमोठे रांझण घेऊन येतो आणि,—

वज्रदंष्ट्र:— अरे दादा, बयानें काल सांगितल्या वरून माणसाचें रक्त नीट पणें फार दिवस राहाण्यासाठीं हे पहा (असें बोलून तो आणलेले रांझण दाखवितो) रांझण आणलेआहेत यांत भरून ठेवूं.

सर्वाशी:— थांबारे पोरानो, आतांच क्षुधेनें प्राण जाताहेत आणि तुह्मी उद्यांची चिंता कशाची करितां?

महादंष्ट्र:— आमचा भरवसा आहे कीं, आतां थोड्याच वेळांत येथें युद्ध चालू होईल, मग काय आपली अबादानीच आहे (असें बोलून जीभ बाहेरकाढून ओठ चाटतो.)

वज्रदंष्ट्र:— दादा, चल तर युध्धारंभ होईपर्यंत आपण हिंडून यऊं.

सर्वाशी:— पोरानो, आतां थोड्यासाठीं कोठें जाऊंनका. (इतक्यांत रुक्मिणी विषयीं बोभाट होऊन सैनिकांस पुढें करून रुक्मिया येतो.)

रुक्मिया:— प्रस्तुत कालीं यास्थळीं प्राप्त झालेल्या सर्व वीरांस माझी सविनय अशी विनंति आहे कीं, विवाहोत्सवाची प्रधानस्थानापन्न माझी बहीण रुक्मिणी देवि त्या श्रीकृष्णानें चोरा प्रमाणें कपट करून चोरिली आहे तर यादवां खेरीज सर्व वीरानीं कृपा करून ज्यांस वधूपस स्वीकारणें असेल त्याणीं मजकडे

यावें आणि वरपक्षाकडे जाणारानीं यादवांकडे जावें आणि उभय पक्षानी युद्ध करावें नंतर चोरी हस्तगत झाल्यावर हा विवाहोत्सव संपवावा. (असें ऐकतांच बळराम प्रथमतः पुढें होतो आणि हातातील मुसळ हालवून)

**बळरामः**— ऐकतां काय सर्व यादवहो, हा पोर्या काय बोलतो आहे तें. तर-आपल्या सर्व सैन्याचा बुरुज माझ्या आसमंताद्भागापासून दूर असा रचावा.

**सर्वयादव**— (ऐकतांच त्याप्रमाणे करितात.)

**रुक्मियाः**—(यादवांचा बुरुज पाहून) वधूपक्षाचे वीरहो, पाहतां काय? यादव सेनेचा व्यूह तयार झाला आणि आमचे वीर कोणकोणते हेंही अद्यापि समजत नाहीं. (असें ऐकतांच जरासंध पुढें होतो आणि त्यास पाहून वधूपक्षाकडेवीर जमू लागतात. त्यांचीं नावें. जरासंध १ शाल्व २ पौंड्रिक ३ विदुरथ ४ वक्रदंत ५ गवेषण ६ अंग ७ वंग ८ कैशिक ९ कारुषिक १० कलिंग ११ मागधेश्वर १२ या प्रमाणें मुख्य वीर एकत्र होऊन त्या सर्वांचीं सैन्यें एकत्र होतात आणि सर्व युद्धाची तयारी करितात.)

**बळरामः**—(प्रतिस्पर्ध्यांची युद्धतयारी पाहून आपण पुढें होऊन दोन्ही सैन्यांतील वीरांस) ऐकतां काय वीरहो, हें युद्ध धर्माचें आहे यास्तव उभयपक्षांतील वीरानीं स्वशक्तितुल्य वीर पाहून त्याच्याशीं युद्ध करावें तें असें कीं, मी आणि जरासंध, सात्विक आणि वक्रदंत, पौंड्रिकाशीं कृतवर्मा, विदुरथ आणि अक्रूर या प्रमाणें परस्परानीं युद्धकरावें. याशिवाय क्षात्रधर्म प्रमाणें या युद्धांत कोणी दुष्ट कल्पनेनें काहीं अनर्थ केल्यास त्याशीं उभय पक्षांचा संबंध नाहीं. याशिवाय आपापल्या सैन्यांत कोणी रवेगले भागेले त्यास ज्याचा त्याणें संभाळलें पाहिजे. (असें ऐकतांच उभय पक्षांतील वीरानीं टाळ्या वाजविल्या आणि रण वाद्यें वाजूंलागलीं.

**चैद्येश्वरः**—(जरासंधास) जरासंधा त्या बापुड्या गोळ्यांच्या हातून आपलें क्षत्रियांचें काय होणार आहे? कारण आमच्या बाणाचा वेग त्यांस क-

७३

ध्रु०॥ वीर भावे पडतिल रणीं ॥ सासऱ्यां होइ देहणी ॥ कैंची आणिली सवैरिणी ॥ ह्मणि होइल भावणीं-चाळा ॥ युद्ध० ॥ १ ॥ सरवे बंधु मरतिल रणीं ॥ दुःखें कुढेल जननी ॥ तुटले माहेर येथोनी ॥ या परी करी दुःखें वेल्हाळा ॥ युद्ध० ॥ २ ॥ ऐकुनी या वनमाळी ॥ ह्मणे नाभि इतूं वेल्हाळी ॥ पह्मा उठली यादव टोळी ॥ सांवरी तो झळकती माळा ॥ युद्ध० ॥ ३ ॥

**श्रीकृष्णः**— प्राणप्रिये, तूं काय समजली आहेस ? पह्मा हे यादववीर एका क्षणार्धांत तुझ्या भावाच्या सर्व सैन्याचा आणि याशिवाय चैद्य, मगध, जरासंधादिकांची धुळधाण करितील. ( इतक्यांत जरासंधा सभोंवते सर्व वीर जमतात आणि त्यास आपलें युद्धकौशल्य मोठ्या पांडित्यानें सांगतात. )

पद चा० बघि झालें आता०

वीर जरासंधा ॥ ह्मणति ऐक संधा ॥ ध्रु० ॥ गौळियांच्या झुंजिं आह्मा काय थोरपण ॥ कैंचें युद्ध याशि ठावें व हावें पाणी तृण ॥ वीर० ॥ १ ॥ अंगवीर करुनि धार कं कावरी आला ॥ गजासहित कंकवीर मारिलें च त्याला ॥ वीर० ॥ २ ॥ कलिंगास कोप आला सात्यकी मगाठे ॥ ग्लान बघुन निवंगये इत्याचि याचि पाठी ॥ वीर० ॥ ३ ॥ वंगरायें सारणास ॥ जेर फार केला ॥ वृक्ष उपटुनि बलदेव तेथ वेला ॥ वीर जरा० ॥ ४ ॥ मारुनियां झाड धाड दिशी त्यास मारी ॥ गतप्राण अधोमुख पडे तेंच कुडी ॥ वीर० ॥ ५ ॥

प्रवेश ५ वा समाप्त.

सा सहन होईल, कां कीं त्याणीं गाई म्हशींचें दूध काढून त्यावरच त्याणीं निर्वाह करावा, त्यांस हें आहवधार्ष्ट्य कोठचें ? पहा ते आतांच भिऊन रुक्मिणीस येथेंच टाकून जातील. (अशीं दुरुत्तरें ऐकतांच गद या नावाचा वीर क्रोधाविष्ट होऊन शत्रूवर चालला आणि त्यास पाहून बळरामही उठले.

पद चा॰ सुत्तऐकुनि॰

गर्दितऐकुनिमर्दितगदतोवधितवीराचालला ॥ काम
पालाक्रोधाआलाधरुनिलांगलधांवला ॥ ध्रु॰ ॥
जरासंधासवेंआहवसीरपाणीकरितसे ॥ कुटिलदं
ताकुंठवीगदकांहित्याचेंनचालेसे ॥ गर्दित॰ ॥ १ ॥ पौं
ड्रिकावरिमूतवर्मातुटुनित्यालाआटवी ॥ शरामारु
निप्राणघेउनिशमनसदनापाठवी ॥ गर्दि॰ ॥ २ ॥ पौंड्रि
काच्याबधुनिकालाविदूरथतोधावला ॥ अक्रूराच्या
क्रूरबाणेंरवचरत्वापावला ॥ गर्दित॰ ॥ ३ ॥ सात्य-
कीआणिचक्रदेवकंकसारणयादवा ॥ अंगवंगहिक
लिंगादिकवधुपाक्षिकआहवा ॥ गर्दित॰ ॥ ४ ॥ बा
णसुटतोसणसणा ॥ आणिखड्गवाजतोखणखण-
णा ॥ शस्त्रघर्षणजातवेदंबाणजळतोदणदणा ॥
गर्दित॰ ॥ ५ ॥

त्या प्रमाणें सकलसैन्यांत मारामारी तोडातोडी चालली आहे आणि कित्येक वीरावेशानें व कित्येक भिऊन असे अक्राळ विक्राळ स्वरानें ओरडताहेत, गृध्र, भल्लूकादिक भयंकर आराव करिताहेत तें एकून रुक्मिणीस करुणा येऊन ती परमेश्वरास बोलते.

रुक्मिणी:— पद चाल धांवमाये॰

सुखदेखुनीभीमकबाळा ॥ बोलतसेश्रीगोपाळा ॥

(भिऊन कांपत कांपत) आर्या, सूत्रधारा, ते पहा पहा कित्येक हत्तींचे पाय तुटले आहेत, कित्येक घोड्यांचे खुर तुटले आहेत आणि त्या श्वफल्कानें तर गर्दीच करून दिली आहे.

सूत्रधार:— अरे, रे, रे, तो पहा वधूपक्षा कडील गवेषण वीर पुढें झाला आहे आणि त्याणें श्वफल्काचा रथ मोडिला तर आतां कसें होईल.

विदूषक:— कसें कां होइना, परंतु तो बघ अनिर्दन कसा आकाशांतून पृथ्वीवर आपटून थोपल्या प्रमाणें मेला.

सूत्रधार:— मित्रा, हें पाहिलेंस काय ? (असें बोलून पद गाऊं लागतात.)

पद.

चाल हरिबोलो.

घेउनिदारुणबाणासिसारण ॥ येउनिपुढतीमाज
वीतोरण ॥ ध्रु० ॥ तोडिनतीरंगवेषणधनुषा ॥ अन
र्थकृतिहीसर्वमनुष्या ॥ घेऊ० ॥ १ ॥ यापरीमोडी
लींतीनधनुष्यें ॥ पाहुनिझालींचकितमनुष्यें ॥ घे
ऊ० ॥ २ ॥ गवेषणवीराक्रोधचिआला ॥ सारणराया
सिमूर्च्छितकेला ॥ घेऊ० ॥ ३ ॥

(इतक्यांत ज्या युद्धांत पर्जन्या प्रमाणें तीर वर्षताहेत आणि नदीच्या पूरा प्रमाणें रुधिर वाहत आहे अशा त्या अघोर युद्धांत बळराम येतो त्यास पाहून.)

विदूषक:— आर्या, आतां बरीक फार कठिण आहे. हा पुढें पाहिलास काय, केवळ कृतांता प्रमाणेंच ज्याचा दर्प असा महावीर बळराम आला.

सूत्रधार:— अरे होय पाहिला. (असें बोलून गाऊं लागतो.)

पद.

चाल भक्तांसिभग.

पाहतांचिबलभद्राला ॥ चित्तध्याथित्यारुद्राला

अंक २

प्रवेश ६

स्थळ.

युद्धभूमी.

पात्रें

| | |
|---|---|
| सूत्रधार | नाटककर्ता. |
| विदूषक | त्याचा सोबती. |
| बलराम | श्रीकृष्णाचा भाऊ. |
| वक्रदंत | वधूपक्षाचा वीर. |
| सात्विक | यादववीर. |
| जरासंध | वधूपक्षाचा वीर. |
| गद | यादववीर. |
| रुक्मिणी | आदिशक्ति. |
| श्रीकृष्ण | परमेश्वर. |

विदूषकः— श्लोक

चा० केकावळी.

पहानिशितत्याकशाचमकतीविजेच्यापरी ॥ रणांततलवारिस्या अणिविशेषवाद्यंतरी ॥ रवेंगगनकोंदलेंबहुतमोंदलेंस्याडतें ॥ वधूनिपळतीलयासि ह्मणतीजगींस्याडते ॥ १ ॥

आर्या.

शस्त्रासहकरतोडिति मुकुटासहउडवितीशिरेंवीर ॥ एसेंपाहुनिगळला विदूषकाच्यामनामधिलधीर ॥ १ ॥

आपटितांनागररवाळीं ॥ गाठिलागवेषणचाली ॥ १॥
पावलापतननतोवीर ॥ वमलाशोणितस्फटलाधीर ॥
२॥ लाजलापकेंइ तुक्यांत ॥ बलरामसारीलात ॥
३॥ गतचेतनहोउनिरुधिरा ॥ वमुनोझालाबधीरा
॥४॥ आतांहोइलकेसंत्राण ॥ ह्मणतुनिघेउनियां
प्राण ॥ घेऊनियांरथींगवेषण ॥ पळालासैनिकतो
जाण ॥ पावलानचि भद्राला ॥ पाहतां० ॥ १ ॥ रा
माचाविक्रमपहातां ॥ पुढतीकरिनीगजता ॥ आले
सैंद्रखुनिवीर ॥ हालवीमुसळबळधीर ॥ हाणिआ
धिकरिच्यामाथीं ॥ ओढेरुधिराचेवाहती ॥ नागरें
हजारोनाग ॥ मारीधरिपळतेंचांग ॥ आसडूनिमा
[illegible]

सुनिवीर ॥ मुसळानेंझोडीधीर ॥ यावनींतह्मण-
तोवीर ॥ अजेयजोयास्फद्राला ॥ पाहतां० ॥ २॥

( भ्यालेंसें करून ) विदूषका, हा पहा अगदीं आपल्या समीपभागीं हजारो वीरांचे बाण ( वसंत काळीं स्वल्प वर्षाव करणाऱ्या पर्जन्याच्या शीतल बिंदूचा मोठ्या उत्सुकतेनें स्वीकार केल्या प्रमाणें ) सोसून सहज धक्यानें हत्ती मारीत, पायानें पायदळ चिरडीत, घोडीं झोडीत झोडीत हा महावीर मुकुटमणी बळराम आपल्या समोरच आला तर आतां येथें आपलें संरक्षण कसें होइल.

विदू०.— कसें होईल ह्मणजे हें काय विचारितां ? काय आपलें आयुष्य आजच संपलें कीं काय ?

सूत्र०.— मित्रा, हे बघ हें समोरचें कृत्य पाहून थोडासा धीर आला. तें ब[illegible] ( ज्याक्षणांत मधूपक्षांत शाल्वीर असमर्थ झाला असें पाहून पुढें होतो आणि त्याला सर्व वीर अनुसरून मोठा अनर्थ करितात. )

विदूषक:– अरे, हें पहा.(असें बोलून ओवी ह्मणतात.)

ओंवी.

एकनाथाची.

पृथ्वीचें उरवळ जाण ॥ नांगरें वीर घालीवेरण ॥ मुसळघायीं करीचूर्ण ॥ रणकंदन ऐसें करी ॥ १ ॥

(मान हालवून) वक्रदंत जरासंधादि वऱ्हाडी कांडणारा बळराम यास शाल्वानें उपद्रव केला होता परंतु त्यास अक्रूरानें हटविलें, तर आतां मोठीच मजा होणार आहे.

सूत्रधार:– हिला काय मजा ह्मणतात होय रे? (इतक्यांत बळराम अक्रूरास मागें करून ह्मणतात.)

बळराम:– कायरे अक्रूरा, तुला पुढें येऊनको ह्मटलें असतां आणि शत्रु मलाच बोलावीत असतां तूं कशा करितां आलास? अरे ह्या बापुड्या शाल्वास तुझें कारण नाहीं आतां हा मेलाच असें समज. (असें बोलून शाल्वराजावर तुटून पडतो.)

पद.

चाल जानकिजीवन.

बळरामें थोर काम केलें रे ॥ ध्रु० ॥ सरथ तो शाल्व धरियेला हातिं ॥ सर्व वीर ज्यास पहातातीरे ॥ बलरामें थो० ॥ १ ॥ मारुनि उडी तो शाल्व पळाला ॥ मोडुनी रथासी केलि ख्यातीरे ॥ बल० ॥ २ ॥ रथाचि घातोल्याच्चुकवुनी अंग ॥ करनीउभा सेंथोर हातीरे ॥ बलरा० ॥ ३ ॥

सूत्रधा०:– विदूषका, हें पाहिलेंस ना, त्या शाल्ववीराचे महावेगयुक्त गदाप्रहारा बरोबर बलराम आकाशांत उडाला आणि पुनः खालीं येऊन

शाल्वास मुसळ मारिलें, आणि त्या आघातानें तो वीर निश्चेष्ट होऊन रक्त-ओकीत पडला आहे. त्याच्या नांगरानें तर अंतच केला. हा बळराम नव्हे तर ही साक्षात् महामारीच या युद्धांत उत्पन्न झाली आहे.

**विदूषक:-** मित्रा, महामारी नव्हे. हा नांगऱ्या पाटील आहे, कारण पहा तो महावीर असून जसा हत्यारास दुकाळ पडावा असा हा नांगर आणि मुसळ घेऊन सैन्य शेतांतील वीरांचा काशा काढितो आहे, आणि या कुळबटानें-अतिरथी महारथी गज रथ पदाति सादि हीं खुंटाडीं मोडून कीर्तिबीज पेरण्यासाठीं शेत वजवून त्यास रक्तोदकाचे पाटाचें पाणी पाजितो आहे असा हा कीर्तीचीं शेतें पिकविणारा शेतकरी आहे.

**सूत्रधार:-** मला वाटतें जसा. ( असें बोलून ह्मणूं लागतो. )

## ओंवी.

### एकनाथाची.

महावीराघालितांघावू ॥ अशक्तेंडवरलाबलदेवू ॥
तेणेंशोभतमहाबाहू ॥ रणभैरवडुल्लत ॥ १ ॥

**विदूषक:-** हा पहा कसा रणमदानें मत्त होऊन नांगराचे प्रघातानें वीरांचा शेवट करीत आहे. तेणें करून वाहाणाऱ्या रक्तांच्या नद्यांस दुतर्फा प्रेतांच्या दरडी शोभताहेत. कित्येक वीरांचीं रक्तसु लोचनानीं भयंकर दिसणाऱ्या मुखावरील केश रणनदींतील शेवाळ्या प्रमाणें दिसताहेत, आणि मगर सुसरींची बरोबरी तींच वीरांचीं मुखें करिताहेत.

**सूत्रधार:-** होय आणि त्या प्रमाणेंच या रणनदींत रथाचे ध्वज हेंच श्रीकृष्णानें भवनदींतून स्वर्गापर्यंत उद्धार करण्याचें घंटाघोष लक्षणा प्रमाणें शोभत आहे.

**विदूषक:-** मित्रा, या युद्धांत हा एक चमत्कार पाहिलास काय? पहा तीं खड्गाना बरोबर वीरांचीं शिरें उडून गगनप्रदेशीं जाऊन जसे कोणी लांबही अस

ले तरीं महत्फला साठीं त्वरित जवळ येतात, तशीं हीं मस्तकें साक्षात्परमेश्वराचा वियोग नव्हावा म्हणून स्वर्गासही तुच्छ मोजून परत येऊन येथेंच पडतात. (इतक्यांत वक्रदंत पुढें होऊन क्रोधाविष्ट होत्साता पदवी सोडून सात्विकनामक यादव वीरास बोलतो.)

**वक्रदंतः**—(डोळे फिरवून). काय या येथें जमलेल्या आया बायांशीं युद्ध करूं म्हटलें तर व्यर्थ आहे. (सात्विक समोर होता त्यास) कायरे, तूं तर केवळ सात्विकच, आणि कदाचित् तुझें दांडगेपण तापस लोकांसच माहित असेल. तर आतां तुजसारिख्याशीं माझें युद्ध कोठून घडणार? तर आतां बापुड्यारे मार खाऊन मग पळून जाणार तो अगोदरच जा.

**सात्विकः**— अरे वांकडदांत्या, हा सात्विक आपली सात्विकता फारच स्वल्पावकाशांत तुला दाखवील, ती असी कीं, तुझ्या तोंडांत मारून दांताचा वांकडेपणा नाहींसा करील. अरे उन्मत्ता सात्विकास शरण गेल्यावांचून तुला सत्व कोठचें मिळणार, तर तीं तुमचीं अभिमानाचीं कवचें फोडून सात्विकाचा घाव मारितो तो असा कीं, त्या घावापासून तूं परतणार नाहींस. विशेष काय पण तुझे प्राण घेतल्यावांचून येईन. (असें परस्परांस बोलून एकमेकांवर बाणाचा वर्षाव करूं लागतात.)

## साकी.

वक्रदंतबहुकोपुनिसात्विकवीराचेंधनुतोडी॥ शस्त्रें बहुविधमारानेसात्विकत्यालाभूवरिपाडी॥१॥
मारीलाताआणिसहर्षें सिंहरवाकरिताहे॥ वक्रदंत नव बहुत भयानें पलायनाकरिपाहे॥२॥ बुद्धिमंदतोजरासंधतव गदरायाबदताहे॥ येलांमजशीं झगडूंदेइनशीघ्रतयागदताहे॥३॥ कोणीमजशीं युद्धकराया नाहींसमर्थोलुच्चा॥ योग्यहोसितूंस्

र्यजरीतरिअगदोंह्मोइलहुप्या ॥ ४ ॥

ओव्या.

एकनाथाच्या.

मशकाचेनिचरणप्रहारें ॥ महामेरुउभाचिचिरे ॥ इंद्रासिभिडिजेउंदिरें ॥ नेंतुजमजघडेलसंग्राम ॥ १ ॥ घटामाजीसिंहसांपडे ॥ जाभाईमाजीआकाशबुडे ॥ वायुरेमाजीबाराआडवे ॥ नेंतुजमजघडेसंग्राम ॥ २ ॥

आर्या.

आलेरव्यसर्पदेखुनि तास्यांलाअंगकंपहोयजरी ॥ होइलसंग्राममशी मशकाएकेमद्गुक्तिहीचतरी ॥ १ ॥

गद:— (जरासंधास) मूर्खा, वाग्जल्पना किती करतोस ? तुला जरेनें सांधलें आहे ह्मणून गर्वोक्ति करूंनको, मी मूर्तिमंत जाला गद ह्मणतात तोच आहें तरी तुझ्या संधींचें विदारण एकाक्षणार्धात करीन.

ध्रुपद

राग. कानडा.

झुंझतोतेवीरमहाधीर ॥ मारितोतीरकाढितोनीर आनीकाचा ॥ ध्रु० ॥ जरासंधवर्मधरुनि मारीशार खरतर गद ॥ मदटाकुनियआराखुनि पळकाढी- तोनिघाघर ॥

पद

रागसारंग.

जरासंधकरुपलायनजालापाहुनिसैनिकलहुप्या-

॥ हलधरविक्रमयोगेंवीरहि मीनिससुद्रामृतप्याले ॥ ध्रु० ॥ जीवरारवुनीपळतीआणिकमार्गेपाह्नीनि गजघोडे ॥ ह्मणतिनकोहादेहवांचल्या पुनश्चसर्व हिहेंजोडे ॥ अडखळतीकितिपळतांपळतांसावरितांना हिकुऱ्हाडी ॥ वीरांह्मणतीयोद्धेनआह्मीनव धावधुचेंचिवऱ्हाडी ॥ रुक्मकरायेंबहुविधधायेंलालटुंपेटाजणुल्याले ॥ असेंवऱ्हाडीबोललेंत्यालग्नींगुळ्यांपायपुगाले ॥ जरासंधळूनय० ॥ ३ ॥

**विदूषक:—** गड्या सूत्रधारा, आतां माझ्या मना जोगें झालें. ते पहा जरासंधादि महापराक्रमी वीर, धीर सोडून कसे पळताहेत आणि ह्या बाकीच्यांची कसी हबेलंडी होऊन गेली आहे. (वीरांस) अरे पळूनका पळूनका, तुह्मास या गोळ्यांच्या मंडळांतील थोडेसें लोणी खावयास देतों आणि जाना कां.

**सूत्रधार:—** (एकनाथांच ओंव्या ह्मणूं लागतो.)

आव्या.

एकनाथाच्या.

निजमार्गासीविन्मुख ॥ युद्धींजाहलेपराङ्मुख ॥ राजेनरवीरअनेक ॥ पळतांदुःखपावले ॥ १ ॥ अत्यंतप्रळयकरितांदेख ॥ तंवसंकर्षणेंदिधलीहाक ॥ पोटींघेऊनियांधाक ॥ एकाएकपळाले ॥ २ ॥ देहलोभाचीबापुडी ॥ पाईंममतेचीबेडी ॥ विस्मरणाच्यारवरसनोडी ॥ जरेंकुंडीघातली ॥ ३ ॥ सांडिलींपुरुषार्थाचींलुगडीं ॥ केवळनागवेउघडीं ॥ विन्मुखपडतीउघडीं ॥ मेलींसडींहोऊनिठेलीं ॥ ४ ॥ चहूंपुरुषार्थांमजेवार ॥ केवळजररळीचेंभाड ॥ द

शशिपाल:— वस्तादजी, चक्रदंड कसा होतो?

वस्ताद:— आपणास ही गोष्ट माहित नाहीं?

शशिपाल:— केवळ अश्रुत आहे असें नाहीं परंतु आपण वस्ताद ह्मणून प्रश्न केला.

वस्ताद:— उत्तम आहे, हा बंध असा होतो कीं, मोराप्रमाणें दोन्ही हात टेकून आपल्या भोंवती वर्तुळ प्रदक्षिणे सारिखें हाताच्या आंतून फिरणे यास चक्रदंड असें ह्मणतात.

शशिपाल:— (ऐकून आनंदानें करेला फिरविल्या प्रमाणें गदा फिरवितो आहेतो)

ओंवी.

एकनाथाची.

निजमंडपींशशिपाळ॥ करीतहोतागदारोळ॥ भीम
कीचेरुनिगेलागोपाळ॥ ऐसेंयेऊनिबोलिला॥१॥

ओंवी.

नवीन.

ऐकोनिपडियेलाविकळ॥ मुखांतूनगळेलाळ॥ सेव
कधरितीआंगवळ॥ गात्रेंविकळपडियेलीं॥२॥

दिंडी.

नेत्रजाहलेपांडुवर्णज्याचे॥ बाणभीमकीप्रात्पिवि
षयिज्याचे॥ हृदयिंलागलेंकायदुःखत्याचें॥ व
दूंजाऊंपाहतीप्राणत्याचे॥१॥ गतप्राणापरीविक
ळजाहलाकीं॥ हीचवार्ताजाहली मृत्यलोकीं॥ न
मारीतांयेतलाप्राणजोकीं॥ सर्वभ्यालेअपमृत्यु
च्याचधाकीं॥२॥

श्लोक.

रितीयुक्तीचीरवटपट ॥ भिकेंपोटभरूंआले ॥ ५ ॥

मित्रा, या शिवाय पुष्कळ लोक तऱ्हे तऱ्हेचीं सोंगें करून येथून पळून गेले. ते पहा कित्येक गोंधळ्याचे रूपानें उदो उदो ह्मणून जीव वांचवितात. तर झालें आतां समजलें, कदाचित यापुढें युद्ध झालें तरी तें असेंच होणार. (असें बोलून नाक मुरडतात.)

**रुक्मिणीः—** (कृष्णाच्या गळ्यांत हात घालून) प्राणनाथा, मी प्रार्थना केल्या प्रमाणेंच झालें, या युद्धांत कोणी नमरतां भिऊन पळाले हें फार चांगलें झालें नाहीं बरे?

**श्रीकृष्णः—** होय चांगलें तर खरेंच परंतु कोणी मेले नाहीं असें नाहीं, पुष्कळ मेले.

(सर्व जातात.)

प्रवेश ६ वा समाप्त.

---

## अंक २ प्रवेश ७

### स्थळ.

### शिशुपालाचे राजमंदिरांतील तालिमखाना.

### पात्रें

| | |
|---|---|
| शिशुपाल | एक राजा. |
| वस्ताद | कुस्ती वगैरे शिकविणारा. |
| विनयपालक | खिसमतगार. |
| कंचुकी | चोपदार |
| शिशुपालमाता | शिशुपालाची आई |
| कराली | शिशुपालमातेची कुणबीण. |
| नागरिक विप्र | गावांतील भटजी. |
| सेनापति | सैन्याचा अधिकारी. |
| जरासंध | एक महारथी मगधदेशाचा राजा. |

(असें बोलून डोकें बडविते.) माझ्या पापिणीच्या दृष्टीस सुनमुख कोठून पडणार, आतां सोहळा कोठचा हर्षांत विष कालविलें गेलें. तो मूर्ख रुक्मिया त्याणें मृत्यपं चकावर विवाहोत्सवास आरंभ केला परंतु तो काळा मोठा जोशी त्याणें तो वे ळ साधून आपलें कार्य साधिलें आतां कसें करावें. (असें बोलून नेत्रांतून अ श्रु गळत असतां हात जोडून) हे कुलदेवते, कृपा कर आणि माझ्या शिशुपाला स वांचीव. (या प्रकारें त्या सर्व स्त्रियांसह विलाप करणाऱ्या शिशुपाल मातेनें - त्या राजास नेत्रोदकानीं भिजविलें असतां तो सावध होऊन.)

## आर्या.

मातेसहत्याबाया पाहुनिरायासरुदनबहुआलें॥सु
विचारेंमगत्याच्या मुखींदिसेतेजभक्षितांआलें॥१॥
नोवरिसुंदरनेली आहवशक्तीसुळेंचकृष्णानें॥ केलें
जर्जररामेंजयकर्मीद्विपहतातिलृष्णानें॥२॥

(आश्चर्य केलेंसें करून) काय करावें, हे रामकृष्ण दुर्जय आहेत. नाहीं तर त्या बापुड्या यादवानीं काय करावयाचें होतें. तस्मात् (विनय पालकास) जारे सेना पतीस बोलावून आण. (ऐकतांच तो जातो आणि त्यास घेऊन येतो.)

**विनय०:—** सरकार, हे आले सेनापति.

**शिशुपा०:—** बरें आहे. (इतक्यांत सेनापति येतो आणि आपल्या पदवी प्रमाणें बसतो आणि मुजरा करतो.)

**कंचुकी:—** सेनापति वंदन करितात. निगाररखवे.

**शिशुपा०:—** या सेनापते, बसा. या वेळेस कशा करितां बोलाविलें हें तुह्मास स मजलें काय ?

**सेनापति:—** नाहीं, कशावरून समजावें. सरकारची आज्ञा होईल तेव्हां समजेल.

**शिशुपा०:—** ऐका तर. कौंडिण्य पुरांत भीमकराजाच्या घरीं त्या कृष्णारामानीं - मोठा अनर्थ करून रुक्मिणी हिरावून नेली, आणि अंदाधुंदी करून दिल्ही आहे.

म्लानजाहलाआननेंदुतो॥ व्यस्तनाडित्यावाहता
तो॥ विनयपालकादुःखहोउनी॥ वाजवीतसे-
शंखयेउनी॥१॥

(इतक्यांत तो शब्द ऐकून कराली घाबरेपणी येऊन शिशुपालमातेस जागी करित्ये.)

**कराली.**— (पलंगाची मच्छरदाणी एकीकडे करून) आईसाहेब, उठा उठा, शिशुपाल महाराजांची प्रकृति एकाएकीं अत्यावस्थ जाहली आहे.

**शिशुपालमाता.**— (डोळे चोळीत चोळीत उठून बसते आणि) कोण आहे? (तिला पाहून) करालिके, तूं आहेस काय? मला आतां तुकतेंच स्वप्न पडलें कीं,-अत्यंत सुंदर अशी एक सौभाग्यवती स्त्री येऊन तिणें सांगितलें कीं, माझें कार्य झालें आणि आतां जर तुझा पुत्र एकादी गोष्ट आग्रहपुरःसर करील तर तो फजितीतें पावेल.

**कराली.**— याहून फजित्ती ती कोणती? आतां आपण अगोदरच तालिमखान्यांत चला.

**शिशुपालमा०.**— चल तर (असें बोलून तालिमखान्यांत येऊन पाहते तों)

## ओंवी.

### एकनाथाची.

महाशब्दमंडपद्वारीं॥ मिळालियानगरनारी॥ मा
तायेऊनरुदनकरी॥ कपाळकरींपिटित॥१॥

**कराली.**— (तिला सांवरून) सरकार, आपणच जर असें केलें तर बाकीच्यांची व्यवस्था कशी होईल बरें? तर असें करूंनका. या विषयीं कांहीं तरीं योग्य तजवीज करा.

**शिशुपालमा०.**— अगे, आतां कशाची तजवीज आणि कशाचें काय? ती त्रिपुरसुंदरीच कोपली. बाईगे! हें लग्न नव्हे विघ्न झालें. अगे, माझें कपाळ फुटलें

तर आपण जाऊन त्यांची खोड मोडून टाकूं तर तुह्मी सर्व सेन्याची तयारी स त्वर करा; डंके, भेरी वाजवा, आणि माझ्या रथास घोडे जुंपून आणवा.

**सेनापती:—** फार उत्तम आहे. एका क्षणार्धांत सर्व तयारी करितों. ( असें बोलून निघून जातो. )

**विदूष०:—** मित्रा, हें ऐकिलेंसना ? आतां पुनः हे राजश्री सैन्य घेऊन जाऊन रामकृष्णांची खोड मोडणार !

**सूत्रधार:—** अरे, हें कृत्य डोहाळ्या वरून बाळाची परीक्षा करितात त्या प्रमाणें आहे. कारण मघां बातमी ऐकतांच सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें आहे, आणि आतां हा उगीच वडबडतो आहे. ( इतक्यांत सर्व सैन्यें तयार होऊन रणवाद्यें वाजूं लागतात, आणि शिशुपालाचा रथ तयार होऊन येतो. )

**शिशुपा०:—** कायरे, अजून तयारी झाली किंवा नाहीं ?

**कंचुकी:—** महाराज, सर्व तयारी आहे. आणि सरकारचा रथही तयार होऊन आला आहे.

**शिशुपाल:—** चालंद्या तर हा मी आलों ( असें बोलून रथांत बसतो. ) ( याप्रमाणें सर्व सैन्यासुद्धां तो राजा ग्रामा बाहेर गेलातों निकडून दोन भट येऊन आपणाशीं बोलतात. )

**गोविंद भ०:—** आलेत काय ह्मादायपंत.

**महादे०:—** मध्यांत. ( मागें पाहून ) गे बाय गे बाय रे हें मागें काय ?

**गोविंद:—** काय ह्मणजे रे, हे शिपाय लोक आहेत.

**महादे०:—** ते मी समजतों परंतु हे आले कोठून आणि जातात कोठें.

**गोविंद:—** विचारें पाहतां कौंडिण्यपुरास विवाहार्थ जात असतील असें भासतें.

**महादे०:—** खरें ह्मटलेंत एवढें खरें, परंतु हे बाहेरून तुटके, फाटके, लंगडे, कुबडे कोठी कडून येतात बरें ?

**गोविंद:—** अहो हे त्या रुक्मिणीचे वऱ्हाडी पहा कित्येकांचे हात पाय तुटून कसे

रक्तबंबाळ झाले आहेत. कित्येकांचीं कपाळें बाणानीं फुटलीं आहेत. कित्येक धाका नें अरे पळा अरे पळा बळिभद्र आला, आतां तुह्मास या पासून वांचविण्या विषयीं कोणी समर्थ होणार नाहीं असें बोलताहेत. ते पहा कित्येक दांत विचकून पडले आहेत. कित्येक कण्हताहेत. कित्येक कुंथताहेत. कित्येक रडताहेत. कित्येक पडताहेत. कित्येक चडफडताहेत. आणि ते पहा कित्येक तोंडाला हात लावून खुणेनें पाणी मागताहेत.

**महादेव**:— गोविंद भटजी, त्या भीमकराजानें व्हाडी लोकांचा चांगलाच सत्कार केला तर आपण कशास त्या दक्षणेची इच्छा करावी.

**गोविंद**:— नकोरे बाबा मला ती दक्षणा, माझी बायको अगदीं तरुण आहे. तर मला त्या दक्षणेची आशा नको मी येत नाहीं.

**महादे०**:— जा. तूं परत गेलास तर माझें काय गेलें परंतु मीतर त्या आदिशक्ति आणि परमेश्वरांचे दर्शनार्थ जाणारच. तशांत कदाचित् मेलों तरी कृतार्थ होईन. (असें बोलून एक माघारां आणि एक कौंडिण्य पुरीस जातात.)

**शिशुपा०**:— (ख्यालेसें करून) सारथे, हें विकृत पाहून मला फार वाईट वाटतें आहे आणि हा समोर दिसतो हा काय जरासंध रथांतून येतो आहे कायरे?

**सारथी**:— होय महाराज, मगधेश्वरच आहेत. (इतक्यांत जरासंधाचा रथ समोर येतो त्यास पाहून शिशुपाल साकी ह्मणतो.

**शिशु०**:— साकी.

दुःखानेंसुखकाळेंझालें ओंउवाळलेज्याचे ॥ ल-
ज्जेस्तवजोशब्दनबोले चरितअसेंहेंत्याचें ॥ १ ॥
पाहुनिराजाशिशुपालहिमगजरासंधरायास ॥ बो
लेकांजेंमाप्तनव्हेत्या साठींनकरिअयास ॥ २ ॥

मित्रा, हा संसार ह्मणजे चौऱ्याशीं लक्ष पुतळ्यांचा खेळ होय. त्याचीं सूत्रें परमेश्वराचे स्वाधीन आहेत, तर तो तीं सूत्रें जसा हालवील तसें आपणास नाचलें

पाहिजे. तो दूर असून हा असा विचित्र खेळ करितो तेव्हां त्या खेळांत आपण सुख दुःखें मानूनयेत. सर्वभूतें त्याच्या आज्ञेनुरूप वर्तताहेत तर तूं सांग कीं, तुझ्या इच्छेनें कांहीं होईल?

**जरासंध:–** हीगोष्ट तुह्मी मला सांगावयास नको. कारण या विषयीं मी जेवढा अनुभव घेतला आहे तेवढा तुह्मास नाहीं. पहा त्या कृष्णाबरोबर तेवीस अक्षौहिणी सैन्य घेऊन सत्रावेळ युद्ध केलें परंतु शेवटीं माझी अशी दुर्दशा होऊन सैन्यही नाहीसें झालें तर जो उपदेश आपण मला केला त्याप्रमाणेंच आपण अंतःकरणामध्यें विचारपूर्वक मनन करून परत माघारें जावें यांत फार कल्याण आहे. कालांतरीं त्या यादवांचा समाचार घेऊं.

**शिशुपा०:–** बरें आहे तुमच्या सांगण्याचा अनादर करून मी जाणार नाहीं. परंतु त्या श्रीकृष्णरामानीं एवढा अनर्थ करून दिला काय?

**जरासंध:–** यांत काय संशय ह्मणूनच मी लज्जेनें आपलें तोंड काळें करून घराकडे चाललों आहें. (असें ऐकतांच शिशुपाल आपलें सर्वसैन्य मागें परतवून व आपला रथही परतवून निजमंदिरीं येतो.)

**शिशुपालमा०:–** (पुत्राचा रथ आणि सैन्य आलें सें पाहून) कायरे सेनापते, पुत्राचा रथ आला काय? बरें झालें एकदांचें विघ्न टळलें. (हात हालवून) खरेंच सांग, हा परत कोणत्या कारणानें आला बरें?

**सेनापति:–** (हात जोडून) महाराज, हा उपकार मगधेश्वर जरासंध राजानें केला.

**शिशुपालमा०:–** तो कसा?

**सेनापति:–** ऐकावें. (असें बोलून श्लोक ह्मणतो.)

### श्लोक

पाहूनिमागधतनूशरविद्धफार॥ ज्यांतूनलोहित-
गळेबहुज्यासवार॥ त्यादुर्बळासिपुसिलेंशिशुपालरायें॥ तेणोंदिल्हासकततुह्मातुमचात्सभाये॥ ५॥

**शिशुपालमा०**:— (ऐकून) काय जरासंधानें पुत्रास परतविलें.

**सेनापति**:— होय महाराज असेंच झालें.

**शिशुपालमा०**:— शाबास शाबास. जरासंधा, आज तूं माझा पुत्र माझ्या ओटींत घातलास आणि त्यास जीव दान दिलेंस, तर तुझ्या उपकाराची मी कधींही उत्तराई होऊं शकणार नाहीं; आज या जगांत त्वां मला धन्य केलेंस. (असें तो बोलल्यावर सर्व जातात.) प्रवेश ७ वा समाप्त.

---

# रुक्मिणीहरणनाटक.

## अंक २

## प्रवेश ८

## स्थळ

## कौंडिण्यपुरांतीलयुद्धभूमि.

## पात्रें.

| | |
|---|---|
| रुक्मिया | भीमकराजाचा पुत्र. |
| सारथी | त्याचा गाडीवान. |
| श्रीकृष्ण | परमेश्वर. |
| बलराम | त्याचाज्येष्ठभ्राता. |
| वधूपक्षाचेवीर | जरासंध मगधादि. |
| वरपक्षाचेवीर | यादवांचें सैन्य. |
| सूत्रधार | नाटककर्ता. |
| विदूषक | त्याचा सोबती. |

**रुक्मिया**:— (गात गाऊन) अहो या रणभूमींत जमलेले सर्व वीर हो, ऐका ऐका. हो माझी रुक्मियाची प्रतिज्ञा ऐका.

**सूत्रधारः**— मित्रा, हा उभयपक्षींचा सैन्यसमुद्र पाहिलास काय?

**विदूषकः**— होय तर काय माझ्या डोळ्यानीं दिसत नाहीं.

**सूत्रधारः**— अरे डोळसा, तुला दिसत आहे. परंतु मी पाहिलेंस काय ह्मणून विचारिलें त्याचा अर्थ तूं समजला नाहींस.

**विदूष०**— कांहीं समजलों नाहीं आपणच कृपा करून सांगावा.

**सूत्रधा०**— अर्थ तो इतकाच कीं, सैन्याचें परिमाण महामुनि व्यास ऋषींनीं अक्षौहिणी ह्मणून सांगितलें आहे, त्या एक्या अक्षौहिणींत चतुरंग सैन्यापैकीं किती किती वीर असतात, हें तुला सांगण्यासाठीं विचारिलें.

**विदू०**— मला माहित नसलेली गोष्ट, तुह्मी मला विचारून माझा वेडेपणा सभामंडळीस दाखविणार होय?

**सूत्र०**— तसें नव्हे. अरे, तूं माझा सोबती ह्मणून हा विषय तुला सांगितला.

**विदू०**— अहीं तर तें काय असेल तें सांगा. नाहीं तर बोलणें थोडें आणि थुंकाच फार असें करूं नका.

**सूत्रधा०**— एक तर, दोन लक्ष आठ हजार सातशें वीर, एकवीस हजार आठशें सत्तर रथ, आणि तितकेच मदोन्मत्त हत्ती, एकलक्ष नऊहजार तीनशें पन्नास पायदळ, पांसष्ट हजार साहाशें दहा घोडे इतकें सैन्य एकत्र झालें ह्मणजे त्यास अक्षौहिणी ह्मणतात.

**विदू०**— हां समजलों. एकून चार लक्ष सत्तावीस हजार चारशें जीव एकत्र झाले ह्मणजे एक अक्षौहिणी होते काय?

**सूत्र०**— होय होते. (इतक्यांत वधूवर पक्षाचे वीर एकत्र होऊन मोठ्या मेहेनतीनें युद्ध करूं लागले अशा संधीस रुक्मियानें श्रीकृष्णास रुक्मिणीसहित एके रथीं पाहून त्यास क्रोधयुक्त बोलतो.)

**रुक्मियाः**— पद

चा० सरवकरा मुकुंदा.

ऐक नवनीतचोरा॥ नंदराघजिच्या पोरा॥ ध्रु०॥ गोपि

## ओंवी

### एकनाथाची.

तुह्मीसांडिलेंपुरुषार्थी॥मीलंवनेऊंनेदीराजदुहिता॥रणींजिंकोनिकृष्णनाथा॥भीमकीआतांआणीन ॥१॥

(तलवार हालवून आणि डोळे फिरवून) जर मी आज कृष्णाशीं भाडून रुक्मिणीला परत न आणीन तर सर्व ब्राह्मणाचें पातक मला लागेल. साधुनिंदा, गुरु निंदा, मातृपितृ निंदा इत्यादि सर्व पातकें, जर कृष्णास जिंकिल्या वांचून मी राहीन तर मला लागोत. आणि मी जर आज त्यास न जिंकीन तर पुनश्च या कौंडिण्य पुरांत पाय ठेवणार नाहीं.

**सर्वबधूवीर**— (आपणांत) हा वीर फारच कोपला आहे खरा. आतां याचें मार ब्यच फुटकें ह्मटलें पाहिजे, कां कीं, जवनागसहस्रबळी जे जरासंधादिक यांची जेथें दादही लागली नाहीं तेथें या पोराच्यानें काय होणार हें व्यर्थ तोंडघशीं पडेल आणि दांत पाडून घेईल. (इतक्यांत कवच घालून हत्यारांची तयारी करून रुक्मिया येतो आणि बोलतो.)

**रुक्मिया**— (रथांत बसून) तो कृष्ण फार वेडा आहे, त्याणें राक्षसविधीनें माझ्या बहिणीशीं लग्न लावण्याचा उद्योग चालविला आहे, परंतु मी जीवंत आहें तों पर्यंत ही गोष्ट होऊं देणार नाहीं. (सारथ्यास) सारथे, जेथें श्रीकृष्ण असेल तेथें माझा रथ फार वेगानें जाऊंदे आणि त्या काळ्याला रणमद किती आहे तो पाहूंदे. तो माझी बहीण चोरून नेतो आहे, परंतु रुक्मियाची गांठ पडली नाहीं तों पर्यंत (स्मरण केलेंसें करून) आतां पहा त्याला कसा बाणानीं खिळून टाकितों, मग तर तो माझी बहीण मला परत देऊन जीव घेऊन पळून जाईल.

**सारथी**— उत्तम आहे. (असें बोलून घोड्यास चाबूक मारून रथ जलदीनें चालवितो.)

डीभस्मासुरदेवमंत्रबळ ॥ काढीतेणेंपक्षगरुडास्त्र ॥ ४ ॥

श्लोक.

चाल गोपीगी०

रुक्मियादुजेंअस्त्रसोडण्या ॥ मननकरितसेधनुसतोडण्या ॥ बाणसोडिलाईश्वरेंयदा ॥ धनुष्यावलेंभंगतेंतदा ॥ १ ॥ घेउनीपुन्हापरियतोबळी ॥ धावलापहारुक्मियादळीं ॥ शरवरेंकरीपरियनाहिंसे ॥ अणिकपाहिं शांशूलहोतसे ॥ २ ॥

(इतक्यांत रुक्मिया शूल भंगलेंसें पाहून तोमर मारितो.)

श्लो०

छंद शार्दूलविक्रीडि०

पहातांतोमरभंगलेंमगक्रुधेंशक्तीसतोरुक्मिया ॥
प्रेषीतोंहरितोडितीसउडवीआकाशिंतोरुक्मिय ॥
शापीरेंममवेगसाहिह्मणुनीखड्गंह णीतीरते ॥ कृ-
ष्णोंतन्मु कुटाउठावदिधलापहातांतज्यावीरते ॥ १ ॥

सूत्र०.- (भ्यालेंसें करून) आतां कठीण प्रसंग आला, तो पहा रुक्मिया नग्नमस्तक असतां खड्ग घेऊन श्रीकृष्णावर तुटला आतां कसें होईल.

विदू०.- (त्याच्या पुढें हात हालवून) अहो, कसें होईल ह्मणून चिंता कां करितां? ते काहीं सूत्रधार नव्हेत, श्रीकृष्ण आहेत. (त्याचें तोंड फिरवून) नें नीट समोर पहा कसें श्रीकृष्णानें त्याचे खड्गाचे तिलप्राय तुकडे केले आणि सर्व सैन्यांत बाणांचा वर्षाव केला आहे कीं, जेणें करून सर्ववीर भयाभीत झाले आहेत. (तों इतक्यांत श्रीकृष्णानीं रुक्मियाचा पराजय करून त्याचे गळ्यांत धनुष्य घालून त्यास ओढिलें.)

यांच्याहस्तपोरी ॥ दारिवबजात्यांसथोरी ॥ नजिरेल माझीचोरी ॥ गरुडाचीतूजमोरा ॥ ऐकन० ॥ १ ॥ जन्मूनियांयदुवंशीं ॥ कुलगोत्रहेंनाशिसी ॥ नामरूप बुडविसी ॥ वाहुनकोव्यर्थघोरा ॥ ऐकनवनी० ॥ २ ॥ सांडिसांडीममभगिनी ॥ नानरींमीतिरवटबाणीं ॥ जीवघेइनयाक्षिणीं ॥ हरबूनिसर्वतोरा ॥ ऐक० ॥ ३ ॥

आर्या.

ऐसेंवदूनिभीमकिज्येष्ठभ्राताहरीसतीनशरें ॥ विंधी तोषड्बाणींतच्छरवारीधनुष्यतोडिवरें ॥ १ ॥

सवाई.

आणिकअस्त्रशरें [illegible]
चा ॥ तोइतुक्यांतनिबाणशेंरिपुनाशाकरीलघुश्री पतियाचा ॥ कोपवशेंयदुनायकतोडीचौदानिजशा लाचे ॥ भीमकसुतनवसोडितअस्त्रहिवह्निचतेज विशालाचें ॥ १ ॥

[illegible]

पर्जन्यअस्त्रसोडीईश्वरतेंअग्नितेजबुझवाया ॥ वातास्त्ररुक्मियामगभोषीकरण्यासशत्रुबुझवाया ॥ १ ॥

अभंग.

देवकृष्णानाथथोरकरीमात ॥ उडवीअस्त्रवातप र्वतास्त्रें ॥ १ ॥ रुक्मियानेंवज्रअस्त्रसोडूनीयां ॥ पर्वततोडूनियांचूर्णकेले ॥ २ ॥ रुक्मियाकोपलाग रुडग्रेषीला ॥ अस्त्रयोगेंझालाप्रकटतो ॥ ३ ॥ सो

नांदवावेंसावकाश ॥ येथेंतेथेंसमलें ॥ १ ॥ अधरींचा
ललेंस्फुंदन ॥ नेत्रींलोटलेंजीवन ॥ जाहलेंचरणक्षा
लन ॥ जगजीवनह्मामिन्नला ॥ २ ॥

**श्रीकृष्णः**— ओंवी.

एकनाथाची.

ऐकूनिबोलाचीचातुरी ॥ कृष्णेंउचलिलीदोहींकरीं ॥
आलिंगिलीप्रीतींथोरीं ॥ बंधनसारींसर्वथा ॥ १ ॥

परंतु रुक्मिणी, ऐकलेंस काय? यानें माझी फार निंदा केली त्यापासून झालेल्या पातकाचा क्षय व्हावा ह्मणून यास वपनपूर्वक प्रायश्चित्त दिलें पाहिजे.

**विदू०**:— आर्या, एथें तर वपनपूर्वक प्रायश्चित्तास आरंभ झाला आहे तर संकल्प वगैरे सांगण्यास मी जाऊं काय?

**सूत्र०**:— छेः नको जाऊं हो कां ह्मणसील तर तो परमात्मा सकल कर्मसाक्षी आहे आणि वेद हे त्याचे श्वास होत तेव्हां त्याच्या घरचे प्रत्यक्ष मेहुण्याचे कामांत तो श्रीकृष्ण तुझी भिक्षुकी चालूं देईल !! हेः मनांत देखील आणूं नकोहो. ( इतक्यांत रुक्मि याचे पांच पाट काढुन, एक मिशी आणि एक भुवई ओढून त्याचा गधा श्रीकृष्णाचे रथास बांधिला.

**श्रीकृष्णः**— प्राणप्रिये, आतां एकवेळ आपल्या भावाचें तोंड पहा आणि लिंबलोण करून दृष्टि काढ. ( असें ऐकतांच रुक्मिणी परम लज्जायुक्त होऊन खालीं ... लागतो. )

प्रवेश ८ वा समाप्त.

## ओंवी.

### एकनाथाची.

धनुष्य घालोनियां गळां ॥ ओढोनि आणिला पायात
ळा ॥ कांपिन्नली भीमकबाळा ॥ घनसांवळा देखत
से ॥ १ ॥

श्रीकृष्णाः- (रुक्मियाची शेंडी धरून गदा हालवून) या गदेनें याच्या मस्तकाचें चू
र्ण करितों. (असें ऐकतांच रुक्मिणी भयानें श्रीकृष्णाचरणीं मस्तक ठेवून ह्मणते.)

## श्लोक.

गा हिं वरुनि ह्मणेनी रुक्मिणी देवदेवा ॥ जरि रुचि दतु
ह्मा हीं सर्व माझीच सेवा ॥ करुनि बहु कृपा या बंधुला
जीवदान ॥ करुनि बहुत राखी यांत माझा चिमान ॥ १ ॥

## पद.

### चा० धांव माये०

लाज राखी कृष्णनाथा ॥ करुणेच्या पयः पाथा ॥ ध्रु०
स्मर आसुरा दुर्धर ॥ योगियाशि योगेश्वर ॥ विश्वनि
र्मिनसे ईश्वर ॥ वेदा अंत न कळे पाहतां ॥ लाज० ॥ १ ॥
गेशियासी नू जय युद्धीं ॥ अ कळूं पाहे अहंबुद्धी ॥ बाव
अवगणीनू जनिंदी ॥ होय अपराधी सर्वथा ॥ ला० ॥
२ ॥ जरी मारिशी लयासी ॥ मायसी डिल तरि प्राणा-
शी ॥ पात्र होइन मी निंदेसी ॥ तुटलें माहेर अनंता ॥
लाज राखी० ॥ ३ ॥

## ओंव्या.

### एकनाथाच्या.

[illegible] कृष्णाकास ॥ द्यावा दोहीं पक्षीं उल्हास ॥

# रुक्मिणीहरणनाटक.

## अंक२.

## प्रवेश१.

### स्थळ

### कौंडिण्यपुर.

### पात्रें.

| | |
|---|---|
| श्रीकृष्ण | परमेश्वर. |
| रुक्मिणी | आदिशक्ति. |
| बळराम | परमेश्वराचाभाऊ. |
| यादववीर | वरपक्षाचेवीर |
| वधूपक्षाचेवीर | वधूपक्षाचेवीर |

**वधूपक्षाचेवीरः**— (आपणांत) अरे पळा अरे पळा, आपल्या रुक्मियास त्या कृष्णानें रथाशीं बांधिलें आणि त्याचे पांच पाट काढिले, आतां तो जय पावला. अरे तो पहा बलराम आला तो आतां आपणास सहज यमसदनास पाठवील. तर आतां कसर करूं नका जितकें लवकर पळवेल तितकें लवकर पळा. (असें बोलत सर्व वधूपक्षाचे वीर पळताहेत आणि त्यांचा पाठिलाग यादववीर करिताहेत तों)

**बळरामः**— आतां ते वीर पळाले काय? बरें काय चिंता आहे अग्निण त्यांस गाठूं. (असें बोलून त्वरेनें रथ नेत असतां वाटेस श्रीकृष्णाची गांठ पडली तों रुक्मियास पाहून)

### ओंवी.

### एकनाथाची.

सोडोनियांगळाबंधन॥ कृष्णासीह्मणेबुद्धीकोण॥
सोयरियासीविरूपकरण॥ नियुजाणआह्मांसी॥१॥

कृष्णा, हें त्वां ठिक केलें नाहींस अपल्या संबंध्यांचा अपमान करण्यापेक्षां वध केला असता तर क्षात्रधर्मास तरी उचितहोतें छेः फार वाईट काम केलेस बरें असो (असें बोलून रुक्मिणीकडे वळून) मुली, यांत तुला कांहीं वाईट वाटूंनये कारण

ज्याणें असें करावें तसें भरावें या न्याया प्रमाणें हा आपल्या कृतकर्माचें फळ भोगतो आहे आणि आह्मा क्षत्रियांचा धर्म फार कठीण आहे. तो असा की, युद्धामध्यें मामा काका ओळखूंनये. समरावर बाप आला तरीं त्यास मारिलें असतां क्षत्रियास दोष नाहीं तर तूं याविषयीं तिळमात्रही दुःख मनांत आणू नको.

**श्रीकृष्णः—** आज्ञा चांगली झाली परंतु ज्याणें जसें कर्म करावें तसें फल भोगावें या न्यायास अनुकूलाचरण असतां असी आज्ञा कां होते.

**बलरामः—** कृष्णा, हें कर्म अनुकूल नव्हे प्रतिकूल आहे. जर तूं त्यास जिवें मारितास तर अनुकूल होतें परंतु केलेंस हें मात्र प्रतिकूल आहे आणि यापुढें धर्माची उलटापालट होईल लोभानें ब्राह्मण वेद विकितील आणि वेदपठण, पुराणपठण, व्याकरणपठण, शास्त्र, वेदांतश्रवण, दान, ज्ञान, नीचसेवा, देहविक्रय इत्यादिसर्व द्रव्यार्थ होतील. स्त्रिया कारितां मरतील. स्वार्थास विरोध झाला असतां सर्वांस क्रोध येईल आणि त्यापासून द्वेष, विरोध हे होतील. परंतु तूं केवळ सच्चिदानंदघन परमात्मा आत्माराम आणि तुझे हातून हें असलें लाजिरवाणें काम व्हावें १ ( असें बोलून रुक्मिणीस ) मुली आतांतूं श्रीकृष्णाचरणास पावलीस तर तुझ्या मनांत आपपर भाव राहूंनये. आपल्या मातेस दुःख होईल ह्मणून रुक्मिया मरूनये, आणि शिशुपाल मरावा असी इच्छा त्वां कधींधरूनये. आतां तुझ्या भावाची अप्रतिष्ठा केली याबद्दल वाईट वाटेल तर मैं वाटूनये. कारण त्याच्या पातकाबद्दल त्याला होणारा यमदंड इतक्यावर त्यास होणार नाहीं, तोच हा दंड असें समज ह्मणजे झालें.

### ओंवी.

### एकनाथाची.

अनेकांघटींजेवीअनेक॥ प्रतिबिंबींभासतीअर्क॥<br>
तैसाविश्वात्माव्यापक॥ दिसेअनेकदेहयोगें॥ १॥

तर जसें आकाश कोनांत पाहिलें असतां चतुष्कोण दिसतें आणि घरांत

### ओंवी.

### एकनाथाची.

वाचाझालीजीसद्गद॥निःशेषखुंटलाअनुवाद॥-
मरवेंकोंदलापरमानंद॥पूर्णबोधभीमकीसी॥ १॥

जिची चित्तवृत्ती सर्वांस सोडून श्रीकृष्णाचे पायीं लीन झाली आहे आणि जिचा आनंद जगांत मावत नाहीं अशा त्या रुक्मिणीस घेऊन श्रीकृष्णाराम एके रथांत बसून परमानंदानें रणभूमींत फिरतात. ( इतक्यांत दुःख आणि लज्जा सागरांत निमग्न होऊन गचकळ्या खाणारा असा तो रुक्मिया अत्यंत दुःखित होऊन विचार करितो कीं, ज्या तोंडानें अघोर प्रतिज्ञा केल्या होत्या तें तोंड-आज श्रीकृष्णानें आपल्या प्रतापाग्नींत भाजून कोळशा सारिखें केलें, तर आतां हें असलें काळें तोंड पुनश्च त्या कौंडिण्यपुरांत माता पितरांस दाखविण्यास नेऊनये. एकीकडून न नेऊनही परिणाम नाहीं. तर आतां कसें करावें असें बोलून खिन्न होतो आणि पुनः विचार करून तो भोजकट याचें एक नवीन नगर वसवून तेथें राहतो. ) ( इतकें झाल्यावर सर्व जातात. )

इतिश्रीरुक्मिणीहरणनाटकेद्वितीयोंऽकः संपूर्णः मूल २

बहुल भासतें तसा जगदीश्वर अनेक देहांत एकरूपानें आहे त्यास ओळखून जन्म आणि मरण हीं मिथ्या आहेत. जीव अविनाशी. जसें घटाबरोबर घटाकाश गेलें असें भासतें मात्र, परंतु आकाश कोठें जात नाहीं आणि येत नाहीं त्या प्रमाणें आत्मा जन्ममरणातीत आहे. जन्ममरणास कारणें पंचमहाभूतें आहेत, त्याणीं त्या देहास खरेपणा आणून अभिमानाच्या दोऱ्यानीं देहबुद्धीस बांधून प्रेमाची गांठ दिल्ही आहे तर देहाभिमान सोडून बाइगे, आत्मा सर्वांत असून त्यांपासून अलिप्तआहे ह्मणून संयोगवियोग संबंधी दुःख करूं नको, जसा रवि आकाशांत असून सर्वांचे दृष्टीस समप्रकाश करितो तसा किंवा काष्ठपांचालिकांचा खेळ करणारा प्रत्येक खेळ्यास पुतळ्याचें जन्म नघेतां हजारो तऱ्हांचे खेळ करितो अथवा खेळ बंद झाला तरीं तो मरत नाहीं त्या प्रमाणें ईश्वर सर्वांत असून अलिप्त आहे. तर तुझ्या भावाचें मुंडन खंडण केलें याबद्दल आमच्या कृष्णास दोष देऊं नको कां कीं जसें आकाश शीतोष्णादिकें करून निर्विकार असतें तसा श्रीकृष्ण आहे.

पद.

चाल कलिमल.

सुविचारेंसुखभोगी ॥ शोक किं आणि आंगीं ॥ ध्रुव. ॥
स्वप्नींजाहलेंजैसेंदुःख ॥ सत्यमानितीजनतेमूर्ख ॥
बांधवदुःखहितैसेंदेख ॥ आतां अजित्यागी ॥ सुविचारें० ॥ १ ॥ आत्मदृष्टीचेंएकलक्षण ॥ दृश्यदृष्टा आणिदर्शन ॥ असेंतीहीसहिजोअकारण ॥ नाहीं सत्याजोगी ॥ सुविचारें० ॥ २ ॥ ऐकुनिझालेंभाव चित्ता ॥ गेलीतदुचीबुद्धिसर्वथा ॥ ह्मणवुनि चरणींठेवुनिमाथा ॥ इच्छाजिसढोंगी ॥ सुविचारें० ॥ ३ ॥

# अंक ३.

## प्रवेश १.

### स्थळ.


### कौंडिण्यपुरांतील-
### राजमंदिर.



## पात्रें.

| | |
|---|---|
| भीमकराजा | रुक्मिणीचापिता. |
| क्रुद्ध | हालकारा. |
| भयंकर | त्याचा सोबती. |
| कंचुकी | चोपदार. |
| शद्धुमती | रुक्मिणीचीमाता. |
| इतरसभासद | नगरवासीसरदार वगैरे. |

भीमकराजा :- (सभेंत बसला असतां चोपदार येतो आणि हात जोडून विनंति करितो.)



**चोप०**,— सरकार, युद्धभूमींतून दोन चार आले आहेत.

(तों इतक्यांत पडद्यापलीकडे मोठ्यानें शब्द होतो.)

## ओंवी एकनाथाची.

(एक चरण फिरविलेली.)

जिंकोनि सकळिक रायासी ॥ विरूप करूनि रु-
क्मियासीं ॥ कृष्णेंनेली भीमकीसी ॥ युद्धवा
र्ता अशी असे ॥ १ ॥

(ऐकतांच राजास आनंद होऊन चोपदारास बोलतो.)

## आर्या.

कर्तव्यकर्म झालें जरि थ्यालें वायुपुत्र मनयांत
तरितुच्छ ही अलभ्यचि भागवतासी अशा हि अ
नयांत ॥ १ ॥

विनयपालका, आधीं दिवाणजींस बलावून आण बरें.

(इतक्यांत ते युद्धांतील बातमीदार क्रुद्ध आणि भयंकर येऊन वंदन क रितात.)

**कंचुकी**:— बातमीदार मुजरा करितात, निगा रखे महाराज!

**भीमक**:— कायरे क्रुद्धा, रुक्मिया कोठें आहे, श्रीकृष्णा बरोबर रुक्मि णी ज्या रथांत बसली होती तो रथ कोठें आहे?

**क्रुद्ध**:— (हात जोडून) सरकार, तें दुःख सांगतां पुरवत नाहीं; प- रंतु आपल्या युवराजाची अत्यंत अप्रतिष्ठा झाली! (असें बोलून रडूं ला- गतो.)

**रुक्मिया**:— अरे रडूं नको. काय असेल तें नीटपणीं सांग.

**भयंकर**:— (पुढें होऊन हात जोडून) महाराज, त्याच्यानें तें कठो- र कर्म सांगवणार नाहीं. तो अमळसा कोंवळ्या मनाचा आहे. मीच

विनंति करितों.

**भीमक:**— अरे बोल तर.

**भयंकर:**— सरकार. युवराजानें त्या श्रीकृष्णानें एक मिशी, एक भुवई पांच पाट काढिले त्याच्या गळ्यांत रथाच्या घोड्याचें हर्णीस घालून त्यास रथास जुंपून चालविला होता; परंतु त्या बलरामानें पूर्ण कृपा केली. आणि सोडवून श्री कृष्णास असें करण्या बद्दल रागें भरला. श्रीरुक्मिणीचे त्या विडंबना साठीं अनेक वेदांत विषय सांगून सांतवन केलें. नंतर श्रीकृष्ण, रुक्मिणी, हलधर असे एक्या रथांत बसून युद्ध रण भूमींत फिरत होते. युवराज, त्या संकटांतून सुटून, एकीकडे जाऊन, कांहीं विचार करून, कोणीकडेसे गेले.

**भीमक:**— गेले तर बरें झालें. ज्याचें कर्म त्यास भोगावें लागलें. यांत मी काय करावें? मी कांहीं त्यास जा ह्मणून सांगितलें नाहीं, आणि अशी अप्रतिष्ठा करून घे असेंही सांगितलें नाहीं. (ओस्याने-श्वास टाकून) कांहीं का होईना. (इतक्यांत दिवाणजी आणि कंचुकी येतात. आणि दिवाणजी आपल्या जागीं बसतो.)

**क्रुद्ध:**—(डोळे वगैरे पुसून, स्मृतीवर येऊन) महाराज युवराजाचें असें झालें तरी तुह्मास सोडून कोठें जाणार नाहींत; परंतु श्रीराम कृष्ण आणि रुक्मिणी देवी हीं मात्र प्रभास क्षेत्रास गेलीं, असे त्यांचे सैनिक यादव बोलत होते. त्यावरून समजलें.

**भीमक:**— ऐकून श्रीकृष्णांनीं असें केलें काय? असो विचार करितां येईल. (असें बोलून दिवाणजीस) कां दिवाणजी कसें करावें! या क्रुद्धाचें भाषण ऐकिलेंत काय?

**दिवाणजी:**— (हात जोडून.) होय सरकार ऐकिलें; परंतु त्या यांत कांहीं वांकडें ऐकूं आलें नाहीं. जीं चिन्हें पूर्वीं दिसत होतीं

तदनुसार अनुभव आला तर, आतां हा विवाहोत्सव आरंभा पासून श
वट पर्यंत गोड असावा तो शेवटीं तरी अत्यंत गोड करा.

**भीमक.—** तो कसा ?

**दिवाणजी.—** मला वाटतें, आतां प्रभास क्षेत्राहून श्री कृष्णास ज्येष्ठबं-
धूच्या बरोबर रुक्मिणीसहीत वाजत गाजत आनंदानें बलावून आण
वून यथोक्त कन्यादान परमानंदानें करावें.

**भीमक.—** हें कृत्य फार उत्तम आहे, परंतु आपणाच आमच्या शद्रुम
ती वांचून तेथें जावें किंवा त्यास येथें आणवावें हें नीटपणें ठरणार
नाहीं. एवढ्या करितां मीच तिजकडे जा तों ह्मणजे झालें.

**सर्वसभासद.—** फार उत्कृष्ट आहे. असें बोलून सर्व उठतात. (भी
मक राजा दिवाणजींचा हात धरून शुद्रमतीचे महालांत येतो.

रुक्मिणीहरणनाटक.

अंक ३.

प्रवेश २.

स्थळ.

शद्रुमतीचामहाल.



# अंक ३.

## पात्रें.

शुद्धमती ........................ रुक्मिणीचीमाता.
भीमकराजा ........................ रुक्मिणीचापिता.
दिवाणजी ........................ त्याचा कारभारी.
कंचुकी ........................ चोपदार.
हजारी ........................ दासी.
लवंगी ........................ दुसरी दासी.
श्रीकृष्ण ........................ परमेश्वर.
रुक्मिणी ........................ आदिशक्ति.
बलराम ........................ श्रीकृष्णाचावडीलबंधु.

भीमक :– कायगे हजारे, राणी साहेब कोठें आहेत ?

हजारी :– ( हातजोडून ) सरकार आंत आहेत.

दिवाण :– महाराज आंतच चलावें तर.

( असें बोलून आंत येतात तों शुद्धमतीउठून उभी राहून. )

शुद्धम० :– आज स्वाऱ्यांचें अकालींच येणें झालें.

भीमक :– होय, तसेंच कारण होतें म्हणून आलों.

शुद्धमती :– अग बाई ! कारण आहे म्हणून आज्ञा होते, तेव्हां कां ही तरी आनंदाचीच बातमी असेल!

भीमक :– दोन्हीही आहेत.

दिवाण :– जरी दोन्ही असली तरी आनंदा पेक्षां दुःख थोडें आहे.

शुद्धमती :– तरमग एकलीच पाहिजे.

भीमक :– ऐक तर. आनंदाची बातमी एवढीच कीं, श्रीकृष्णानें आणि त्यांच्या बंधूनें रुक्मिणीच्या हेतु प्रमाणें येऊन मोठ्या पराक्रमानें युद्ध करून. सर्वांस जिंकून. रुक्मिणीचें हरण केलें; नतर रुक्मियाची ए·

भीमक :— दिवाणजी, चलातर आतां तुम्ही त्वरा करा.

दिवाण :— होय, (असें बोलून राजाबरोबर उठतो.)

पद. चाल. फिरगई रामदुहाई.

भीमकराजा घेउनि फौजा ईश्वरकाजासि निघाला
रे ॥ प्रभासक्षेत्रा परमपवित्रा पत्रारूढ निघे भाला
॥ धृ. ॥ येउनि तैसा श्रीरंगे भणती करि सांगे निज ह्नना
ला ॥ अश्रु गळती प्रेमें पाहुनि आलिंदयाप्रभ कांचि
त्ताला ॥ १ ॥ भी० उचलुनि भेटे नेटें देव हि प्रेमानें
त्यामा माला ॥ भीमक बोले विधिपूर्वक घ्या कन्या
हरलभोमाला ॥ भी० ॥ २ ॥ प्रेमभरें त्या रमावरें मग
देखियलें कीं समतेनें ॥ कृतार्थ मानुनी आपणा भी
मक कृष्णास्तवना नेंतेनें ॥ भीमकराजा घेऊ० ॥ ३ ॥

ओंव्या एकनाथाच्या.

भी० :— मग ह्मणे जय जय चक्रपाणी ॥ माझें भाग्य तें रुक्
मिणी ॥ विनटली कृष्णचरणीं ॥ कुलतारिणी चि
द्गंगा ॥ १ ॥ शुद्ध करीत दोहीं कुळां ॥ जे विप्रवाह गं
गाजळा ॥ ते वीज जन्मली हे बाळा ॥ सकळ कुळां उद्धा
रूं ॥ २ ॥ श्रद्धा शांति निवृत्ति भक्ति ॥ हीही भीमकी
निजमूर्ति ॥ तुज वोपिली श्रीपती ॥ परी एक विन-
ति परिसावी ॥ ३ ॥ वीर्यशौर्य भीमकीहरण ॥ क
रितां न लगे अर्धक्षण ॥ आतां विधियुक्त कन्यादान
पाणिग्रहण करावें ॥ ४ ॥ हांत्र विनंति गरुडध्व-
जा ॥ चार दिवस माझी पूजा ॥ अंगिकारावी अधो
क्षजा ॥ मी दास तुझा निज भावें ॥ ५ ॥

क भुंवई पांच पाट काढून, रथास घोड्याप्रमाणें जुंपून नेत होते तों बलरामानें सोडविला.

शुद्धमती:— पाहिलें असतां आज आपणास साक्षात् विश्वंभर जांवई मिळाला, या नफ्या पेक्षां उन्मत्त, नास्तिक, खल, अशा पुत्राची अप्रतिष्ठा झाली ही हानी फारच थोडीच आहे.

दिवाण:— सरकार, राणी साहेब महाराजांचें नांव ईश्वर भक्ति विषयीं अन्वर्थ आहे, यांत संशय नाहीं; असें त्यांच्या प्रस्तुतच्या भाषणाच्या कटाक्षा वरून स्पष्ट दिसतें.

भीमक:— तसेंच आहे, ह्मणून मी येथें आलों.

दिवाण:— तर आतां त्यांस विचारावें.

भीमक:— (कायबरें.) असें बोलून विचार केलासा करून शुद्धमतीस (हां स्मरलें) कसें गे प्रिये, तुझ्या विचारास कसें येतें, कीं कन्यादान करण्या साठीं रुक्मिणीसहित श्रीकृष्णास येथें बोलवावें, किंवा आपण तेथें जावें,

शुद्धमति:— माझ्या मतें आपणच तेथें जावें.

दिवाण:— फार चांगलें आहे. ही आज्ञा मन्मतास अनुकूल झाली.

भीमक:— आतां ठीक झालें कीं नाहीं, दिवाणजी कसें?

दिवाण:— काय विचारावें सरकार! फारच चांगलें झालें!! बरें तर प्रभास क्षेत्रीं जाण्याची तयारी करूं काय?

भीमक:— हो हो, करवा.

शुद्धमति:— प्राणनाथा, या कन्यादान्याच्या मिषानें तरि त्या आदिदेव पुराण पुरुषाचें पूजन होईल, आणि सर्वांचा अक्षरविधीचा संशय जाईल, आणि त्या यज्ञपुरुषासधनानें आपल्या चित्तवृत्ति अत्यंत शांत होतील; तर लौकर तयारी करवा.

करीतच.

दिवाण:— (कानाशीं हळूच) सरकार तर आतां तयारी करून श्री राम कृष्णा सह कौंडिण्यपुरास चलावें.

भीमक:— उत्तम आहे (असें बोलून श्री कृष्णास) कमलानाथा, द्वारकेस मूळ पाठवून देवकी आणि वसुदेव यांस सोहळा पाहण्या करितां आणावें.

श्रीकृष्ण:— ठीक आहे. (असें बोलून अक्रूराची तयारी करवून त्यास पाठवितात.

बलराम:— कृष्णा, तर आतां यादवांस तयारीचा हुकूम करवून एथून लवकर निघावें नाहीं बरे?

भीमक:— फार चांगलें आहे. (असें बोलून) (दिवाणजीस) दिवाणजी आपला रथ तयार करवा.

दिवाण:— आज्ञा. (असें बोलून रथ तयार करवितो.)

बलराम:— कृष्णा, आपली तयारी आहे. सर्व सैन्य निघालें.

श्रीकृष्ण:— (दिवाणजीस) चलाहो. (ऐकतांच सर्व उठतात, आणि मोठ्या समारंभानें आणि आनंदानें कौंडिण्यपुरांत येतात.

---

रुक्मिणीहरणनाटक.

अंक ३.

प्रवेश ३.

स्थळ.

कौंडिण्यपूर.

श्रीकृष्ण:- आपण ह्मणतां ही गोष्ट आपल्या मता प्रमाणें समारंभानें करावी, असें माझे मनांत आहे; पण आमचे दादांस विचारा.

(ऐकतांच भीमक बलरामाचे पाय धरून)

भीमक:- प्रलंबारे, कृपाकरून माझा मनोरथ पूर्ण केला पाहिजे.

(ऐकतांच बलराम श्रीकृष्णास बोलतात.)

बलराम:- श्रीकृष्णा, तूं मोठा कार्यार्थी आणि चतुर असा आहेस. अरे मनांत आहे तें जनांत दाखवितोस काय? (भीमकास) राजा, हें काय? तुमचे जांवई तुम्हास अनुकूलच आहेत, मजवर एवढें ओझें कां ठेवता?

भीमक:- जांवई अनुकूल आहेत, तथापि आपण माझा आश्रम पवित्र करून, या दासाचा उद्धार करण्या करितां आपण कौंडिण्यपुरास चललेंच पाहिजे.

रुक्मिणी:- पित्या, आतां महाभाग्याचे योगानें तुमचा श्रीकृष्णासीसंबंध झाला आहे, तर आतां सर्व संसाराची आणि घराची ममता टाकून आपल्या भावने प्रमाणें विवाहाची सर्व सामुग्री आणून श्री कृष्णाची पूजा केली असतां आपल्या संपूर्ण कुळाचा उद्धार होईल.

बलराम:- (मान हालवून.) रुक्मिणी फार चतुर आहे.

श्रीकृष्ण:- (हंसून) ह्मणूनच आपली गांठ पडली.

भीमक:- (फार आनंदानें बलरामास) अहो व्याही, ऐकिलेंतनां कन्येचें भाषण! ही मर्यादेस्तव आपणा पाशीं काय असेल तें संसाराची आशा सोडून देवाधिदेवाची पूजा करा, ह्मणजे कुलोद्धार होईल ह्मणून. या बोलण्यांत तिणें माझा श्रीकृष्णाशीं विवाह करा असें नह्मतां मनांगत सुचविलेंना! (रुक्मिणीस) शाबास, शाबास! सर्व वंशांत तुजसारिखें रत्न एकही उत्पन्न झालें तरी तें कुळाचा उद्धारच



## पात्रें.

| | |
|---|---|
| श्रीकृष्ण. | भगवान. |
| रुक्मिणी. | आदिशक्ति. |
| भीमक. | रुक्मिणीचापिता |
| शुद्धमति. | रुक्मिणीचीमाता |
| बलराम. | श्रीकृष्णाचा वडील बंधु. |
| दिवाणजी. | कारभारी. |
| विश्वकर्मा. | प्रतिसृष्टि निर्माण कर्ता. |
| नगरनिवासी. | नगरांत राहणारे लोक. |
| सेवक. | चाकर. |
| कंचुकी. | चोपदार. |
| रामाजीपंत इमारने. | कारकून. |

भीमक.— दिवाणजी, तुह्मी घरीं आलां म्हणून सर्वच विसरलां काय!

दिवाण.— नाहीं सरकार, चुकी असल्यास कायती आज्ञा व्हावी, ह्म णजे त्या प्रमाणें करीन.

भीमक.— अहो तर विवाह जवळ आला, अणि अद्याप मंडप नाहीं.

तर असें करूं नका अगोदर त्या विश्वकर्म्यास बोलावून आणून मंडपाचें काम त्याच्याच गळ्यांत घाला.

दिवाण:— तें काम तसें करितों; परंतु आणीक कांहीं कामें असतील तर तीं सांगावीं.

श्रीकृष्ण:— होय, आहेत. तुह्मी ज्यावेळेस सर्वांस लग्नचिठ्या त्याहाल त्यावेळेस आह्माकडून कुरु, संजय, केकय यांस लग्नचिठ्या त्याहा. देव, शिवशांभव, यक्ष, किन्नर, नारदादि महावैष्णव इत्यादि सर्वांस लग्नचिठ्या त्याहा.

भीमक:— दिवाणजी, विश्वकर्म्यानें अद्याप मंडप तयार केला किंवा नाहीं.

दिवाण:— सरकार, तें काम रामाजीपंत इमारते यांस मयासुराचे ताब्यांत सोंपविलें आहे. तर ते त्याची तजवीज ठेऊन सत्वर मंडप करतील.

भीमक:— उठातर तुह्मी अगोदर, आणि त्यास मंडपाचें काम कोठवर आलें. हें विचारून या.

दिवाण:— जांवयांनीं हुकूम केल्या प्रमाणें, अगोदर लग्नचिठ्या लिहितों, आणि नंतर तो शोध करितों.

बलराम:— अहो दिवाणजी, जांवयाचा जरी हुकूम झाला, तरी अगोदर चिठ्या लिहिल्या असतां आणि त्या प्रमाणें ते लोक सत्वर आले तर कोठें राहतील बरें?

श्रीकृष्ण:— पहातां, आधीं मंडपाचा शोध करावा. आणि नंतर चिठ्या त्याहाव्या; हें बरें असें वाटतें. (ऐकतांच दिवाणजी उठतो.)

बलराम:— (नगरवासी लोकांतील एका कारकुनास) अहो पंत पुढें या. (तो येतांच) तुमचें नांव काय? बस, तेथें. आणि आमचे श्रीकृष्ण सांगतात त्या प्रमाणें लग्नचिठ्या लिहा.

नागरिक:— (हात जोडून) महाराज, या देहास गोविंदपंत ह्मणतात.

( लेखणी कागद पुष्पपत्र घेऊन दौत जवळ ठेवितो. ) आणि काय आज्ञा आहे. कोणा कोणास कसकशा मान्यानें लिहूं. या विषयीं हुकूम झाला ह्मणजे लिहितों.

श्रीकृष्ण.– आतांच दिवाणजींनीं याद करून घेतली आहे त्या प्रमाणें सर्वांस बरोबरीच्या नात्यानें वसुदेवाचे नांवें किंवा आमच्या दादांच्या नांवें लिहा ह्मणजे झालें.

नागरिक.– ( हात जोडून ) होय लिहितों. ( असें बोलून सर्व चिठ्यात यार करून आणतो. ) महाराज, या चिठ्या तयार आहेत.

श्रीकृष्ण.– आणा पाहूं. ( असें बोलून सर्व वाचून पाहून ) ठीक आहेत. आतां त्या दादांकडून पुर्त्या करून घेऊन लखोटे करा, आणि जासूदा जवळ देऊन त्यांची रवानगी करा. ( इतक्यांत दिवाण येतो ) त्यास पाहून.–

भीमक.– कायहो कसें काय?

दिवाण.– ( हात जोडून ) सरकार, तयारी आहे. कोठें कोठें थोडेसें रंगाचें काम शिलक आहे, परंतु तेंही आज सायंकाळीं शेवटास जाईल असें वाटतें.

भीमक.– आतां ठीक मी निःकाळजी झालों.

दिवाण.– आजून पुष्कळ व्हावयाचें आहे. आपण केवळ इतक्यानेंच निष्काळजी होत नाहीं.

भीमक.– अहो खरें परंतु एकीनून तर झालों.

दिवाण.– होय. ( श्रीकृष्णाकडे पाहून ) त्या चिठ्या लिहिल्या काय?

श्रीकृष्ण.– होय. त्या पहा. ( असें बोलून चिठ्या हातांत देतो.

दिवाण.– बऱ्या आहेत, परंतु पुर्त्या व्हावयाच्या आहेत.

**बलराम:**— आणा इकडे. (असें बोलून पूर्ण करितो.) घ्या घ्या, आणि लवकर रवाना करा.

**दिवाण:**— होय, करतों. (असें बोलून जातो.)

---

## रुक्मिणीहरणनाटक

## अंक ३.

## प्रवेश ४.

## स्थळ.

## श्रीद्वारका नगरि.



### पात्रें.

वसुदेव ........................ श्रीकृष्णाचा बाप.

देवकी ........................ श्रीकृष्णाची आई.

द्वारपाळ ........................ सेवक.

जासूद ........................ श्रीकृष्णाचा नरोटा नेणारा.

**जासूद:**— (राजमंदिरांत जाऊन) पहाऱ्यावर कोण आहे?

**द्वारपाल:**— कोण आहे?

जासूद:— कौंडिण्यपुराहून भीमराजांनी, महाराज वसुदेवजींस लग्न चिठी दिली आहे, ती घेऊन आलों आहें.

द्वारपाल:— (आनंदानें) कोठें आहे, आणा.

जासूद:— ही घ्या. (असें बोलून लखोटा त्याजवळ देतो.)

द्वारपाल:— (पाहून) बसा आतां तुह्मी येथें, मी आंत महाराजांस वर्दी कळवितों.

जासूद:— बरें आहे. (असें बोलून रुजाम्यावर बसतो.)

द्वारपाल:— (वसुदेवाच्या हातांत तो लखोटा देऊन) कौंडिण्यपुराहून हा लखोटा घेऊन जासूद आला आहे.

वसुदेव:— (लखोटा फोडून लग्नचिठी वाचून) द्वारपाला, जा आणि आमच्या प्रियेस हांक मार.

द्वारपाल:— होय महाराज. (असें बोलून देवकीस घेऊन येतो.)

वसुदेव:— (तिला पाहून) प्रिये, हें पाहिलेंस काय? रुष्णानें काय कर्म केलें !!

देवकी:— (साशंक होऊन) काय केलें बरें?

वसुदेव:— भिऊं नको. कांहीं वाईट नाहीं; परंतु सुनमूख पहावयास गेलें पाहिजे !

देवकी:— (आनंद पावून) नित्यकाय थोडीं रूनसुखें दृष्टीस पडतात !!

वसुदेव:— अगे, हें सांनील नव्हे. या विवाहांत फार हत्या झाल्या, पुष्कळ सैन्य मेलें !!!

देवकी:— आपल्या सांगण्याचा अर्थ मी कांहींच समजल्यें नाहीं.

वसुदेव:— कशानें समजशील, परंतु हें पहा, (असें बोलून साकी म्हणतो.—

साकी.

विदर्भदेशीं भीमकराजा कुंडिनपुरिंचा स्वामी॥
त्याणें लिहिलें पत्र असें कीं तद्गृहिं जावें आह्मी १
कांकीं त्याच्या दुहितृइच्छया मत्पुत्रें बहु वीरा ॥
युद्धीं जिंकुनि मारुनि बहुतांगातितया रणधीरा २
यास्तव भीमक अत्युत्साहें कन्यापरिणयकाळीं॥
लग्नपत्रिका लिहित असे ज्या वर्षी झाला वनमाळी ॥३॥ सर्व वऱ्हाडासहित बिऱ्हाड कुंडिनपुरिंत करावें॥ देवकि झाली हर्षित ऐकुनि नसचे काय करावें॥४॥

देवकी:- प्राणनाथा, समजलें आपल्या बहुत तपस्येनें सुखोपभोगानुभवांत श्रीकृष्णानें पराक्रमानें वधुपरिणय केला. त्या योगानें तिच्या बापानें तें मान्य करून कन्यादानादि वैवाहिकोत्सवास आपणास निमंत्रण केलें आहे.

वसुदेव:- हां आतां समजलीस; तर इतउत्तर स्वस्थांतःकरण करून तेथें जावयाचे कामास त्वरेनें लागावें, कारण मुहूर्त फार जवळ आला.

देवकी:- माझें काय, ही मी तयार आहें.

वसुदेव:- तुझी तयारी ह्मणजे, तूं केवळ आपल्या देहाचीच समजूं नको. तुझा परिवार मोठा ह्मणून विशेष सांगितला.

देवकी:- ठीक आहे. (द्वारपालकास) जारे सुभद्रा काय करीत आहे पाहून ये बरें.

द्वारपाल:- आज्ञा सरकार. (असें बोलून जातो.)

वसुदेव- कंचुके, सर्व वीर वगैरे बलरामाच्या बरोबर गेलेच अ-

सतील; परंतु त्या शिवाय कोणी म्हातारा अशक्त असे लोक घरांतून राहिले असतील त्यांस सस्त्रीक कौंडिण्यपुरीस विवाहास घेऊन जाण्या करितां दिवाणजीस तयारी ठेवण्या विषयीं माझी आज्ञा सांग जा.

**कंचुकी.—** होय महाराज, (असें बोलून जाऊं लागतो, आणि आपणाशीं) आतां काय मोठीच मजा आहे. श्री कृष्णाचा विवाह होणार, आणि त्यांतील सोंहाळे व मिरवणुकींचीं वगैरे सरवें आम्ही अनुभविणार; तर आतां कमी करूं नये. होईल निकडून साधावेंच. (असें बोलून स्मृतीवर येऊन) अहोपण अगोदर आपणास महाराज, वसुदेवांचा दिवाणजीस निरोप सांगावयाचा आहे. (असें बोलून त्वरेनें जातो.) (इतक्यांत श्री कृष्ण आदिदेव त्यांच्या परिवार देवता आणि सर्वारंभ श्रीगजानन चंडी इत्यादि देव तयार होतात.

कटाव.


ऐसेश्रीकृष्णवऱ्हाडी, निघालेभीमकनगरबिऱ्हाडी॥
गणेशबसलाउंदिरपाठीं, विघ्नजयाचेत्याचीकाठी॥
गाजेत्रिजगींफारचमोठी, दुर्गादेवीसिंहयापाठी॥ मुक्तकेशआणिखड्गशोभले, असेमातृकासहितचालले॥ वऱ्हाडरूसेंतोंडवांसले, वृश्चिकावरीचंडिबैसली, पाहुनिम्हणतीवऱ्हाडीअसली, बलाविल्याविणकांहोआली, पाहुनिपोरेंसर्वहिभ्यालीं, निंदुलागलींपरोपरीनें, कोपलिचरलाश्रीगणपतिनें, नवलनिगाडेकेंवाकृतिनें, केलेंप्रस्थानचिभगभूतिनें, मातृगणालाक्रोधचिआला, शीतज्वर अणिनिघुनिकेला, पाहुनिगोराणोंधळकेला, कळतांमगहेंश्रीकृष्णाला, सोडकरेउनिराणपा-

अंक ३.

विनविला. पूजुनिअंबाविश्वकदंबा भक्तालंबाविघ्न
निववीले सर्वउरविले अत्यानंदें नगरीं आले, मो-
डुनिविघ्नकुऱ्हाडी ॥ ऐसेश्रीकृ० ॥ १ ॥

---

## रुक्मिणीहरणनाट०
## अंक ३.
## प्रवेश ४.
### स्थळ.
### कुंडिनपुरींतील यादवांचें जान्वीस घर.



### पात्रें.

श्रीकृष्ण. —————— नवरदेव.

बलराम. —————— कृष्णाचाबंधु.

वसुदेव. —————— व्याही.

देवकी. —————— विहीण.

सुभद्रा. —————— कृष्णाची बहीण, करवली.

**श्रीकृष्ण.—** सुभद्रे, मार्गानें तुह्मास कष्टझाले असें ऐकिलें!

सर्व मंडळी जागच्या जागीं बसतात, आणि मोठ्या समारंभानें वधादा नें सीमांतपूजन करितात. तों वराकडून रुभद्रादिवाया तेलफळ नेता त; नंतर मिरवत मिरवत मोठ्या हौसेनें रुखवत आणितात.

**रुभद्रा**:— दादा, मी नाहीं, त्या मंडळींत फराळास बसत नाहीं.

**बलराम**:— कांबरें, आह्मास दुसरी बहीण नसतां तूं एकटीच आहे- स तर कृपा करून हा विवाह होई पर्यंत एक अक्षरही बोलूं नको.

**रुभद्रा**:— बोलत नाहीं, आणि बसतही नाहीं. (असें बोलून निघून जाते.) इतक्यांत श्रीकृष्ण तिला हातीं धरून पाटावर आणून बस- वितात.

**श्रीकृष्ण**:— ताई तूं रुसलीस काय! तर आतां रागें भरूं नको. आ- णि मजबरोबर फराळ कर. नंतर तुझें जें अभीष्ट असेल तें मी क- रीन.

**रुभद्रा**:— (बरें तर) असें बोलून पाटावर बसते.

**विदूषक**:— आर्या, तें पाहिलेंसकाय? कित्येक लोकांनीं वाहिलेले रुवर्ण शैप्याच्या तादांतून सेवकजनांनीं रुखवत आणिलें आहे. तें किती तरी र- मणीय दिसत आहे पहा! तिळांचे, कांडीव चारोळ्यांचे, खसखशी चे, कमलबीजांचे, फणसाच्या आठोळ्यांचे लाडू वळले आहेत.

**सूत्रधार**:— (आश्चर्यानें) एकून बीजमात्र कांहीं सोडिलें नाहीं.

**विदूषक**:— प्राचीन चालींत कसा काय शोध लागतो त्याचा नियम नाहीं.

**सूत्रधार**:— तें असो. कोठें कोठें त्या आठोळ्या शिजवून खाण्याचा संप्रदाय आहे; परंतु बोरांच्या बिया कोणाच्याही खाण्यांत आलेल्या पाहिल्या नाहींत; परंतु येथें त्यांचेही लाडू करून आणिले आहेत तेव्हां आतां अक्कल काम करीत नाहीं.

**विदूषक**:— तें असो. पण हें पाहिलेंस काय? कीं वधुपक्षाकडी

**सुभद्रा.**— होय कृष्णा, मी ह्मटलें हें लग्न नव्हे, विघ्न आहे. पण ज्ञा ग जानानें आणि जगदंबेनें कृपा केली.

**बलराम.**— येथेंही तसेंच होतें; परंतु ईश्वरें कृपा केली.

**वसुदेव.**— बरें असो. पण आतां रुखवत येण्याची वेळ झाली. गोष्टी पुरे करा.

(इतक्यांत दोहीं मंडपांत मंगलवाद्यें वाजूं लागतात)

**सूत्रधार.**— मित्रा, तें पाहिलेंस काय? वधु आणि वरपक्षांचे कारभारी. सर्वांस शालजोड्या व पागोटीं कसे वांटताहेत.

**विदूषक.**— मित्रा, ही तर वेळ चांगली आहे, शालजोडी मिळण्याची संधी आहे, याजकरितां मी जाऊं काय?

**सूत्रधार.**— अरे, एवढ्या उत्साहांत तुला शालजोडी मिळणार नाहीं.

**विदूषक.**— तें असो, पण तिकडे पाहिलेंस काय? शुद्धमतीनें शोंवनी आणिली आहे. आतां काय विचारतां? यथेच्छ भक्षण करावें!

**सूत्रधार.**— अरे खादाडा, मंगलकृत्याची मौज पहावयाची सोडून, खाण्याचें वर्णन काय करितोस! ते भीमकराज श्री कृष्णाची पूजा कशी करितात तें पहा.

**विदूषक.**— मित्रा, एकून त्या शुद्धमतीचें धन्य भाग्य खरें. जो पुराण पुरुष, वेदांस ही सांपडला नाहीं असा जो षड्गुणैश्वर्य क्षीराब्धिवासी भगवान् त्याचे भीमक राजा पाय धुतो आहे, व शुद्धमती भरजरिपीतांबर परिधान करून व एक हात पाठीवर टाकून व केंसांचे अग्रांस ग्रंथिका देऊन हातांत सोन्याची झारी घेऊन भगवंताचे पद्मकमलांवर पाणी घालीत आहे. तस्मात सर्व जगांत आज हीं स्त्री पुरुषें धन्य धन्य खरीं.!

**सूत्रधार.**— यांत काय संशय, त्यांची पुण्याई तशीच आहे. इतक्यां-

असा आहे कीं नवरीच्या मातेनें आपली कन्या जांवयास प्रिय होण्या साठीं सांडया करूनयेत असा शिष्टाचार आहे यास्तव केल्या नाहींत.

**सूत्रधार:-** अरे, तें पाहिलेंस काय? तें पहा, त्रिकूट ह्मणून एक भोंकराचें लोणचें वाढलें आहे तें शुद्ध मोत्यां प्रमाणेंच दिसतें. त्याचें दुसरें नांव त्रिकूट हें तुला ठाऊक आहे काय?

**विदूषक:-** होय, ठाऊक आहे. आणि पु रणानें परिपूर्ण अशा पुरण पोळ्या, इंडोन्या, फेण्या, घान्या, खांडे, मांडे, शिकरिणी हे पदार्थ किती स्वच्छ आणि मनोहर असे दिसत आहेत. हां! हां!!

**सूत्रधार:-** आणि हें ऐकिलेंस काय? (असें बोलून श्लोक ह्मणतो.)

## श्लोक.

हाशाल्योदनभूप ज्यास वरि दिसे तें सूपछत्रा
परी॥ पात्रस्थं दनिबेसला घृतमहामात्यें विरा
जें तरी॥ कांता पल्लवचामरीं हि कथिका वाद्यें-
चि शोभा जया॥ आली जो जठराग्निचा जय क
रूं भा से पहा तांनया॥

**विदूषक:-** आर्या, त्वां ह्या ओदनभूपतीचा अलंकार केला; परंतु तुला षड्रस कोणते आणि प्रचारांत ह्मणजे जेवणांत ते कसे येतात एवढें सांग.

**सूत्रधार:-** ऐक. (असें बोलून पद गातो.)

पद. चाल:- जाऊनि आश्रमीं॰ (मेधावतीप॰)

खानांजि भेनें चाटुनि जेत्या॥ नामें लेह्य असें ह्म
णि जेत्यां॥ घट घट प्राशन आणि करि जेत्यां॥
स्वादिष्ट ह्मणनाति पेय असे तें॥ षडरस ऐ-

ल प्रत्येक मानकरी वऱ्हाडी श्री कृष्णाचे अंगास नियमानें तेल लावून प लीकडे जात आहे.

**सूत्रधार.**- अरे, तो असाच तेलवणीचा क्षत्रिय लोकांचा शिष्टाचार आहे.

(इतक्यांत वधूपक्षाकडील कारभारी रुखवताची तयारी करून श्रीकृष्णास कळवितो.)

**विदूषक.**- मित्रा, तें पाहिलेंस काय! कशीं सोन्याचीं तारें मांडून त्यांत अनेकविध भक्ष्य पदार्थ शुद्धमती वाढीत आहे. खणलेल्या, खुटलेल्या, तोडलेल्या तीन प्रकारच्या भाज्या ज्यांस हिंग, मोहऱ्या, हळद, वेळाजिरें, इत्यादि पदार्थांची फोडणी देऊन शोभा आणलेल्या वाढिल्या आहेत. कांहीं खारट, कांहीं अळणी, कांहीं आंबट, तुरट, कडू तिखट. कांहीं हिरवीं, कांहीं करकरीत, कांहीं परिपक्वपणानें देठापासून आपोआप सुटलेलीं अनुतापानें वाळलेल्या आणि वैराग्याच्या तळणींत तळलेल्या अशा कांचऱ्या कोशिंबिरीही वाढल्या आहेत.

**सूत्रधार.**- तें पहा अगोदर, एकानें कोशिंबीर खाल्ली, आणि ती त्यास तिखट लागली म्हणून कसें डोकें बडवीत आहे.

**विदूषक.**- तें असो. पण हें पाहिलेंस काय? त्या एकानें वळवटांची खीर उष्ण असतां भक्षण केली त्या योगानें त्याचे तोंडांतून धूर निघतो, आणि घाबरा झाला आहे.

**सूत्रधार.**- मित्रा, शेवया, लाडू, पापड, पापड्या, कुरड्या, सांडगे, इत्यादि सर्व पदार्थ असतां सांडग्या कांबरें केल्या नाहींत?

**विदूषक.**- आर्या, त्याचें कारण तुला ठाऊक नाहीं काय? एक तर. हें चातुर्य त्या शुद्धमतीचें आहे. तें काय म्हणशील तर, वृद्धाचार

| | |
|---|---|
| भीमक. | रुक्मिणीचापिता. |
| शुद्धमति. | रुक्मिणीचीमाता. |
| भीमकाचा उपाध्याय. | कुलगुरु. |
| जोशी. | मुहूर्तसांगणारा. |
| इतर भिक्षुक. | दक्षिणा घेणारे. |
| दिवाणजी. | कारभारी. |
| कंचुकी. | चोपदार. |
| सरदारलोक. | प्रधानादिक. |
| सूत्रधार.. | नाटककर्ता |
| विदूषक. | त्याचा सोबती |
| श्रीकृष्ण. | भगवान. |
| वसुदेव. | कृष्णाचापिता. |
| उग्रसेन. | आजोबा. |
| बलराम. | कृष्णाचा भाऊ. |
| सुभद्रा. | कृष्णाची बहीण. |
| देवकी. | ,, आई |
| सर्वयादव. | सैनिक लोक. |

भीमक.— कंचुके, जोशी बावांस विचार जा बरें, इष्टकालास किती अवकाश आहे तो

कंचुकी.— आज्ञा महाराज. (असें बोलून जातो)

भीमक.— उपाध्ये बावा आतां सर्व तयारी करा.

उपाध्याय.— मंडपखाल सर्व तयारी आहे. ते अलंकार वस्त्रें भूषणें पूजा साहित्य मधुपर्क इतकें येथें तयार आहे. आणि ओहल्यां वर-

केहोतिकसेते ॥ धृ० ॥ चोखुनिज्याचाजनरस घे-
ती ॥ चोष्य असेत्यानावदिदेति ॥ उदकाग्निलव-
णाविणजेघेती ॥ केवळसुखिंजगिंखाद्य असेते
षड्रस० ॥ २ ॥ क्षीरचरु आदिकजें अन्न ॥ भोज्य
ह्मणावेंबहुतचिधन्य ॥ शेटिपोळिअणिपक्का
न्न ॥ श्रीसूपशास्त्रीभोज्य असेते ॥ षड्रस० ३

या प्रमाणें अत्यानंदें सर्व मंडळींचीं भोजनें होऊन, विडे वांटल्या नंतर अत्तर गुलाब हार तुरे भिक्षुकांस दक्षिणा देऊन वधुपक्षाकडील मंडळी जाते.

**सुभद्रा:—** बहुधा आतां आमचें मंडपांतील कृत्य झालें. आतां वधु मंडपांत जावयाचें.

**यादवोपा:—** श्रीकृष्णा वधूच्या गळ्यांत बांधण्या साठीं एक गळसरी आपण स्वतः ओंवून तयार केली पाहिजे.

**श्रीकृष्ण:—** बरें आहे. ती त्याच तयार केली पाहिजे नव्हे? ( असें बोलून एकीकडे जातो. ) ( आणि स्वहस्तानें पुष्पांचा हार जाळी आणि गळसरी तयार करितो. )

---

रुक्मिणीहरणना०

अंक ३.

प्रवेश ५

स्थळ.

कौंडिण्य पुरांतील राज

मंदिर.

पात्रें.

वें नेथेंच आहे. ( इतक्यांत कंचुकी येतो. )

**कंचुकी.—** सरकार, त्यांणीं सांगितलें कीं, चार घटकांचा अवकाश उरला आहे.

**भीमक.—** अरे तर जलदी करा. ( असें बोलून शुद्धमतीस ) तूं सर्व वऱ्हाडणी घेऊन वरप्रस्थानास निघा. अवकाश फार थोडा उरला. तर आतां जलदी करा.

**शुद्धमती.—** बरें आहे. ( असे सर्व वाद्यां सहित शुद्धमति वरप्रस्थानास निघते. )

## ओंवी एकनाथाची.

शुद्धसत्वाचाश्वेतवारू॥ त्यावरीबैसलाकृष्णवीरू॥ जाहलावाद्यांचागजरू॥ मंत्रोच्चारुद्विजांचा ॥ १ ॥

## पद. राग यमनकल्याण.

निघेंवरप्रस्थान॥ज्याचात्यासमान॥धृ०॥
वाजतिवाद्येंबहुविधआणी॥कोणीकोणानगणी॥१॥

**सूत्रधार.—** तेंश्रीकृष्ण वरप्रस्थानास निघाले आहेत. त्याची शोभा कशी दिसते पाहिलीस काय?

**विदूषक.—** होय आणि ते आतपत्र फारच चांगलें शोभतें आहे. तसेंच मदोन्मत्त हत्ती, स्वच्छ आणि ज्यांस सोन्याच्या दांड्या आहेत अशीं नीं चामरेंही दोहीं बाजूंस ढाळिताहेत. पहा, कित्येक वऱ्हाडणींनीं विडे भक्षिले आहेत. तेणें करून त्यांची मुखें किती रमणीय दिसत आहेत. ऋग्वेदादि चार भाट ज्याचे स्तुतिपाठ करित आहेत. व नाना प्रकारचीं वाद्यें वाजताहेत.

**सूत्रधार:—** अरें तें पाहिलेंस काय? (असें बोलून श्लोक ह्मणतो.)

श्लोक.

सारेयादवतेबसोनिवहूनींजानीपहामंडपीं,
कृष्णाचीभगिनीअसेकरवलीनेत्रेंतिचेंरूपर्पा, १
कंसाचाजनितासवेंचिवसुदेवायानतेंएकदे,
येसर्वांपुढतींच्युताग्रजआणिलोकांबहूहर्षदे, २

पद. चाल. कांतप०

घोडीघेउनिनेवऱ्हाडिबहुमुदे॥धृ०॥ सलोकतासमीपतासरूपतातसा॥ सायुज्यताअसाचिनामधोषज्यांतसा॥ योगींद्रहिह्मणातिहाअह्माभिळेकसा॥ परिदेसुखसर्वांसहिरमेहसेंवदे॥ घोडी०॥ सर्वसमाजांतसमाकांतितीकुणा॥ एकहरीसवें दुजाकसाहितोदिसेउणा॥ त्याचिसमाजांततदारंगकरीदुणा॥ वधुपक्षींनेत्रसुखवांदारुजाळितीमुदें घोडी० ॥२॥ फुलझडीचिचुंदरीहवईतसानळा॥ बाणाअणिकउडवितातिकेकहतेनळा॥ जाळिलेंतदावदतिसर्वहिपळा॥ ऐशियांनएककपटनागतेमदें॥ घोडी०॥३॥

**वसुदेव:—** उग्रसेना, या गंधकाच्या घाणीनें व धुरानें फारच त्रास केला नाहीं बरें?

**उग्रसेन:—** होय, खरें. आणि आपणास आतां वार्धक्या मुळें अमळ अधीक दुःखद खरें.

**वसुदेव:—** ठीक आहे. परंतु तुह्मांस कांहीं उपद्रव नाहीं वाटतें.

वरपक्षाकडील उपाध्याय ---------------- कुलगुरु.
वधुपक्षाकडील उपाध्याय ---------------- कुलगुरु.
भीमकराजा ---------------- रुक्मिणीचा पिता.
वसुदेव ---------------- श्रीकृष्णाचापिता.
उग्रसेन ---------------- आजा.
बलराम, रेवती. ---------------- श्रीकृष्णाचा वडील बंधु.
रुक्मक इत्यादि भीमक पुत्र ---------------- भीमकाचे पुत्र.
शुद्धमति ---------------- रुक्मिणीची माता.
देवकी ---------------- श्रीकृष्णाची आई.
सुभद्रा ---------------- श्रीकृष्णाची बहीण.
यादववीर ---------------- कृष्णाकडील मंडळी.
भीमकाचे सरदार ---------------- प्रधानमंडळी.
कौंडिण्यपुरवासी ---------------- शहरांत राहणारे.
भिक्षुक. ---------------- भट.
कंचुकी. ---------------- चोपदार.
सूत्रधार. ---------------- नाटककर्ता.
विदूषक. ---------------- त्याचा सोबती.

**भीमक:**— (श्रीकृष्णास चौरंगावर बसवून) बसावें.

**वधु:**— प. उ. (भीमकास.) हा विष्टर द्यावा. (असें बोलून मोठ्यानें) विष्टरो विष्टरो विष्टर: नंतर मधुपर्क पूजा सांगतो. आणि अर्घ्य देववितो. (इतक्यांत)

**ओंव्या.** (एकनाथ.)

उदकघालीशद्धमती॥ चरणप्रक्षालिनृपती
जेथोनितीर्थाचीउत्पत्ती॥ तेंपूजितीश्रीचरण१

**उग्रसेन:-** (मोठ्यानें श्वास टाकून.) माझ्या दुःखाकडे आणि उपद्रवाकडे तुह्मी लक्ष्यच देऊं नका. मी आपल्या दुहितृ तनयांस पाहून फार आनंदांत आहें.

(तों इतक्यांत धूर नाहींसा झाल्यावर श्रीकृष्ण मायेचा एक मदोन्मत्त हत्ती उत्पन्न करून सामोरा आणून सर्वांस आडवितो. तेव्हां सर्व सोयरे आणि वऱ्हाडी भयभीत होऊन:-)

**सर्ववऱ्हाडी:-** ऐकतां काय? हा श्रीकृष्ण साक्षात् परमात्मा आदिनारायण पुराण पुरुष असा आहे; याचें कृत्य कोणास कांहींच समजावयाचें नाहीं. तर आतां सर्व पळा किंवा त्याला मनोभावानें शरण तरी जा.

**श्रीकृष्ण:-** (ऐकतांच सेवकास खूण करून त्या हत्तीस लाथ मारितो.) जा, तूं कशाला आला होतास? तुझें काम झालें.

(इतक्यांत श्रीकृष्णास, श्रद्धा, कीर्ति, धृति, विरक्ति, असा चार स्त्रिया सितो मंगल कुंभ घेऊन आडव्या येतात, आणि जो जें मागेल तें त्यास दुप्पट देत देत श्रीकृष्ण वधूमंडपांत प्रवेश करितात.)

---

## रुक्मिणीहरणना०
## अंक ३.
## प्रवेश ६.
## स्थळ.
## कौंडिण्यपुरांतीलराजमंदिर.
## पात्रें.

श्रीकृष्ण ---------------------------------------- भगवान.

रुक्मिणी ---------------------------------------- आदिशक्ति.

वधु:- उ:- अगोदर उभयतांच्या उष्णीषाचे पदर सोडा.
सर्व:- चालों द्या.

(इतक्यांत नायका मंडळींत सुभद्रा सर्वांस व्यवस्थेनें बसविते आणि द्विजगण सर्वांस व्यवस्थेनें बसवून वाद्यिध्वय संपवून रुक्मिणीस गौरीहरच्या पूजेजवळ बसवितात.

जोशी:- (घटिका भरलीसें पाहून मंगलाष्टक ह्मणतो.)

## मंगलाष्टक.

झालीपूर्णघटीकरोनिअडत्याअंत पटीश्री
वरा॥ हस्तींदेउनिमाळिकावधुवरांनिंताह
रीचीकरा॥ हीवेळाअतिहर्षकारकघडोपत्नी
पतीलातशी॥ भूतेशाघडलीधराधरगृहीं-
गौरीविवाहींजशी॥ १॥ शुभमंगलसावधा०

भिक्षुक:- (मंगलाष्टक ह्मणतात.)

हाराजाबहुपुण्यशालिचरवरायातुल्यहाए-
कचीं॥ झालाजांवईआदिदेवभगवान्तसो
ख्यतेंएकचीं॥ हीकन्यात्नग मेंचआद्विजन
नीश्रीदेवतातीपहा॥ याभाग्यानकरीलको
णत्रिजगींऐकूनियांतोअहा॥ १॥ शुभमं०

इतक्यांत अंतपट दूर करून रुक्मिणी श्रीकृष्णास आणि श्रीकृष्ण रुक्मिणीस एकमेक परस्परांस माळ घालून तेथेंच उभयतांस बसवून अक्षतारोपण करितात.

सर्वभिक्षुक:- श्रीकृष्णा, आतां नोवरीस कडेवर घेऊन बहुल्यावर तुह्मीच नेली पाहिजे.

श्रीकृष्ण:- उत्तम आहे. (असें बोलून ईश्वरी शक्तिनें तिला

चरणक्षालनार्थे घिले अंबु ॥ तव पात लेतीर्थक
दंबु ॥ आह्मा लाभ घावा एकथेंबु ॥ चरणांबुश्री
हरीचा ॥ २॥ मूळमाधवी जाउनी पाहे ॥ तीर्थक
दंब अद्याप आहे ॥ भाग्य वंत तो तेथें न्हाये ॥
कृष्णपायींतें तीर्थ ॥ ३॥ शरद्रुमतीनें आपण॥
कृष्णासी दिलें आचमन ॥ तीनवेळां नकरीं जा-
ण ॥ सर्वा पोषण एकवेळा ॥ ४ ॥ ब्रह्मपदींचा
अधिष्ठात्रा ॥ त्यासी देती ब्रह्मसूत्रा ॥ मानदे
तो वेदशास्त्रा ॥ श्रुतिव्यवहारातो साक्षी ॥ ५॥

भीमक.— भटजी, गंध, पुष्प आणा; कडीं, तोडे द्या; बाहुभूषणें आंगठ्या द्या; पीतांबर नेसवा.

रुक्मकादिचौघे.— दहीं मध एकत्र करून श्रीकृष्णाचे हातावर घालतात, आणि भाऊजी, आतां लाज अगदीं धरूं नये बरें! कांकीं गोकुळांत आपणास, दहीं दूध चोरून खातांना लज्जा भिऊन पळाली होती; परंतु मला संशय झाला कीं तिकडून वऱ्हाड फार आलें आहे, सांत लज्जा आली असेल.

शरद्रुमति.— (ऐकून हंसते.) आणि थांबा रे, या कामास अजून अवकाश आहे.

भीमक.— हे श्रीकृष्णा, प्रतिगृह्यतां.

श्रीकृष्ण.— तुह्मी दान देण्या घेण्याचें मनांत आणूं नकां बाकी प्रतिगृण्हामी.

भीमक.— नरदेवा, आतां वाङ्निश्चय झाला पाहिजे.

वसुदेव.— ठीक आहे.

उग्रसेन.— आरंभ करा तर.

तिला ज्ञान न लागतां आपोआप उचलून बहुल्यावर ठेविली. नंतर सप्तपदी पाणिग्रहण झालें.

भीमक:- देवा, ही दक्षिणा घ्या.

श्रीकृष्ण:- होय ह्मणून घेऊन. (रुक्मकादि मेव्हण्यांस कानपिळ्याच्या मानांत रुक्मियाच्या भयानें शंका होईल ह्मणून मानाचीं वस्त्रें देऊन) तुमच्या वडील भावाचा कान पिळिला आहे. आतां तुह्मी मान घ्या ह्मणजे झालें.

नंतर चार दिवस झाल्यावर स्नानमूख करण्या करितां शुद्धमतीनें देवकीस बोलाऊन आणिली.

देवकी:- (श्री कृष्ण रुक्मिणीस पाहून) अहाहा! काय तरी हा लोकोत्तर जोडा शोभतो!! मला ईश्वरें नेत्र दिल्याचें सार्थक आज या उभयतांस पाहून झालें! (असें बोलून निंबलोण करिते.) (इतक्यांत शुद्धमती रुक्मिणीचे मांडीवर बसविते. देवकीच्या कानांत भूषण घातलें, नंतर सर्व बाया रुक्मिणीस नांव घेण्या साठीं आग्रह करितात तेव्हां.

रुक्मिणी:- (भिऊन आपणाशीं) आतां मी नांव काय घेऊं! कारण, जेवढें दृश्य तेवढें सर्व प्राणनाथमय दिसतें; तर गोपाळ हें नांव घेतलें असतां बरें आहे. कांकीं एक पक्षीं इंद्रियांचें संरक्षण करणारा असा अर्थ होतो. आणि पक्षांतरीं गाईचें संरक्षण करणारा असा होतो; तेव्हां हेंच बरें आहे.

सर्वसुवासिनी:- रुक्मिणी, तुला आह्मी, नांव घेतल्या वांचून सोडणार नाहीं.

रुक्मिणी:- कशाला, हें पहा (असें बोलून कृष्णाच्या पाय धरून) गोपाला, पाय द्या!

सर्वस्त्रवासिनी:— ( ऐकतांच आनंदानें हंसतात. ) आणि बोलतात, श्रीकृष्ण बायकोंच्या हुकमांत वागूं लागले.

श्रीकृष्ण:—( पाय पुढें करून ) घ्या. काय करतां तें करा !

रुक्मिणी:— ( पायांचें सौंदर्य पाहून मोहित होते. ) हें सौंदर्य खरें.

श्रीकृष्ण:— ( तिला सांवरून धरितात. ) ( ह्या बायकाही भलतेंच का दितात.

रुक्मकादिचौघे:— भाऊजी, तें असो पण तुह्मी भीमकीच्या कंचुकीचें बिरडें सोडावें; नाहींतर रुक्मिणीस नमस्कार घालावा.

श्रीकृष्ण:— ( लाजून. ) हें काय ! भलतेंच काय सांगता हो !!

वसुदेव:— कृष्णा, विवाहांत जे वृद्धाचार व शिष्टाचार आहेत ते केले पाहिजेत.

श्रीकृष्ण:— ऐकतांच रुक्मिणीच्या कंचुकीचें बिरडें सोडूं लागतो. इतक्यांत.

रुक्मकादि:— श्री कृष्णा, संभाळून बरें, नाहींतर तुह्मी समजाल कीं, ही येक यमुनेच्या कांठची गोपीच आहे; पण तसें नव्हे, येथें जपून.

श्रीकृष्ण:— कशाचें जपून ( असें बोलून केवळ पाहूनच ती गांठ सोडितो. )

## ओंवीएकनाथाची.

रेवती:— रेवतीह्मणेजीयादवा ॥ आधींघ्यावेंइच्याना
वा ॥ हळदुलीमगइसीलावा ॥ देवाधिदेवा
श्रीकृष्णा ॥ १ ॥

श्रीकृ०— देवसांगेखुणाजिवाची ॥ नामरूपेंअतिरूपा
ची ॥ सगुणगुणेंहिगयाची प्रियाआ

चीजनहर्षी ॥ १ ॥ कृष्णह्मणेरुक्मिणीदेवी नामरूपात्तूंचिआघवी ॥ मजपरीसतूंचिब रवी ॥ ऐकोनिसर्वांहांसिजे ॥ २ ॥ हळदीघे ऊनिश्रीरंगें ॥ उटीतभीमकीचोंअष्टांगें ॥ ये रीनिवतसे सर्वां गें ॥ जाणतेंअंगींअनुभवीं

श्लोक.

पादवंदनाकरुनदेहरी ॥ युक्तिनेंवधूहृदनदा धरी ॥ करुनिवंदनानंदनंदना ॥ लीनजाहली नागिचंदना ॥ १ ॥ शौर्यतेंकरीत्यावरीहरी ॥ आ म्हसेचिण्यातिसकटींधरीं ॥ प्रकृतिपुरुषनेशो भलेभले ॥ कांतिघेउनीसूर्यजीअले ॥ २ ॥

ओंवी एकनाथाची.

प्रकृतिपुरुषदोघेजणें ॥ अंबाशिंपितीऐक्य पणें ॥ अच्युतविस्तारलाच्यूतपणें ॥ बापह्म णचपणेंजगाचा ॥

नंतर.

भीमकेंमांडिलेंविंदाण ॥ भवऐरणीसंपाद न ॥ कृष्णाशींवंशपात्रदान ॥ विधिविधानवेदो क्त ॥

इतक्यांत भीमकाच्या कुळधर्माप्रमाणें वधूवरें नाचवितात. त्याला भंडा म्हणतात.

पद.

आदिशक्तिलाघेऊनी ॥ देवनाचतोयेवोनि ॥ ध्रु० ॥ वधुघेउनीनिजरवांदीं ॥ नाचतसेतो

बहुफंदी ॥ नचुकेकिंचितहीताल ॥ गाण्याचाहिल घुकाल ॥ नाचपाहुनिदोघांचा ॥ ताळचिसुटला सर्वांचा ॥ सर्वलागलेनाचाया ॥ देवागातिवाचा-या ॥ आदि० ॥ १ ॥ लोकह्मणतिवधसोडा ॥ पळे देवतोजणुघोडा ॥ धरूंधांवलेजनत्यास ॥ देवेंदि धलें आयास ॥ सूज्ञानींत्या अडवून ॥ वधुघेतली सोडून ॥ मुन्हाप्रार्थितीजनदेवा ॥ हेतुआमचापु रवावा ॥ घेऊनिवधूलानिजरंगीं ॥ नाचदाखवा यारंगीं ॥ आदि० ॥ २ ॥

पद.

धेंडाप्रफत्वानाचे ॥ तो ॥ नयेचिवदण्यावाचे ॥ जो ॥ धृ० ॥ भक्तजनानिदेवविनवितां ॥ शिवासहीजो जाचे ॥ १ ॥ रखांदींघेउनिआदिशक्तिला ॥ साम्य त्याचेपेंचे ॥ तो ॥ २ ॥ नव्हींअर्पितांकुळदेवाला तोहीयेउनिनाचे ॥ ३ ॥ देवह्मणेमीअसेंनाचतां त्रिजगहिऐसेंनाचे ॥ ४ ॥ तो० ॥ ह्मणुनीरुक्मिणी रवालींउतरली ॥ सर्ववदतिजयवाचे ॥ ५ ॥ तो० ॥

श्रीकृष्णाः— ( भीमकास ) तुमची कुलदेवता कोणती, तिचें नां व सांगा ह्मणजे तिला रुद्धां नाचघूं.

भीमकः— ( हात जोडून ) ओंव्या एकनाथाच्या ह्मणतो.

ओंव्या.

आमच्याकडेकुलदेवता ॥ माया आणीकममता ॥ कल्पनाकामाक्षीसर्वथा ॥ माजघरींरखेळ ते ॥ १ ॥ वासनादेवींसकळीं ॥ बालाबंगलासु

गीमेळी ॥ मारकोमेसरोमेराळीं ॥ उच्छिष्टचांडा- ळीभानाची ॥ ३ ॥ आशातृष्णादोघीजणी ॥ आ- मचियाकुळींसुवांहुनी ॥ निंदादेवीमहादारुणी तिशींसज्जनांकांपिजे ॥ ३ ॥ मोहममताआमचे कुळीं ॥ लोभवेताळनयांजवळी ॥ क्रोधझोटिंग महाबळी ॥ आधींसळीशमकार्या ॥ ४ ॥

**श्रीकृष्ण:-** मामा, समजलों; त्या प्रमाणें नाच झालाच, परंतु आतां आमच्या कुलदेवतांचा नाच पहा.

ओंवी एकनाथाची.

श्रीकृष्णापक्षींअलोलिक ॥ अवघ्याकुळदेवता ऐका ॥ नाचवितांअनुभवकौतुक ॥ ठकपडलेंस कळिकां ॥ १ ॥

( इतक्यांत शिष्टाचारा प्रमाणें शत्रुमतीनें श्रीदेवकीदेवीच्या पाठी मागें रुक्मिणीस बसवून तिच्या हातांत दुधानें आणि तुपानें भरलेल्या थाळ्या देऊन आपण देवकीचें उदर त्यानेंच शिंपिलें. )

**शत्रुमति:-** देवकी बाई, आज या चतुर्दश लोकांत तुमचें उदर धन्य आहे. कारण त्यांत श्रीजगन्निवास आदिदेवानें निवास केला. तरआतां कृपा करा. ( असें बोलून रुक्मिणी तिच्या हातांत देऊन पायांवर डोकें ठेऊन. ) बाई ही कन्या चौघां पुत्रांहून ही अधिक प्रेमानें वाढविली, आणि आज इचें सार्थक व्हावें ह्मणून श्रीकृष्णास दान देऊन तुमच्या हातांत समर्पण केली आहे.

**वसुदेव-देवकी:-** प्रीतिपूर्वक स्वीकार करून उग्रसेनादि आपल्या मानकऱ्यांच्या मांडीवर बसवितात.

( इतक्यांत रुक्मिणी अत्यंत प्रेमानें श्री कृष्णाचे पायांस ध

हृ मिठी घालते. नंतर शुद्धमतीही श्रीकृष्णास वंदन प्रार्थना करिते. रुक्मिणीच्या वियोगा साठीं वधुपक्षाकडील सर्व लोकांचे नेत्रांस पाणी येते. इतक्यांत भीमकास.—

ओंवी एकनाथाची.

शु० शुद्धमतीह्मणेरायासी ॥ मजआंदणद्यावेंभी
मकासी ॥ होईनकृष्णाचीनिजदासी ॥ चरण
सेवेसीनिरंतर ॥ १ ॥

भी० राजाह्मणेशुद्धमती ॥ जीवप्राणआणिसंप-
त्ती ॥ सर्वस्वेंअर्पिलेंश्रीपती ॥ विकल्पचित्तींन
धरावा. ॥ २ ॥ भावविश्वासदोघेजण ॥ दिले
भीमकींशीं आंदण ॥ कृष्णासेवेलागींजाण ॥
अहर्निशींसादर ॥ ३ ॥ नंतर:—
द्विपदाआणिचतुष्पदा ॥ नानाधातुरत्नेंअष्टधा
भीमकेंआंदणगोविंदा ॥ बहुसंपदादीधली ॥ १
वसुदेवादिउग्रसेन ॥ भीमकासीकरितीआमं
त्रण ॥ भोजनाचाआग्रहजाण ॥ केलासन्मा-
नसर्वांशीं ॥ २ ॥

भी०. आर्या.

आग्रहनकरामजला, जेव्हां होईलपुत्रभीसाकि
ला ॥ येईनभोजनामीं, ऐकुनिपावेरमेशमुद
मखिला ॥ १ ॥ अत्यानंदानेंमग, वरघोडाह्वार
केसदेवांचा ॥ करिमस्तकींबसवुनि, मिरवेतोव
र्णिसाकुणावाचा ॥ २ ॥ नंतरपरतविलानृपभी
मकदेवेंहिबहुतमानानें ॥ द्वारावतींतआलेद

रीं ॥ कर्दळीस्तंभ शोभविलेद्वारीं ॥ फळेंमाझारीं
शोभती ॥ २ ॥ पूर्णकुंभदारोदारीं ॥ प्रदीसदीप
ठेविलेवरी ॥ दधिअक्षतादूर्वांकुरीं ॥ सुमनहा
रीसुगंध ॥ ३ ॥ वधूवरांचेंपहावयाकौतुक ॥
नगरनागरीकलोक ॥ मंडपघसणीहोतदेख
एकएकधाविन्नले ॥ ४ ॥ चढल्यामाडियागो
पुरीं पुष्पांजळीदेतीनारी ॥ देववर्षतीकुसु-
में अंबरीं ॥ जयजयकारीप्रवर्तले ॥ ५ ॥

इतक्यांत सन्याशी मंडळी आली होती त्यांणीं वेश्यांस, गर्दीनें स्पर्शल्या
ला ह्मणून मारिलें तेव्हां त्यांची आरोळी ऐकुन भीमकी ह्मणते.

**रुक्मिणी:—** या सन्याशांस अगदींच शांति कशी नाहीं. याणीं शे
ंडी उपटून कशाकरितां टाकिली! आणि भगव्या वस्त्रांची मात्र अप्र-
तिष्ठा केली!!

**श्रीकृष्ण:—** प्रिये, सन्यास घेतला ह्मणून शांति प्राप्त होणें ती
सर्वांस सारखी होत नाहीं; तर आतां तूं तिकडे आपलें लक्ष प
रघूं नको.

इतक्यांत सुभद्रा पुढें होऊन भाताची मूद ओंवाळून टाकिते;
आणि दासी पूर्ण कुंभ घेऊन येतात. त्यांस अनंत वस्त्रें वाणें श्री
कृष्ण देतात. आणि अनेक अलंकार देतात. आणि विधियुक्त गृ-
हप्रवेश करून रुक्मिणीस भातयसा जवळ देवकी नेते आणि ल
क्ष्मी पूजन होतें. अनेक वाद्यें वाजूं लागतात. तों देवकी दुधानें
भरलेली वाटी रुक्मिणीच्या मुखास लावून

**देवकी:—** सुनबाई धालीस काय?

**ओंवी एकनाथाची.**

रातहरिच्नीचरम्यगानानें ॥३॥

---

# रुक्मिणीहरणनाटक.

## अंक ३.

## प्रवेश ७

### स्थळ.

### द्वारकेंतीलराजमंदिर.

### पात्रें.

| | |
|---|---|
| वसुदेव | कृष्णाचापिता. |
| उग्रसेन | आजा. |
| श्रीकृष्ण. | भगवान. |
| रुक्मिणी. | आदिशक्ति. |
| बलराम. | श्रीकृष्णाचावडीलबंधु. |
| सुभद्रा. | कृष्णाचीबहीण. |
| देवकी. | कृष्णाचीमाता. |
| भिक्षुक | भट. |
| सुवासिनी. | ,, नायका. |
| कंचुकी | चोपदार. |
| सूत्रधार. | नाटककर्ता. |
| विदूषक. | त्याचा सोबती. |

ओंव्याएकनाथाच्या.

मदगजस्कंधाचेसडे ॥ कुंकुमकस्तुरिचहूंकडे
मखरेंशृंगारिलीपुढें ॥ घाडेकाडेचहूंकडे ॥१॥
नगरशृंगारिलेंकुसरीं ॥ गुढियातोरणेंघरोघ-

ला नमस्कार करिते. आणि देवकी तिला आलिंगन करिते.)

ओंव्या एकनाथाच्या.

ऐसा द्वारके माझारी ॥ परमानंद घरोघरीं ॥ देववर्षती सुमनें अंबरीं ॥ जयजयकारी प्रवर्तले ॥ १ ॥ यापरी गृहप्रवेश ॥ करूनियां हृषीकेश ॥ रमायुक्त जगन्निवास ॥ द्वारकावास करितसे ॥ २ ॥ शुककथणें गा परीक्षिती ॥ गृहस्थ जाहला श्रीपती ॥ भीमकीहरणाची ख्याती ॥ तुजप्रती सांगीतली ॥ ३ ॥ एवं हरण पाणिग्रहण ॥ तुज करविलें गा श्रवण ॥ जयाचेनि श्रवणें जाण ॥ दोष दारुण नासती ॥ ४ ॥ ग्रंथ पदतां संपूर्ण ॥ कथेशीं श्रीकृष्णा कारण ॥ कळसा आलें निरोपण ॥ प्रेम सज्जनजा यातीं ॥ ५ ॥

विदू०—मित्रा, ही कथा संपली वाटते.

सूत्र०—अरे होय. आजून कां तूं समजला नाहींस?

विदू०—होय, समजलों. परंतु आतां मी काय करावें?

सूत्र०—सांगतों त्या प्रमाणें विचार निरंतर कर.

विदू०—बरें तर सांगा.

सूत्र०—ऐक. (असें बोलून ख्याल गातो.)

ख्याल. राग यमनकल्या०

यमनकल्याण ॥ तुझें तूंच होई ॥ ध्रु० ॥ स्वाधिन नसतां तूं तुज पाशीं ॥ व्यर्थ जगुं बिलियाण

यमन० ॥ १ ॥

सूत्र०—आणीक सांगतों.

पद.

तरायानराधरहराचित्तदेशीं ॥ जरास्वस्थ होतूं खरा सारिखा

रुक्मि० येरीह्मणेपरमामृतेंघाल्यें ॥ कृष्णास्मरवेंनिवाल्यें
तुमच्यासेवेसपावल्यें ॥ प्राप्तजाहल्येंहरिचर
णी ॥ १ ॥

देवकी.– ( तिला भानवशाजवळ नेऊन ) बाई, तूं श्रीकृष्णास वरि लेंस. परंतु तुजवर त्याची प्रीती होण्यास मी एक युक्ति सांगतें ती ध्यानांत ठेव. जें खरकटलें किंवा मळकटलें तें ओंजळ्यांत टाका वें. बाई, जशी प्रपंच्यांत एकावर एक भांडीं रचून त्यांची उत- रंड करितात, आणि त्याच्याखालीं निवर्गी ठेविले ह्मणजे त्याची गडबड होत नाहीं त्या प्रमाणें स्वधर्माच्या बैठकावर सत्कर्माची उत- रंड रच; आणि जसा कोणी बडबड करूं लागला असतां त्याचे तोंडीं कांहीं झांकण देतात त्या प्रमाणें भात बडबड करूं लागला ह्मणजे त्याचे तोंडीं वेळणीचें झांकण ठेव. मुली, तुझ्या तपाग्नी नें प्रारब्ध हेंच साजूक तूप तापलें आहे. या तुपाची तपेली ठेव ण्यास स्वर्ग हें शिंकें आहे. त्याजवर ठेव ह्मणजे केव्हांही उलंडून सांडणार नाहीं. तुझ्या प्रपंचरूप धान्याच्या कणगीस, कामक्रोध हे उंदीर लागतील तर त्यांचे तोंडीं विवेकाचा धोंडा ठोकून तीं तोंडें बुझाव. सासू, सासरा, दीर इत्यादि लहान थोर यांचे संवंत नस र रहा.

इतक्यांत रेवती जवळ येऊन शिष्टाचाराप्तव आपल्या ह्मा तांतील मुद्राहात पाणी ह्मणून रुक्मिणीच्या हातांत घालते. आ णि अत्यंत प्रेमानें आपल्या कंठांतील नवरत्नांचा हार तिच्या कं ठांत घालते. रुक्मिणी तिला नमस्कार करिते.

रुक्मिणी.– सासूबाई, आपण जें जें मला सांगितलें तें सर्व मा- झ्या हिताचें आहे. येणें करून मी कृतार्थ होईन ( असें बोलून ति

कांपावशीदेशदेशीं ॥ धृ० ॥ जन्मघेउनिजनीह्मणविशीमीध नीपरिश्रमें चिंतुनीफारगेले ॥ ऐकिलेंबहुततेंपाहतो ॥ नित्यतेंसत्यऐकमतीमाझिऐशी ॥ नरा ॥ १ ॥ मानवीहीनवी तुजपरीबोलली ॥ मोललोंयागुणेंमीतयाशीं ॥ दीक्षितोपा ध्द्गोपालभूलक्ष्मणाहिभजनयोगेगणींपुणेंहीचकाशी २

(आरती ह्मणून सर्व जातात.)

इतितृतीयोंकः संपूर्णः

---

## ग्रंथकर्त्याची रसिकजनास प्रार्थना.

### पद राग भैरवी.

रसिकजनाप्रतिविनवितह्माकवि ॥ ऐकामत्कृतिविनतिहीन वी ॥ गोविंदात्मजगंगाधरजो ॥ सापकरहितरिशांतचिध रजो ॥ देताझालामजलाकरजो ॥ विनतिकरीअशीजोडू निकरजो ॥ रसिक० ॥ १ ॥ लक्ष्मणदीक्षितजोशीकरवीं सन्मतिबहुकृतियापरिकरवी ॥ रसिकजनासिप्रेमचिभर वी ॥ आणिकईश्वरपायांस्मरवी ॥ र० ॥ २ ॥ गमेलजेंया काव्यींन्यष्ट ॥ टाकुनियातेंघ्याजेंप्रेष्ठ ॥ सेविनियापरिरस जेश्रेष्ठ ॥ यान्याशिवाइटह्मणतांनेष्ट ॥ रसिक० ॥ ३ ॥

## सूचना.

या ग्रंथकारा कडून तयार करविलेले ग्रंथ (१ चमत्कारचिंतामणी किंमत तेरा आणे. २ मेधावती परिणय नाटक. किं. दीड आणा.) छापून तयार आहेत. (१ मंदविक्रम नाटक. २ श्रीयाळचरित्र नाटक.) हाली छापीत आहें.

गं. गो. सापकर.